135

श्रीमंत राजेसाहेब, सरकार जमखंडी
यांनीं नेमलेल्या

# घटनासमितीचें प्रतिवृत्त

( रिपोर्ट )

सन १९४० इ.

---

१९४०

श्री

# जमखंडी घटना–समितीचें प्रतिवृत्त (रिपोर्ट) सन १९४० इ.

## अनुक्रमणिका.


| | | पान |
|---|---|---|
| १ | भाग १ ला:—प्रास्ताविक ... ... ... | ३—५ |
| २ | भाग २ रा:—राज्यकारभार विषय व अधिकारदान ... ... | ५–२० |
| ३ | भाग ३ रा:—कायदेमंडळाची रचना व मताधिकार आणि मतदारसंघ | २०–२८ |
| ४ | भाग ४ था:—दप्तराची भाषा कानडी कीं मराठी ... ... | २८–३६ |
| ५ | भाग ५ वा:—समारोप ... ... ... ... | ३६–३८ |
| ६ | परिशिष्ट १ घटना–समितीनें तयार केलेली प्रश्नपत्रिका ... | ३९–४१ |
| ७ | परिशिष्ट २ सोंपीव खात्यांची यादी ... ... | ४२ |
| ८ | परिशिष्ट ३ हल्लींच्या कायदेमंडळाची घटना व मतदारसंघ ... | ४३ |
| ९ | परिशिष्ट ४ नवीन होणाऱ्या कायदेमंडळाची घटना व मतदारसंघ | ४४ |
| १० | परिशिष्ट ५ ज्यांचेकडे प्रश्नावली पाठविली व ज्यांच्या तोंडी साक्षी | |
| ११ | घेण्यांत आल्या त्यांचीं नांवें ... ... | ४५–४७ |
| १२ | १ रावसा. खर्डेकर यांची भिन्नमतपत्रिका ... ... | ४८ |
| १३ | २ रा. नाडगीर यांची भिन्नमतपत्रिका ... ... | ४९–५६ |
| १४ | ३ रा. सावडे, रा. आपटे व रा. कोरी यांची भिन्नमतपत्रिका | ५७–६९ |

श्री

# घटनासमितीचें प्रतिवृत्त ( रिपोर्ट )

**श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांचे सेवेशी नम्र विज्ञापना.**

अध्यक्ष घटनासमिती जमखंडी यांची कीं.

१. जमखंडी संस्थानच्या प्रचलित राज्यव्यवस्थेंत पहिला हप्ता म्हणून काय सुधारणा अगर फेरबदल करणें जरूर आहे, तसेंच कायदेमंडळाचे घटनेंत व कामकाजाचे नियमांत त्याच अनुरोधानें काय सुधारणा करणें जरूर आहे व संस्थानची बहुसंख्य प्रजा कानडी भाषा बोलणारी आहे या दृष्टीनें कानडी भाषेचा उपक्रम संस्थानचे दप्तरांत कसा व किती अंशानें करणें जरूर आहे या गोष्टीबद्दल पुरावा घेऊन, विचारविनिमय करून रिपोर्ट करणेबद्दल आठ जणांची समिति श्रीमंत सरकारांचेकडून ता. २४-२-३९ इ. च्या हुजूर दप्तरी हुकूम नं. १५/३९ इ. च्या हुकुमानें नेमण्यांत आली आहे. हुजूर हुकुमाप्रमाणें सर्व काम पुरें करून रिपोर्ट सादर होणेसाठीं सोबत पाठविला आहे.

२. आम्हां आठही सभासदांचा सहमताचा एकच रिपोर्ट सादर करणें शक्य जाहलें नाहीं ही गोष्ट नमूद करणेस आम्हांस खेद वाटतो. आमचेपैकीं रावसाहेब महाबळ, रावसाहेब धारेश्वर व रावसाहेब टिकेकर अशा त्रिवर्गांचा मुख्य रिपोर्ट आहे. मि. साबडे, मि. आपटे व मि. पंचप्पा कोरी या त्रिवर्गांना आमचा रिपोर्ट सर्वांशानें मान्य नसल्यानें त्यांनीं आपली भिन्नमतपत्रिका दिली आहे तीही सोबत पाठविली आहे. रावसाहेब खर्डेकर हे आम्हां त्रिवर्गांशीं दोन बाबींखेरीज करून बाकी सर्व बाबतींत सहमत आहेत. त्यांचा मतभेद दोन गोष्टींपुरताच आहे, तेवढा दाखविणारी भिन्न मतपत्रिका त्यांनीं दिली आहे, तीही सोबत ठेविली आहे. रा. नाडगीर हे आमच्या रिपोर्टांतील मूलभूत गोष्टीबद्दल आमच्याशीं सहमतच आहेत. तथापि मतभेदांच्या त्यांच्याही कांहीं गोष्टी आहेत व कांहीं तपशिलाच्या बाबीही त्यांनीं सुचविल्या आहेत. या त्यांच्या सूचना समाविष्ट करणारा त्यांचा स्वतंत्र रिपोर्ट आलेला आहे तोही सोबत सादर केला आहे.

३. राज्यकारभाराच्या प्रचलित पद्धतींत व कायदेमंडळाच्या घटनेंत व अधिकारांत काय फरक करणें इष्ट आहे तें आम्हीं आमचे रिपोर्टीं नमूद केलेंच आहे. कामकाजाचे नियमांतही सुधारणा सुचविणेबद्दल हुजूर हुकूम आहे. परंतु या आमच्या राज्यकारभाराच्या व मंडळाच्या घटनेच्या व अधिकाराच्या सूचना जशा मान्य होतील त्या अनुरोधानें कामकाजाचे नियमांत सुधारणा करणें जरूरीचें होईल. यासाठीं या सुधारणा काय करणेच्या त्या आतांच नमूद करणें शक्य नसल्यानें त्या नमूद करतां आल्या नाहींत. आमच्या सुधारणा सरकारांना ज्याप्रमाणें

मान्य होतील त्याप्रमाणें कामकाजाचे नियमांत दुरुस्ती करणेंत यावी इतकेंच आम्ही या ठिकाणीं सुचवितों.

४. सर्व काम पुरें करून रिपोर्ट सादर करण्यास थोडासा जास्त कालावधि लागला याची जाणीव आम्हांस नाहीं असें नाहीं. काम याहून लवकर संपविलें जाणें अधिक इष्ट होतें ही गोष्ट खरी आहे आणि आम्हांस तसें संपवितां आलें नाहीं याबद्दल खेदही वाटतो. परंतु कामाचें स्वरूप व महत्त्व विशेष असल्यानें आणि वेळोवेळीं कांहीं अडचणी उत्पन्न होत गेल्यानें काम संपविणेस इतका अवधि लागला ही गोष्ट श्रीमंत सरकारांनीं कृपाळू होऊन ध्यानीं घ्यावी इतकीच आमची याबद्दल नम्र विनंति आहे.

५. आम्हां समितींतील इसमांना घटनासमितीवर नेमून श्रीमंत सरकारांची व संस्थानी प्रजेची सेवा करणेची संधि आम्हांस हुजुरांनीं दिली याबद्दल आम्ही सर्व सभासद श्रीमंतांचे अत्यंत ऋणी आहों. व याबद्दल आम्ही व्यक्तिशः चेअरमन या नात्यानें व सर्व सभासदांचे वतीनें श्रीमंत सरकारांचे अत्यंत आभारी आहों हें या ठिकाणीं नमूद करणेची परवानगी घेतों.

सेवेशीं श्रुत होय ही विज्ञापना.

जमखंडी.
ता. २२ जुलै १९४० इ.

Sd/- **भास्कर बहिरो महाबळ,**
न्यायमंत्री व चेअरमन
घटनासमिती, जमखंडी.

मेहरबान रावबहादूर दिवाणसाहेब इलाखा जमखंडी यांचे मार्फत रवाना.

# भाग १

## प्रास्ताविक.

जमखंडी संस्थानांतील प्रजाजनास राज्यकारभाराचे बाबतींत क्रमानें अधिक अंशभागी करण्यासाठीं कोणते उपाय योजावेत आणि विद्यमान कायदेमंडळाचे अधिकारांत व रचनेंत या दृष्टीनें काय फरक करावेत याबद्दल सर्व गोष्टींचा विचार करून, लोकमत लक्षांत घेऊन आणि सर्व परिस्थिति ध्यानांत घेऊन रिपोर्ट करणेसाठीं श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांनीं तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १९३९ इ. च्या दप्तरी हुकूम नंबर १५/३९ च्या हुकुमानें या कमिटीची नेमणूक केली आहे.

श्रीमंत राजासाहेब यांचा हुकूम पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:—

"गेल्या जून महिन्यांत इकडील राज्यारोहणाचे बारावे वाढदिवसानिमित्त भरलेल्या दरबारांत हल्लींच्या कायदेमंडळाचे घटनेंत व कामकाजाचे नियमांत काय सुधारणा करणें जरूर आहे त्याबद्दल विचारविनिमय करून आमचेकडे रिपोर्ट करणेबद्दल एक समिति नेमणेंचा आमचा विचार असल्याचें आम्हीं जाहीर केलें होतें...................त्याबाबत प्रमुख लोक व संस्था यांचेबरोबर वाटाघाट करून खालीं लिहिल्याप्रमाणें समिति नेमणेंत येत आहे:—

१ रावसाहेब भास्कर बहिरव महाबळ, न्यायमंत्री ( चेअरमन )
२ रावसाहेब अमृतराव व्यंकटराव धारेश्वर, विद्याधिकारी.
३ रावसाहेब बॅरिस्टर प्रो. बाळासाहेब हणमंतराव खर्डेकर, गार्डियन टु श्रीमंत युवराज.
४ रावसाहेब गोपिनाथ विठ्ठल टिकेकर, पर्सनल असिटंट टु धी दिवाण व मामलेदार जमखंडी.

कायदेमंडळातर्फे निवडलेले }
१ रा. रा. गोविंद दत्तात्रय आपटे, वकील कुंदगोळ.
२ रा. रा. केंचनगौडा रंगनगौडा नाडगीर, जमेदार कुंदगोळ.

प्रजापरिषदांतर्फे नेमलेले }
१ रा. रा. अनंत वासुदेव साबडे, वकील जमखंडी.
२ रा. रा. पंचापा बसलिंगप्पा कोरी, सांवशी.

रावसाहेब भालचंद्र रामचंद्र पटवर्धन, असिस्टंट जज्ज, जमखंडी यांस या समितीचे सेक्रेटरी नेमणेंत आलें आहे. सदरहू समितीनें आपले सोईप्रमाणें जमून विचारविनिमय करून आपला रिपोर्ट रावबहादूर दिवाण जमखंडी यांचेमार्फत इकडील नांवें सादर करणेचा आहे.

समितीनें खालीं लिहिले बाबींसंबंधानें विचारविनिमय करून इकडेस रिपोर्ट करणेचा आहे.

( १ ) संस्थानचे राज्यकारभांत प्रजेला अधिक अंशभागी करण्याचे हेतूनें, प्रचलित राज्यव्यवस्थेंत पहिला हप्ता म्हणून काय काय सुधारणा किंवा फेरबदल करणें इष्ट व अवश्य आहे.

( २ ) याच अनुरोधानें जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचे हल्लींचे घटनेंत व कामकाजाच्या नियमांत काय काय व कशा प्रकारच्या सुधारणा करणें इष्ट व अवश्य आहे.

( ३ ) संस्थानांतील बहुजनसमाजाची भाषा कानडी असून, शक्यतों सरकारी दप्तरची भाषाही कानडी असावी हें तत्त्व दरबारकडून मान्य करणेंत आलें आहे. या गोष्टीची अम्मलबजावणी करणेची, ती एकंदर सर्व परिस्थिति व अडचणी व कानडी भाषा वाचणारे व लिहिणारे लोकांची प्रस्तुतची वाण, तसेंच संस्थानांतील मराठी भाषा बोलणाऱ्या प्रजेच्या सोई व अडचणी या गोष्टी लक्षांत घेऊन, कोणकोणत्या पायरीनें किती प्रमाणांत व कशा रीतीनें व किती कालावधींत करावी असे विषयींचा एक कार्यक्रम तयार करून सादर करणें.

येणेंप्रमाणें गोष्टींचा विचारविनिमय करून रिपोर्ट करणेचा आहे."

२. या हुकूमावरून ही कमिटी कां नेमण्यांत आली आणि कमिटीनें करावयाच्या कामाची दिशा व मर्यादा काय आहे या गोष्टींचा स्पष्टपणें खुलासा होत आहे. जमखंडी संस्थानची बहुसंख्य प्रजा कानडी भाषा बोलणारी आहे. परंतु मराठी भाषा बोलणाऱ्यांचें प्रमाणही अगदींच कमी नाहीं. दप्तरची भाषा मराठीच आहे. यामुळें कानडी भाषा असणाऱ्या लोकांची गैरसोय होत असेल तर ती गैरसोय, राज्यकारभार प्रजेला हितकर होणेच्या दृष्टीनें दूर होणें जरूरीचें वाटल्यानें, या बाबतींत देखील कमिटीनें विचार करून शिफारसी सादर कराव्यात असा श्रीमंत राजासाहेब यांचा हुकूम आहे. या भाषाविषयक प्रश्नाचा राजकीय अधिकारदानाचे प्रश्नांशीं साक्षात् कांहीं संबंध नाहीं ही गोष्ट खरी आहे, तथापि या बाबतींत देखील प्रजेस अडचण वाटत असेल तर तीही दूर व्हावी आणि प्रजेस देण्यांत येणाऱ्या राजकीय हक्कांचा उपभोग शक्य तितक्या विस्तृत प्रमाणांत प्रजेस घेतां यावा याच हेतूनें हा प्रश्न देखील श्रीमंत राजासाहेब यांनीं या कमिटीकडे सोंपविला असावा असें आम्हांस वाटतें आणि म्हणून केवळ कानडी अगर मराठी भाषेबद्दलचा अभिमान वा त्या भाषांचा पुरस्कार या भावनांकडे लक्ष न देतां केवळ उभयभाषिक प्रजेला राज्यकारभाराचे दृष्टीनें अडचण उत्पन्न होऊं नये आणि त्यांचे व्यवहार सलोख्यानें आणि सुलभतेनें चालावेत हीच गोष्ट दृष्टीपुढें ठेवून आम्हीं या प्रश्नाचा विचार करून शिफारशी केल्या आहेत. ही आमच्या विचाराची दिशा ध्यानांत घेतली जाईल आणि कानडीबद्दल अगर मराठीबद्दल आमचे मनांत अनास्था आहे अगर तिरस्कार आहे किंवा एकींपेक्षां दुसरींवर आमची अधिक भक्ति आहे अशा प्रकारचा गैरसमज करून घेणेंत येणार नाहीं अशी आम्हांस उमेद आहे.

३. श्रीमंत राजासाहेब यांच्या वर उद्धृत केलेल्या हुकुमानें या कमिटीची स्थापना जाहल्यानंतर या बाबींचा विचार करणेसाठीं कमिटीनें आपल्या सभा वेळोवेळीं बोलाविल्या. लोकमत काय आहे हें समजून घेण्याचे हेतूनें या बाबतींत कमिटीनें मराठी व कानडी अशा

दोन्ही भाषेंत एक प्रश्नावली तयार केली. ( ती परिशिष्टाचे रूपानें दिली आहे ). या प्रश्नावलीच्या प्रती सुमारें ३०० जणांचेकडे पाठविण्यांत आल्या व अभिप्राय मागविणेंत आले. आम्हांस नमूद करण्यास आनंद वाटतो कीं, आमच्या विनंतीस मान देऊन पुष्कळांनीं प्रश्नावलीस लेखी उत्तरें पाठविलीं. प्रजेंतील प्रमुख जातींतिल पुढाऱ्यांनीं उत्तरें पाठविलीं. हरिजनातर्फें, व्यापारी वर्गातर्फें, सुशिक्षित लोकांतर्फें, स्त्रीवर्गातर्फें व मागासलेल्या जातींतर्फें, अशा सर्वांचेकडून लेखी उत्तरें आलीं. त्यावरून लोकमताचा अंदाज घेण्याचें काम सुलभ जाहलें. लेखी उत्तरें पाठविणाऱ्यांपैकीं प्रमुख लोकांना तोंडी खुलासा करणेसाठीं आम्हीं बोलविलें. त्याप्रमाणें त्या लोकांनीं आमचेपुढें हजर होऊन खुलासाही केला. या कामासाठीं कमिटीनें आपली बैठक कुंदगोळ येथें ता. ५-११-३९ इ. पासून ता. ६-११-३९ इ. पर्यंत २ दिवस भरविली होती व जमखंडी येथें ही ता. १६-१-४० इ. पासून ता.२२-१-४० इ. पर्यंत भरविली. पुराव्याचें काम सर्व संपल्यानंतर विचारविनिमयासाठीं कमिटीनें आपली बैठक दोन दिवस बोलाविली. कमिटीच्या सभासदांमध्यें सर्वच बाबतींत एकमत होणेचा प्रयत्न करणेंत आला, परंतु तसें होत नसल्याचें निदर्शनास आल्यावरून कांहीं बाबतींपुरते तरी निराळे रिपोर्ट लिहिले जाणें अपरिहार्य जाहलें आहे.

आमचेकडे सोंपविलेले प्रश्न वर नमूद केलेच आहेत. त्याच क्रमानें विचार करून आम्ही पुढें लिहिल्याप्रमाणें शिफारशी करणेची परवानगी घेतों.

# भाग २

## राज्यकारभारविषयक अधिकारदान.

४. जमखंडी संस्थान हें क्षेत्रफळ, उत्पन्न व लोकसंख्या या दृष्टीनें लहान असलें तरी येथील प्रभु सुविद्य असून प्रजाहिततत्पर आहेत. आपल्या प्रजेनें राज्यकारभाराचे बाबतींत अंशभागी होऊन आपणांस मदत करावी अशी श्रीमंत राजासाहेब यांची तीव्र इच्छा असून, त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न, त्यांनीं राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेतल्यापासूनच चालू आहेत. व या दिशेनें कांहीं उपक्रमही पूर्वीच करणेंत आला आहे. आम्हांस असें समजतें कीं, जमखंडी संस्थानांत, स्वतंत्र म्युनिसिपालिट्यांची स्थापना फार वर्षांपूर्वींच जाहली असून, जमखंडी म्युनिसिपालिटीचे बाबतींत लोकनियुक्त सभासदांचें मताधिक्य आणि लोकनियुक्त अध्यक्ष या गोष्टी पूर्वींच साध्य झालेल्या आहेत. आतां तर इतर म्युनिसिपालिट्यांना देखील लोकनियुक्त सभासदांचें मताधिक्य देणेंत आलेलें आहे.

५. ब्रिटिश हिंदुस्थानांत, मॉंटफर्ड रिपोर्टाच्या अनुरोधानें सुधारणा अमलांत आल्यानंतर, तेथील प्रजेस राजकीय अधिकार थोड्या प्रमाणांत प्राप्त झाले. ब्रिटिश हिंदुस्थानांतील राजकीय हक्काबद्दलचा लढा फार वर्षांपासूनच चालत आलेला आहे. त्या गोष्टीशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. परंतु ही गोष्ट खरी कीं, ज्या प्रमाणांत ब्रिटिश हिंदुस्थानांत राजकीय हक्क

मिळविण्याची जाणीव ब्रिटिश प्रजाजनांस उत्पन्न जाहली त्याच प्रमाणांत संस्थानी प्रजेच्या आकांक्षाही वाढूं लागल्या. राजकीय हक्क मिळविण्याची चळवळ संस्थानी प्रजेकडून सुरू जाहली. अर्थातच संस्थानी चळवळीचें स्वरूप ब्रिटिश हिंदुस्थानांतील चळवळीच्या स्वरूपाहून अगदींच भिन्न होतें व तें तसें असावयासही पाहिजे. आपल्या प्रजेच्या वाढत्या आकांक्षा लक्षांत घेऊन जमखंडीच्या प्रजावत्सल प्रभूंनीं ता. १०।६।१९३२ इ. रोजीं महत्त्वाची घोषणा करून जबाबदार राज्यपद्धतीचा उपक्रम करण्याच्या हेतूनें जमखंडी संस्थानांत कायदेमंडळाची स्थापना केल्याचें जाहीर केलें. या घोषणेंत श्रीमंत राजासाहेब यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत:—

" जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचे बाबतींत सर्व दृष्टींनीं पूर्ण विचार करून व प्रजेच्या आकांक्षा जास्तींत जास्त पुरविण्याची दृष्टि ठेवूनच हा कायदा केला आहे. ...............राज्यकारभाराचा गाडा केव्हांही धिमेपणानें व काळजीपूर्वक चालवावा लागतो.........आम्ही आतांच जी जबाबदार राज्यपद्धतीची योजना जाहीर केली आहे ती प्रजेचें हित व आकांक्षा डोळ्यांसमोर ठेवूनच केली आहे. एवढेंच आम्हांस या प्रसंगीं सांगणेचें आहे.... कीं मिळालेल्या हक्कांचा आमचे प्रजाजनांनीं योग्य उपयोग करून घेतल्याचें आम्हांस आढळून आल्यास व राज्यकारभाराचे बाबतींत अधिक प्रमाणांत अंशभागी होण्याची पात्रता प्रजेच्या अंगीं आली आहे असें आम्हांस दिसून येईल तर, हक्कदानाचे बाबतींत पुढची पायरी यथाकाळीं गांठण्यास आम्ही अनुमान करणार नाहीं असें आश्वासन आम्ही आजच्या प्रसंगीं देत आहों." हा उल्लेखित कायदा म्हणजे जमखंडी संस्थानचा सन १९३२ चा कायदा नंबर १ हा होय. याच कायद्यानें जमखंडी संस्थानांत हल्लींचें कायदेमंडळ स्थापन झालेलें आहे.

६. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या या कायद्याची रचना व या कायद्याप्रमाणें झालेली कायदेमंडळाची रचना व मंडळास दिलेले अधिकार यांचें सूक्ष्मपणें निरीक्षण केल्यास, श्रीमंत राजासाहेब यांनीं केलेला हा प्रथमचा उपक्रम देखील महत्त्वाचा आहे असें कबूल करावें लागतें आणि प्रजेला राज्यकारभाराचें शिक्षण देणेचे बाबतींत बरीच प्रगति करणारा आहे असें नमूद करण्यास आम्हांस समाधान वाटतें. हल्लींच्या कायदेमंडळांत एकूण सभासद तीस ३० असून, त्यांत लोकनियुक्त सभासदांचें मताधिक्य आहे, ही गोष्ट तर विशेषच लक्षांत घेणेजोगी आहे. या कायदेमंडळास दिलेले अधिकार काय आहेत आणि ते प्रजेची आकांक्षा पुरी करण्यास आज देखील पुरेसे आहेत कीं कसें या तपशिलांत या ठिकाणीं शिरण्याचें आम्हांस कारण दिसत नाहीं. आम्ही इतकेंच म्हणूं इच्छितों कीं हें कायदेमंडळ आज ८ वर्षें अस्तित्वांत असून मंडळाचें कामकाज चांगल्या प्रकारें चालत आल्याचें दिसतें. आणि राज्यकारभाराचें शिक्षण देणेच्या दृष्टीनें या सुधारणांचा उपयोग पुष्कळच झालेला आहे, ही गोष्ट कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं.

७. आतां श्रीमंत राजासाहेब यांना यापुढची पायरी गांठावयाची आहे. आणि प्रजेच्या आकांक्षा व पात्रता लक्षांत घेऊन अधिकारदानाचे बाबतींत आम्हांस सूचना करावयाच्या आहेत.

ब्रिटिश हिंदुस्थानांत Government of India Act 1935 चा कायदा सांप्रत लागू जाहला असून सर्व प्रांत स्वायत्त जाहले आहेत. प्रांतिक राज्यकारभार पूर्णपणें लोकमतानुवर्ती व्हावा अशी योजना करणेंत आली आहे. मध्यवर्ती राज्यकारभारांत मात्र विशेषशी प्रगति ब्रिटिश हिंदुस्थानांत देखील अद्यापि झालेली नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेणें आतिशय जरूरीचें आहे. तसेंच, या बाबतींत जो नियम ब्रिटिश हिंदुस्थानांत लागूं होणेजोगा आहे, तोच नियम तितक्याच अंशानें आणि तशाच स्वरूपांत संस्थानांत लागूं करतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. संस्थानी प्रजेची पात्रता, जनतेची सामान्य तयारी, त्यांचा राज्यकारभाराचा अनुभव, प्रजेचें, शिक्षण आणि साक्षरतेचा प्रसार, वगैरे गोष्टी ध्यानांत घेऊनच, या बाबतींत पाऊल टाकलें पाहिजे असें आम्हांस निश्चितपणें वाटतें.

८. या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या तर द्विदल राज्यपद्धतीची योजनाच आमचे नजरेसमोर उभी राहते. या योजनेचा अनुभव ब्रिटिश हिंदुस्थानांत यापूर्वींच घेणेंत आलेला आहे. तो अनुभव जमेस धरून देखील, आम्हांस या योजनेच्या स्वीकाराखेरीज अन्य मार्ग दिसत नाहीं. सांप्रतच्या स्थितींत त्याच पद्धतीचा अवलंब केला जाणें इष्ट व श्रेयस्कर आहे असें आम्हांस वाटतें.

९. सन १९१९ सालीं मॉंटफर्ड रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर, त्या अनुरोधानें सन १९१९ चा गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट पास करण्यांत आला आणि ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रांतांत द्विदल राज्यपद्धति सुरूं करणेंत आली. या ठिकाणीं एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवणेसारखी आहे ती ही कीं, ब्रिटिश हिंदुस्थानांत अधिकारदानाचे बाबतींत राज्यकारभाराचे दोन स्वतंत्र विभाग लक्षांत घेऊन सुधारणा अंमलांत आणणेच्या होत्या, ते विभाग असे:—

पहिला विभाग मध्यवर्ती राज्यसत्तेचा व दुसरा विभाग प्रांतिक राज्यसत्तेचा, मॉंटफर्ड योजनेनुसार मध्यवर्ती राज्यकारभारांत प्रजेला विशेष प्रकारचे हक्क मिळावयाचे नव्हते. प्रांतिक राज्यकारभाराचे बाबतींत मात्र प्रजेला बऱ्याच प्रमाणांत राज्यकारभारांत अंशभागी करणारे हक्क देणेचे होते. यामुळें प्रांतिक राज्यसत्तेंत प्रजा अंशभागी तर व्हावी पण मध्यवर्ती राज्यसत्ता तत्त्वतः अभंग रहावी असा दुहेरी हेतु त्यावेळीं ब्रिटिश हिंदुस्थानांत साधावयाचा होता. तसा प्रकार संस्थानांत नाहीं. येथें मध्यवर्ती राज्यसत्ता आणि प्रांतिक राज्यसत्ता असे विभाग पाडण्याचें कारणच नाहीं. संस्थानांत राजासाहेब हेच सर्व सत्तेचें केंद्रस्थान असून राज्यकारभाराचे सर्व अधिकार त्या एकाच व्यक्तींत समाविष्ट जाहलेले आहेत.आणि ते तसे राहणारच. प्रजेच्या हिताची अंतिम जबाबदारी राजावरच असून ती जबाबदारी पार पाडण्याचे सर्व अधिकार राजाकडेच असले पाहिजेत ही गोष्टही अगदीं स्पष्ट आहे. प्रजेला अधिकारदान करावयाचें तें राज्यकारभाराचें शिक्षण प्रजेला मिळून राज्यकारभार प्रजेच्या हिताचा व लोकमतानुवर्ती होण्यास जास्त अवसर मिळावा आणि तितकी जबाबदारी राजाचे शिरावरून क्रमानें कमी व्हावी या हेतूनेंच. वर नमूद केलेल्या गोष्टी ध्यानांत घेतल्या, तर संस्थानांतील परिस्थिति द्विदल राज्यपद्धतीच्या तत्त्वाचा उपक्रम करण्यास ब्रिटिश हिंदुस्थानापेक्षां अधिक

चांगली आहे असें आम्हांस वाटतें. मात्र ब्रिटिश हिंदुस्थानांत या राज्यपद्धतीचे जे दोष दिसून आले ते, तितक्या तीव्र स्वरूपांत येथें दिसून येण्याजोगे नसले तरी, शक्यतोंवर टाळण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

१०. द्विदल राज्यपद्धतीचें तत्त्व एकदम तितकेसें पसंत पडण्याजोगें नाहीं हें आम्ही जाणून आहों. परंतु ही नापसंती गैरसमजामुळें उत्पन्न झाली आहे, आणि तो गैरसमज नाहींसा करतां येईल असें आम्हांस वाटतें. हा गैरसमज कोणता आणि तो नाहींसा करण्याचे उपाय काय याचें विवेचन करण्यापूर्वीं या योजनेचें स्वरूप थोडेसें स्पष्ट करणें जरूर आहे. द्विदल राज्यपद्धति याचा अर्थ, अगदीं थोडक्यांत सांगावयाचा तर, राज्यकारभाराच्या बाबींचे दोन विभाग करावयाचे. एका विभागाचा कारभार राजासाहेबांनीं आपल्या अधिकाऱ्यांच्या विचारानें चालवावयाचा व दुसऱ्या विभागाचा कारभार कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासदांच्या पसंतीच्या मंत्र्यांच्या विचारानें चालवावयाचा हा होय. हीच व्याख्या सन १९१९चा हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचा कायदा ब्रिटिश पार्लमेंटात पास होणेपूर्वीं जी जॉइंट सिलेक्ट कमिटी नेमण्यांत आली होती तिनें पुढील शब्दांत नमूद केली आहे.

"It (The Diarchy scheme) partitions the domain of Provincial Government into two fields, one of which is made over to Ministers chosen from the elected Members of the Legislature while the other remains under the administration of a Governor in Council."

ही साधी व्याख्या लक्षांत घेतली, तर या योजनेचा उच्चार केल्याबरोबर, ती अयशस्वी आहे असें मानून बिचकून जाणेचें काय कारण आहे हेंच आम्हांस समजत नाहीं.

ब्रिटिश हिंदुस्थानांत ही योजना व्हावी तशी यशस्वी जाहली नाहीं ही गोष्ट आम्ही नाकारीत नाहीं. आणि ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकपक्षीय पुढाऱ्यांनीं या योजनेवर केलेली टीका चुकीची आहे असेंही पण आम्हांस ध्वनित देखील करावयाचें नाहीं. या बाबतींत ब्रिटिश हिंदुस्थानांतील अनुभव आम्ही जमेस धरतों. तथापि तिकडे ही योजना पूर्णपणें यशस्वी न होण्यास जीं कारणें घडलीं तीं आमचे संस्थानांत घडणार नाहींत असें आम्हांस वाटतें. आणि म्हणून, ही द्विदल राज्यपद्धतीची योजना संस्थानी राज्यकारभाराचे बाबतींत तितकी अग्राह्य नाहीं असें आमचें मत आहे.

११. ब्रिटिश हिंदुस्थानांत ही योजना पूर्णपणें यशस्वी कां जाहली नाहीं या गोष्टींचा सांगोपांग विचार करण्याची आम्हांला जरूरी वाटत नाहीं; असें असलें तरी, त्या अपयशाचीं मुख्य कारणें कोणतीं हें नमूद करणें अगत्याचें दिसतें. या बाबतींत वर उल्लेखिलेल्या कमिटीनें पुढील विचार नमूद केले आहेत.

"This scheme has evoked apprehensions which are not unnatural in view of its novelty. But the committee, after the most careful consideration of all suggested alternatives, are of opinion that it is the best way of

giving effect to the spirit of the declared policy of His Majesty's Government. Its critics forget that the announcement spoke of a substantial step in the direction of the gradual development of self-governing institution with a view to the progressive realization of responsible Government; and not the partial introduction of responsible Government, and it is this distinction which justifies the method by which the Bill imposes the responsibility both on Ministers to the Legislative Council and on the members of the Legislative Council to their constituents, for the result of that part of administration which is transferred to their charge."

राजासाहेब यांनीं या बाबतींत केलेली घोषणा जर ध्यानीं घेतली तर वर नमूद केलेले विचार त्या घोषणेंतील तत्त्वासही पूर्णपणें अन्वर्थकच आहेत असेंच म्हणावें लागतें. आणि म्हणून द्विदल राज्यपद्धतीचा उपक्रम आमच्या संस्थानांत अयशस्वी होवूं नये असें आम्हांस वाटतें.

१२. खात्यांची विभागणी करून कांहीं खातीं लोकनियुक्त मंत्र्यांच्या स्वाधीन करावयाचा हा द्विदल राज्यकारभाराचा पाया होय. ही योजना अयशस्वी होण्याचीं आमचे मतें मुख्य कारणें दोन आहेत:—

पहिलें आणि मुख्य कारण हें दिसतें कीं, द्विदल राज्यपद्धतींत लोकनियुक्त मंत्र्याच्या हातीं, त्याचेकडे सोंपविलेल्या खात्यांची जोपासना करून, तीं खातीं संपूर्णपणें कार्यक्षम करण्यास लागणारा पुरेसा पैसा मिळत नाहीं. राखीव खात्याच्या कारभारास लागणारा पैसा प्रथमत: ठरविला जातो आणि बाकी राहिलेल्या उत्पन्नांतूनच लोकनियुक्त मंत्र्याला आपल्या खात्यांची संपादणी करावयाची असते. लोकनियुक्त मंत्र्याला आपल्या खात्यापुरतें बजेट कायदेमंडळापुढें मांडून खर्च करावयाच्या रकमांना मंडळाची मंजुरी मिळवावी लागते. हातीं पैसाच अपुरा असल्यानें, त्याला आपली कामगिरी योग्य प्रकारें पार पाडतां येत नाहीं अशी त्याची नेहमीं तक्रार असते. अगदीं वरवर पाहिलें तर ही तक्रार बरोबर आहे असें वाटतें. परंतु थोडासा खोल विचार केला तर संस्थानचे राज्यकारभारांत ही तक्रार वाटते तितकी टिकण्याजोगी नाहीं असें दिसून येईल. एकतर संस्थानचें सर्वच उत्पन्न अगदीं थोडें असल्यानें, राखीव काय अगर सोंपीव काय, सर्वच खात्यांचा कारभार पूर्णपणें यशस्वी आणि समाधानकारक रीतीनें पार पाडावयाचा जाहल्यास, पैशाची अडचण केव्हांही असणारच. दुसरी गोष्ट अशी कीं, राखीव बाबींच्या खर्चाकडे उत्पन्नाचा मोठा भाग ब्रिटिश हिंदुस्थानांत घेतला जात असे. तसाच प्रकार संस्थानांत होईल असें मानण्याचें कारण दिसत नाहीं. सर्व खात्यांचा कारभार सुव्यवस्थित चालावा आणि तो प्रजेच्या हिताचा व्हावा या गोष्टीकडे श्रीमंत राजासाहेब यांना लक्ष दिलेंच पाहिजे. राज्यकारभाराच्या यशस्वितेची अंतिम जबाबदारी श्रीमंत राजासाहेब यांचेवरच राहणार असल्यानें, उत्पन्नाची वांटणी यथाप्रमाण सर्वच खात्यांकडे त्यांना करावी लागणार. कोणत्याही खात्याबद्दल दुजाभाव त्यांना वाटण्याचें कारणच नसल्यानें, राखीव खात्याकडे प्रमाणापेक्षां किंवा वाजवीपेक्षां जास्त रक्कम आणि

सोंपीव खात्यांकडे बाजवीपेक्षां कमी रक्कम, अशी विभागणी एकंदर उत्पन्नांत केली जाईल असें मानण्यास यत्किंचितही जागा नाहीं. राखीव व सोंपीव या दोन विभागांत पैशाची वांटणी यथाप्रमाणच केली जाईल आणि सोंपीव खात्यांकडील सर्व रक्कम लोकनियुक्त दिवाणाकडे दिली जाईल. अर्थातच त्या रकमेंत पोट-विभागणी कशी करावयाची हें स्वातंत्र्य देखील त्या दिवाणांना असणारच. म्हणून सोंपीव खात्याकडे पैसा अगदींच कमी मिळेल अशी भीति बाळगण्याचें कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. संस्थानचें उत्पन्न लहान आहे आणि त्यामुळें सर्वच खात्यांच्या खर्चाकडे रकमा कांहीं अंशानें कमी पडणारच; पण त्या गोष्टीस इलाजच नाहीं. सर्व खातीं आज सोंपीव केलीं तरी देखील, त्यामुळें एकंदर उत्पन्नांत कांहीं वाढ होत नाहीं आणि म्हणून पैसा अपुरा पडतो ही अडचण केव्हांही शिल्लक राहणारच. जें उत्पन्न आहे त्यांतच यथाप्रमाण विभाग करून, त्या प्रमाणांतच खर्च करून सुराज्याचें ध्येय गांठलें पाहिजे. याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

ही द्रव्याची अडचण थोडया अंशानें कां होईना दूर करण्याची आणखी एक योजना आम्हांस सुचवावीशी वाटते. उत्पन्नांत यथाप्रमाण वांटणी करून सोंपीव खात्यांची रक्कम लोकनियुक्त मंत्र्याकडे तर देणेंत यावीच; शिवाय, मंडळाच्या परवानगीनें नवीन कर बसवून देखील, उत्पन्नांत वाढ करण्याची मोकळीक लोकनियुक्त मंत्र्याला असावी. अर्थातच अशा प्रकारचें कोणतेंही बिल मंजुरीसाठीं मंडळापुढें ठेवण्याचे पूर्वीं, तसें करण्यास श्रीमंत राजासाहेब यांच्या मंजुरीची आवश्यकता लागणारच. परंतु अशा तऱ्हेचा उपक्रम करून जास्त पैसा उभा करण्याची परवानगी त्या मंत्र्यास असावी असें आम्हांस वाटतें. मात्र असा प्रयत्न करावयाचा तो त्यानें इतर सरकारी मंत्र्यांच्या सहानुभूतीनें व अभिप्रायानेंच करणें बरें. अशा रीतीनें जो पैसा उभा राहील, त्यांत योग्य ती विभागणी होण्यासही कांहीं हरकत असूं नये. नवीन कराचे रूपानें पैसा उभा करण्याची परवानगी लोकनियुक्त मंत्र्याला दिली गेली तर, पैशाची टंचाई कमी करण्यास त्याला मार्ग राहील आणि अशा रीतीनें पैसा नाहीं ही तक्रार अल्पांशानें कां होईना नाहींशी होईल. ब्रिटिश हिंदुस्थानांत मॉंटफोर्ड रिपोर्टानंतर जी द्विदल राज्यपद्धति अमलांत आणली गेली त्यांत अशा प्रकारची तजवीज केली गेली नव्हती. आमच्या संस्थानांत श्रीमंत राजासाहेब यांनीं ही योजना मान्य केली तर, द्विदल राज्यपद्धतीचा दोष तितक्या अंशानें नाहींसा होईल असें आम्हांस वाटतें.

१३. ब्रिटिश हिंदुस्थानांत द्विदल राज्यपद्धति अयशस्वी होण्याचें दुसरें मुख्य कारण म्हटलें म्हणजे खात्यांच्या दोन विभागांतील मुख्य अधिकाऱ्यांच्यामध्यें राज्यकारभार यशस्वी होण्यास लागणाऱ्या सहकारी तत्त्वाचा (Co-operation) अभाव हें होय.

ब्रिटिश हिंदुस्थानांत या भावनेचा अभाव दिसून आला. तेथें असा प्रकार कां व्हावा आणि दोन्ही विभागांच्या मुख्य अधिकाऱ्यांत सहकार्य कां नसावें या गोष्टीची चर्चा करण्याचें आम्हांस कारण दिसत नाहीं. परंतु या बाबतींत ब्रिटिश हिंदुस्थानांतील परिस्थिति संस्थानांतील परिस्थितिहून अगदींच भिन्न होती असें आम्हांस निश्चितपणें वाटतें. संस्थानांत श्रीमंत राजासाहेब यांचेकडे सर्व खात्यांची अंतिम सत्ता राहणार असल्यानें,

व्यवस्थेच्या दृष्टीनें खात्यांची विभागणी केली तरी त्यांचे बाबतींत त्यांचे चित्तांत न्यूनाधिक भाव असण्याचें कारणच नाहीं. सर्व खात्यांचे अधिकारी श्रीमंत राजासाहेब यांचे नोकरच; म्हणून त्यांचे दरम्यान एकमेकांबद्दल सहानुभूति पूर्णपणें राहण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं, असें आम्हांस वाटतें.

१४. सर्वच खात्यांचा कारभार कार्यक्षम होऊन प्रजेचें हित व्हावें आणि राज्यकारभाराचे बाबतींत प्रजेला अंशभागी होण्याची संधि क्रमानें मिळावी इकडे सर्वांनींच लक्ष ठेवून परस्परांच्या सहविचारानें आणि सहानुभूतीनें श्रीमंत राजासाहेब यांचे आज्ञेप्रमाणें वागण्याची प्रथा जर मंत्र्यांनीं व अधिकाऱ्यांनीं ठेवली तर सर्व राज्यकारभार चांगल्या प्रकारें चालण्यास अडचण पडूं नये. या रीतीनेंही द्विदल राज्यपद्धतींतील दोष नाहींसा होईल असें आम्हांस वाटतें.

ब्रिटिश हिंदुस्थानांत द्विदल राज्यपद्धति सुरू करते वेळीं, या पद्धतींत पुढें उत्पन्न होणारा सहकार्याच्या आणि परस्पर विश्वासाच्या अभावाचा दोष, तो कायदा करतेवेळीं बिलाचा विचार करणेसाठीं जी संयुक्त पार्लमेंटरी कमिटी नेमण्यांत आली होती, त्या कमिटीच्या नजरेसमोर होता ही गोष्ट विशेष रीतीनें ध्यानांत घेण्याजोगी आहे. हा दोष होतां होईल तो टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असेंच कमिटीनें आपल्या रिपोर्टांत सुचविलें आहे. याबद्दल सदर कमिटीचे उद्गार पुढीलप्रमाणें आहेत:—

"The Committee will indicate in the course of this Report how they visualise the relations between the two parts of the Provincial Government but they wish to place in the forefront of Report their opinion that they see no reason why the relations should not be harmonious and mutually advantageous. They regard it as of the highest importance that the Governor should foster the habit of free consultation between both halves of his government and indeed that he should insist upon it in all important matters of common interest. He will thus ensure that Ministers will contribute their knowledge of the People's wishes and susceptibilities and the Members of His Excutive Council their administrative experience, to the joint wisdom of the Government."

(Para 5 of the Report.)

दुर्दैवानें ब्रिटिश हिंदुस्थानांत कमिटीची भीति कांहीं प्रमाणांत खरी ठरली परंतु संस्थानांतील राज्यघटना आणि परिस्थिति मूलतः ब्रिटिश हिंदुस्थानांतील परिस्थितीप्रमाणें निराशाजनक नसल्यानें तसा प्रकार संस्थानांत होणार नाहीं असें मानण्यास हरकत नाहीं.

१५. वरील विवेचनावरून द्विदल राज्यपद्धतींत दोष कांहींच नाहींत आणि तीच पद्धत सर्वांशांनीं चांगली आहे असा आमचा अभिप्राय आहे अशी समजूत कोणीही करून घेऊं नये. या पद्धतींत दोष आहेत हें आम्ही जाणतों; असें असूनही हीच पद्धत तूर्त चालूं व्हावी असें आम्ही म्हणतों. कारण सांप्रतच्या परिस्थितींत आम्हांला याहून अधिक

चांगली अशी राज्यपद्धति सुचवितां येत नाहीं. आमचेपुढें जाहलेल्या कांहीं साक्षीदारांनीं संस्थानांत ताबडतोब संपूर्ण प्रजासत्ताक राज्यपद्धति चालू करावी अशी मागणी केली आहे. आणि आम्हीं सभासदांपैकीं कांहीं जणांनां हीच एक कल्पना पसंतही आहे. परंतु ही एकांतिक मागणी मान्य करण्याजोगी आहे असें आम्हांला वाटत नाहीं. याची विस्तृत चर्चा आम्हीं पुढें केलीच आहे. तूर्त या ठिकाणीं आम्ही इतकेंच म्हणतों कीं, जमखंडी संस्थानांत पूर्ण जबाबदार राज्यपद्धति चालू करणेची वेळ अद्यापि आलेली नाहीं. म्हणून, सांप्रतच्या परिस्थितींत द्विदल राज्यपद्धतीचाच उपक्रम करून पाहणें श्रेयस्कर आहे असें आम्हांस वाटतें. यासाठीं याच पद्धतीचा उपक्रम केला जावा अशी आमची शिफारस आहे.

१६. संपूर्ण प्रजासत्ताक राज्यपद्धतीची मागणी मान्य करण्याजोगी प्रजेची शैक्षणिक लायकी अगर पात्रता नाहीं व परिस्थितिही तशी नाहीं असें, आम्हांस स्पष्टपणें वाटतें. श्रीमंत राजासाहेब यांचे आधिपत्याखालीं पूर्ण जबाबदार राज्यपद्धतीचें ध्येय, श्रीमंत राजासाहेब यांनीं आपल्या नजरेपुढें ठेविलें आहे ही गोष्ट खरोखरीच अभिनंदनीय असून त्याबद्दल आम्ही प्रजेनें श्रीमंतांचें ऋणीच राहिलें पाहिजे. परंतु हें अंतिम ध्येय असून तें ध्येय यथाप्रमाण व यथावकाशांतच गांठावयाचें आहे. अर्थातच आजच हें ध्येय अमलांत आणणेजोगी परिस्थिति असती तर तशी शिफारस करण्यास आम्हांस अतिशयच आनंद वाटला असता; परंतु एकंदर परिस्थिति लक्षांत घेतली तर तशी शिफारस करण्यास आमचें मन धजत नाहीं. राज्यकारभाराची जबाबदारी पूर्णपणें अंगावर घेऊन ती पार पाडण्यास जनता लायख असली पाहिजे. प्रजेनें निवडून दिलेले सभासद कायदेमंडळांत बसणार आणि सभासदांच्या इच्छेप्रमाणें लोकनियुक्त मंत्र्यांना कारभार चालवावा लागणार. अशा स्थितींतच निवडून आलेले सभासद पूर्णपणें लायख असल्याखेरीज राज्यकारभार यशस्वी होणार नाहीं. प्रजेला सामान्यपणें मतदानाचा अधिकार दिला तरी तो अधिकार योग्य प्रकारें वापरण्याची योग्यता अगर जागरूकता प्रजेमध्यें उत्पन्न जाहल्याखेरीज योग्य सभासदच निवडून येतील अशी खात्री बाळगतां येत नाहीं. मतदानाचा अधिकार ही फार मोठी शक्ति आहे. तिचा उपयोग योग्य प्रकारें केल्यास प्रजेचें कल्याण होईल, पण तसा उपयोग केला गेला नाहीं आणि कायदेमंडळांत योग्य लोक निवडून आले नाहींत तर, मंत्रिमंडळाचा कारभार यशस्वी होणार नाहीं ही गोष्ट निश्चित होय. प्रजा संपूर्णपणें लायख आहे कीं नाहीं ही गोष्ट अनुभवानेंच ठरणारी असली तरी ती कसोटी पाहण्यास इतरही कांहीं गमकें आहेतच. प्रजेची शैक्षणिक लायखी हें एक त्यांपैकींच मुख्य गमक आहे. जमखंडी संस्थानची प्रजा सन १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें ११४२७० आहे. पुढील वर्षाच्या खानेसुमारींत ही संख्या शेंकडा १० या प्रमाणांत वाढेल असा अंदाज करण्यास हरकत नाहीं. तथापि, आपण गेल्या खानेसुमारीचाच आंकडा स्वीकारून या गोष्टीचा विचार करूं. या प्रजेपैकीं लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांची संख्या केवळ ७२१७ इतकीच आहे म्हणजे जमखंडी संस्थानांत साक्षरतेचें प्रमाण शेंकडा ६·३ इतकेंच आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत व इतर कांहीं संस्थानांतही हें प्रमाण याहून बरेंच अधिक आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली तर शैक्षणिक लायखीच्या दृष्टीनें, आमच्या संस्थानची प्रजा संपूर्णपणें जबाबदार राज्यपद्धतीचे अधिकारदानास पात्र जाहली आहे, असें दिसत नाहीं.

१७. जबाबदार राज्यपद्धतीच्या कामाचा अनुभवही प्रजेस अद्यापि यावा तितका आलेला नाहीं असें दिसतें. जमखंडी शहरांत व संस्थानांत अन्य ठिकाणीं म्युनिसिपालिट्यांची स्थापना झालेली आहे. या सर्व स्थानिक संस्थांत, लोकनियुक्त सभासदांचें संख्याधिक्य असून, आपला अध्यक्षही निवडण्याचा अधिकार त्यांपैकीं कांहींना दिलेला आहे अशी माहिती आम्हांस मिळते. असें असलें तरी, या संस्थांचा कारभार पूर्णपणें समाधानकारक रीतीनें चालला आहे असें मात्र म्हणवत नाहीं ही खेदाची गोष्ट होय. असें होण्याचें कारण अद्यापि लोकांना अशा तऱ्हेच्या कारभाराचा अनुभव नाहीं हेंच होय. प्रजेला सुधारणेचे हक्क देणें आणि प्रजेनें ते राजापासून मिळविणें, ही गोष्ट परस्परांच्या विचारविनिमयावर आणि सहकार्यावर अवलंबून असणारी आहे. शिवाय सुराज्य आणि स्वराज्य असा जो वाद ब्रिटिश हिंदुस्थानांत आहे तो संस्थानांत असण्याचें कारणच नाहीं. संस्थानांत स्वराज्यच आहे आणि सुराज्याचे दृष्टीनें लोकांना राज्यकारभारांत अंशभागी करण्याचें ध्येय गांठावयाचें आहे. अर्थातच, पात्रतेशिवाय या ध्येयाचीच एकदम मागणी करणें हिताचें होईल असें आम्हांस वाटत नाहीं. प्रजा तितक्या प्रमाणांत पात्र जाहली तर संपूर्ण अधिकाराचें दान श्रीमंत राजासाहेब मोठ्या आनंदानें करतील याबद्दल आम्हांस संशय वाटत नाहीं. परंतु तितकी पात्रता येईपर्यंत घाई करण्यांत तात्पर्य नाहीं. राज्यकारभाराचा अनुभव क्रमानेंच मिळणार आहे आणि जसजशी पात्रता येईल तसतशी अधिकाराची मागणी करणें आणि श्रीमंत राजासाहेब यांनीं ती पुरविणें, हीच गोष्ट निःसंशय प्रजेच्या हिताची होय असें आम्हांस वाटतें.

१८. ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रांतिक सरकारें सन १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टाप्रमाणें पूर्ण स्वायत्त झालेलीं आहेत ही गोष्ट खरी आहे आणि हेंच ध्येय संस्थानी प्रजेनेंही आपल्यापुढें ठेवणें ही गोष्ट क्रमप्राप्तच आहे. तथापि, ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रजेला प्रांतिक स्वायत्ततेचे अधिकार क्रमानेंच मिळाले आहेत आणि हे अधिकार मिळण्यापूर्वी, तेथें देखील द्विदल राज्यपद्धतिच अंमलांत होती ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. याचा अर्थ असा नव्हे, कीं राजकीय ध्येय गांठण्यास ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रजेस जितकीं वर्षें लागलीं तितकीं वर्षें संस्थानी प्रजेस लागलींच पाहिजेत. ब्रिटिश हिंदुस्थानांतील दाखला घ्यावयाचा तो एवढ्याचकरितां, कीं स्वराज्याचें पूर्ण अधिकारदान प्रजेच्या पात्रतेवरच अवलंबून असणार, हा सिद्धांत कोठेंही अबाधितच आहे, हें दाखविणेसाठीं.

१९. तसेंच, हिंदुस्थानांत सुमारें लहानमोठीं अशीं ६५० संस्थानें आहेत. यांपैकीं कांहीं संस्थानें शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक, अगर राजकीय बाबतींत निःसंशय बरींच पुढारलेलीं आहेत. साक्षरतेचें प्रमाण, कित्येक संस्थानांत जमखंडीपेक्षां निःसंशय अधिक आहे. असें असून देखील आज हिंदुस्थानांतील कोणत्याही संस्थानांत पूर्ण जबाबदार राज्यपद्धति अगर पूर्ण स्वायत्तता अमलांत आलेली नाहीं ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. तेथील प्रजेस स्वराज्याचे अधिकार नको आहेत असें नाहीं आणि त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्नही चालू आहेत. ज्या साक्षीदारांनीं आमच्यापुढें पूर्ण स्वराज्याची एकांतिक मागणी केली आहे त्यांचेंही म्हणणें, जमखंडी संस्थानची प्रजा इतर संस्थानी प्रजेपेक्षां किंवा ब्रिटिश प्रजेपेक्षां

विशेष लायख आहे आणि म्हणून पूर्ण जबाबदार राज्यपद्धति जमखंडी संस्थानांत आतांच चालूं करणेंत यावी, असें नाहीं. इतर संस्थानांत ही राज्यपद्धति चालूं असो वा नसो आमचें मागणें असें आहे, इतकेंच म्हणून हे साक्षीदार मोकळे जाहले आहेत. हें त्यांचें मागणें अभिनंदनीय असलें तरी मान्य करणें अवघड आहे.

२०. आमच्यापैकीं कांहीं सभासद या बाबतींत आमच्याशीं सहमत नाहींत हें वर नमूद केलेंच आहे. अर्थात्‌च कोण चूक अगर कोण बरोबर हा प्रश्न येथें नाहीं. परंतु एक गोष्ट मात्र लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, आमच्यापैकीं हे सन्मान्य सभासद, जमखंडी संस्थान-प्रजापरिषदेचे सभासद आहेत आणि प्रजापरिषदेच्या वर्किंग कमिटीनें हीच मागणी कमिटीपुढें ठेवावी असा सभासदांना आदेश दिला आहे. यामुळें स्वतंत्र अभिप्राय देणेचे बाबतींत त्यांची स्थिति थोडीशी अडचणीची होणेचाही संभव आहे. या आमच्या विधानांस कांहीं साक्षीदारां-कडून पुष्टी मिळाली आहे ही गोष्ट आम्ही नमूद करूं इच्छितों. आम्ही पुन्हां नमूद करण्याची परवानगी घेतों कीं आमच्याशीं जे सहमत नाहींत त्यांचे मताबद्दल आम्हांस आदर वाटतो आणि कोणाचें म्हणणें चूक व कोणाचें बरोबर, याबद्दल विवेचन करून या वादांत या ठिकाणीं शिरणें आम्हांस अप्रशस्त वाटतें. सबब तसें करण्याचे भरीस पडत नाहीं. तसेंच जमखंडी संस्थानच्या प्रजेच्या लायखीच्या दृष्टीनें इतर संस्थानी प्रजेच्या बरोबर जी तुलना अगदीं थोडक्या प्रमाणांत कां होईना आम्हीं वर केली आहे त्यांत जमखंडी प्रजेचा अधिक्षेप करण्याचा आमचा हेतु नाहीं. आजच संपूर्ण अधिकार वापरणेची प्रजेची तयारी नाहीं इतकेंच दाखविणेसाठीं आम्हांस थोडेसें तुलनात्मक विवेचन करावें लागलें आहे.

२१. म्हणून, तूर्त श्रीमंत राजासाहेब यांनीं द्विदल राज्यपद्धतीचा प्रारंभ संस्थानांत अविलंबें करून करावा अशी आमची आग्रहाची शिफारस आहे. द्विदल राज्यपद्धति म्हणजे राज्यकारभाराच्या खात्यांची विभागणी हें आम्हीं वर नमूद केलेंच आहे. आमचे मतें ही विभागणी कशी असावी म्हणजे राखींव खात्यांत कोणत्या खात्यांचा समावेश व्हावा आणि सोंपीव खात्यांचा गट कसा असावा याबद्दल स्पष्टीकरण करणारें परिशिष्ट ( परिशिष्ट दुसरें ) आम्हीं सोबत जोडलें आहे. त्याप्रमाणें खात्यांची विभागणी करणेंत यावी अशी आमची शिफारस आहे.

२२. खात्यांची विभागणी केल्यानंतर, आर्थिक विभागणी ही आपोआपच करावी लागणार. संस्थानचें उत्पन्न थोडें आहे पण आहे या उत्पन्नांतच शक्य त्या उपायानें व्यवस्था केली पाहिजे. जीं खातीं राखीव आहेत त्यांचा खर्च भागण्यासाठीं तितकी रक्कम उत्पन्नाच्या रकमेंतून बाजूस काढली पाहिजे. शिवाय, ज्या ज्या रकमांचे संस्थानी खजिन्यावर बोजे आहेत त्या सर्व रकमा देणेची तजवीज प्रथम जाहली पाहिजे. या बाबी स्थूलमानानें पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत.

( १ ) ब्रिटिश सरकारास द्यावयाची खंडणी.
( २ ) संस्थानाकडून दिल्या जाणाऱ्या तैनातीच्या रकमा.

(३) देवस्थान कदीम इनामाच्या अगर खर्चाच्या रकमा.
(४) नोकरलोकांचे पगार आणि पेन्शनें.
(५) राजकीय पेन्शन किंवा राजेसाहेब यांचे आप्त व त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या इसमांना द्यावयाच्या रकमा.
(६) संस्थानास कर्ज असल्यास ती रक्कम.
(७) कोणत्याही कायद्यानें अगर कायद्याखालीं निश्चित केलेल्या द्यावयाच्या रकमा.
(८) पूर्वी घेतलेल्या जबाबदाऱ्या.
(९) राजेसाहेबांचा खासगी खर्च ( प्रिव्हिपर्स ).
(१०) राजेसाहेब यांच्या खासगी खर्चासाठीं म्हणून निर्दिष्ट केलेल्या रकमा.

संस्थानचें जें वट्ट उत्पन्न आहे त्यांतूनच वर नमूद केलेल्या बाबींच्या खर्चाची तजवीज प्रथम करण्यांत येऊन नंतर राहील ती रक्कम सोंपीव खात्याकडे व राखीव खात्याकडे विभागून देणेची आहे.

**२३.** श्रीमंत राजासाहेब यांच्या खासगी खर्चाचे रकमेबद्दल आम्ही या ठिकाणीं दोन शब्द लिहिण्याची परवानगी घेतों. श्रीमंत राजासाहेब यांनीं खासगी खर्चासाठीं म्हणून अमूकच रक्कम घ्यावी असें म्हणण्याचा अधिकार आम्हांस नाहीं आणि तसें करण्याची आम्हांस जरूरीही पण दिसत नाहीं. संस्थानचें उत्पन्न थोडें आहे आणि राज्यकारभाराच्या निरनिराळया खात्यांचा कारभार सुव्यवस्थितपणें आणि कार्यक्षम रीतीनें चालावा ही गोष्ट लक्षांत घेऊन, श्रीमंत राजासाहेब यांनीं कृपाळू होऊन आपल्या खासगी खर्चाच्या रकमेचें प्रमाण शक्य तितकें कमी करावें इतकीच आमची विनंति आहे. श्रीमंत राजासाहेब यांचे इभ्रतीचे मानानें आणि त्यांच्या जरूरीचे मानानें खर्चाच्या रकमेची तजवीज झाली पाहिजे याबद्दल वाद नाहीं. परंतु ही रकम किती असावी हें एकवार श्रीमंत राजासाहेब यांनीं ठरवून टाकावें. वट्ट उत्पन्नाचा कितवा अंश या खर्चासाठीं घ्यावा हें एकवार निश्चितपणें ठरविणेंत आलें म्हणजे त्या अनुरोधानें बाकीचें बजेट तयार करणेस अडचण राहणार नाहीं. श्रीमंत राजासाहेब हे 'आपल्या प्रजेचें जें हित तेंच आपलें हित' ही गोष्ट सदैव चित्तांत ठेवूनच वागत आले आहेत आणि जरूरीच्या प्रसंगीं अडचण सोसूनही आपला खासगी खर्च कमी करण्याची गोष्ट त्यांनीं कृतीनें अमलांत आणली आहे. आपल्या खर्चांत शक्य तितकी बचत करून राहील ती सर्व रक्कम प्रजेच्या हितासाठींच खर्च करण्याकडे त्यांची प्रवृत्तिच आहे. आम्हांस इतकेंच म्हणावयाचें आहे कीं, आतां द्विदल राज्यपद्धतीचा उपक्रम सुरू होत असल्यानें, राष्ट्रसंवर्धक खात्याकडे खर्च करण्यास लोकनियुक्त मंत्र्यास शक्य तितकी जास्त रक्कम मिळावी ह्यासाठीं श्रीमंत राजासाहेब यांनीं कृपाळू होऊन, थोडीशी अडचणही सोसून, आपल्या खासगी खर्चाचें प्रमाण शक्य तितकें कमी करावें आणि ही गोष्ट एकवार कायमची निश्चित करावी अशी आमची त्यांना नम्र विनंति आहे. द्विदल राज्यपद्धति सुरू झाल्यानंतर, सोंपीव खात्याकडे पुरेसा पैसा दिला गेला नाहीं तर ती पद्धति अयशस्वी होणेचा संभव विशेष असतो. ही गोष्ट अगदीं स्पष्टपणें आम्ही

श्रीमंत राजासाहेब यांचे नजरेस आणणेची परवानगी घेतों. आणि असें न व्हावें म्हणून आमची त्यांना नम्र पण आग्रहाची विनंति आहे कीं,संस्थानच्या उत्पन्नाच्या बाबी मर्यादित आहेत ही गोष्ट ध्यानीं आणून, त्यांनीं आपल्या खाजगी खर्चांत शक्य तितकी कपात करावी आणि आपल्या खर्चाकडे घ्यावयाचे उत्पन्नांतील प्रमाण शक्य तोंवर कमी ठेवावें. असें करण्याशिवाय दुसरा मार्ग आम्हांस दिसत नाहीं. म्हणून ही सूचना आम्ही नम्रपणें नमूद करूं इच्छितों.

२४. संस्थानच्या उत्पन्नांतील जो भाग सोंपीव खात्यांच्या वांटणीला येईल त्यामध्यें लोकनियुक्त मंत्र्यानें आपलें बजेट बसविणेचें आहे. अर्थांतच, या गटांतील निरनिराळ्या खात्यांकडे रकमांची विभागणी कशी करावी हा प्रश्न त्यांनीं सोडविणेचा आहे. आपलें बजेट कायदेमंडळाकडून मंजूर करून घेण्याची जबाबदारी त्यांचेवर आहे. शिवाय नवीन कराची योजना आंखून, ती मंडळाकडून मंजूर करून घेऊन, उत्पन्न वाढविणेचाही अधिकार लोकनियुक्त मंत्र्यांना देणेंत यावा हें आम्हीं वर सुचविलेंच आहे. अशा रीतीनें आर्थिक बाबींची व्यवस्था जाहली म्हणजे पुष्कळ अडचणी दूर होतील असा आमचा अंदाज आहे.

२५. लोकनियुक्त मंत्रि संस्थानच्या अधिपतीस तर जबाबदार आहेतच, परंतु कायदेमंडळालाही ते जबाबदार असले पाहिजेत. या मंत्र्यांना जरूर तेव्हां कोणताही हुकूम करण्याचा अगर कामावरून दूर करण्याचा अधिकार राजेसाहेब यांना केव्हांही असणारच. परंतु त्याचेवर अविश्वास व्यक्त करून त्याला कामावरून दूर करण्याची विनंति करण्याचा अधिकार, कायदेमंडळालाही असणें अगत्याचें आहे. याचाच अर्थ तो मंत्रि कायदेमंडळाला जबाबदार असला पाहिजे हा होय. कायदेमंडळाचा विश्वास संपादन करणाऱ्याचीच नेमणूक राजेसाहेब यांना मंत्रिपदावर करावी लागेल आणि मंडळाचा आपणावर विश्वास नाहीं असें समजल्याबरोबर, त्या मंत्र्यानें आपली जागा रिकामीच केली पाहिजे. याबद्दल काय नियम असावेत आणि कशी व्यवस्था करणेंत यावी या तपशिलांत आम्हांस या ठिकाणीं शिरावयाचें नाहीं. आम्हांस इतकेंच नमूद करावयाचें आहे कीं द्विदल राज्यपद्धतींत लोकांचा प्रतिनिधि मंत्रि जसा संस्थानच्या अधिपतींना जबाबदार असला पाहिजे तसाच तो कायदेमंडळालाही जबाबदार असला पाहिजे.

२६. लोकनियुक्त मंत्रि मुख्यतः कायदेमंडळाला जबाबदार असला तरी राखीव खात्यांचे अधिकारी व तो यांचेमध्यें केव्हांही सहकार्य व सलोखा असणें अगत्याचें आहे. त्याशिवाय, त्याचा कारभार समाधानकारक होणार नाहीं असें आम्हांस वाटतें. याचा अर्थ असा नाहीं कीं मंत्र्यानें केव्हांही, आपल्या सहकारी बंधूंच्या अभिप्रायाप्रमाणेंच वागावें. आपल्या खात्यापुरता श्रीमंत राजासाहेब यांचे हुकमतीस पात्र राहून, तो स्वतंत्र आहे आणि स्वतंत्रपणें आपल्या खात्यांचा कारभार करण्यास तो मुखत्यार आहे; तथापि एकमेकांत सलोखा रहावा आणि निष्कारण अडचणी उत्पन्न होऊं नयेत म्हणून होतां होईल तों, आपल्या सहकारी बंधूंशीं सलोखा ठेवण्याचा त्यानें प्रयत्न करावा. सोंपीव खात्याचा कारभार करणारा मंत्रि निराळा आणि राखीव खात्यावरील अधि-

कारी निराळे अशी विभागणी झाली तरी, एकंदर राज्ययंत्र अविभाज्यच राहिलें पाहिजे. या दोन भागांचा संबंध परस्परांशीं नाहीं असा दुजाभाव अगर देखावा निर्माण होतां उपयोगी नाहीं. म्हणून लोकांच्या मंत्र्यानें कोणतीही योजना मंडळापुढें मांडण्याचे वेळीं अगर आपल्या खात्यांचें बजेट, मंजरीसाठीं, मंडळापुढें मांडण्याचे वेळीं, प्रथम त्या बाबतींत इतर खात्यांच्या अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा आणि वाटाघाट करावी. विचारविनिमयानें पुष्कळच दोष नाहींसे होतात आणि पूर्वी न दिसलेल्या अडचणी निदर्शनास येतात, असा अनुभव आहे. आपल्या सहकाऱ्यांचा अभिप्राय मंत्र्याला अनुकूल पडला तर उत्तमच आहे. अभिप्राय विरुद्ध पडला तरी, आपल्या स्वतःच्या अभिप्रायाप्रमाणें वागण्याची पूर्ण मोकळीक त्याला आहेच. परंतु प्रथम वाटाघाट होऊन, विचारविनिमय व्हावा अशाबद्दलची तजवीज कायद्यांत व नियमांतच करणेंत यावी असें आम्हांला वाटतें. लोकांच्या मंत्र्यानें केवळ आपल्या स्वतःच्या खात्याकडे दृष्टि ठेवून भागणार नाहीं. आपल्या खात्यांचे बाबतींत, त्यानें आखलेली योजना कदाचित दुसऱ्या खात्याच्या कारभाराशीं विसंगत असूं शकेल किंवा दुसऱ्या खात्यांना हानिकारकही असण्याचा संभव आहे. अशा प्रसंगीं, प्रथमच वाटाघाट होऊन विचारविनिमय जाहल्यास, सर्व गोष्टी आपोआपच स्पष्ट होतात आणि कोणासच अडचण न होतां, कार्यभाग सिद्धीस जातो. म्हणून, आम्ही मंत्रि व अधिकारी यांचेमध्यें विचारविनिमय व वाटाघाट होणेसाठीं, कायद्यांत व नियमांत तरतूद असावी असें म्हणतों. आम्ही हें स्पष्ट करूं इच्छितों कीं, असें करण्यांत लोकांच्या मंत्र्याच्या कारभारांत इतरांना अतिक्रमण करण्याची संधि मिळावी असा आमचा हेतु नाहीं. लोकनियुक्त मंत्रि आपल्या खात्यापुरता केव्हांहि स्वतंत्रच राहावयाचा आहे.

२७. लोकांच्या मंत्र्याला आपल्या खात्यापुरता स्वतंत्र व पूर्ण अधिकार असणारच, तथापि, सार्वजनिक हिताचे दृष्टीनें आणि सर्वच राज्यकारभार प्रजेच्या हिताचा व्हावा म्हणून, या बाबतींत देखील मूलतःच कांहीं निर्बंध असणें आम्हांस जरूरीचें वाटतें. अशा निर्बंधांची यादी येथें देतां येणार नाहीं. त्यांची व्यवस्था कायद्यांत व नियमांत करावी लागेल. तसेंच लोकनियुक्त मंत्र्याचे अधिकाराचे बाबतींत व कर बसविण्याचे बाबतींत आणि संस्थानच्या उत्पन्नास बाध येईल अशा सूचना मंडळापुढें आणणेचे बाबतींत योग्य ते निर्बंध असणें आम्हांस जरूरीचें वाटतें. या गोष्टींचा विस्तृत रीतीनें विचार, सुधारणा कायदा व त्या खालील नियम करतांना करावा लागेल. याबद्दलचे स्पष्ट निर्बंध त्या कायद्यांत समाविष्ट करावे लागतील; तसेंच लोकनियुक्त मंत्र्यानें आपल्या कामाची दिशा कशी ठरवावी आणि आपले अधिकार कसे व कशा प्रमाणांत वापरावे याबद्दल श्रीमंत राजासाहेब यांनीं त्याला सूचना-पत्रक (Instrument of Instruction) द्यावें असेंही आम्हांस वाटतें.

२८. वर नमूद केल्याप्रमाणें तजवीज झाल्यास द्विदल राज्यपद्धति देखील लोकांच्या हिताची होईल आणि यशस्वी होईल असें आम्हांस वाटतें. मात्र प्रत्येक बाबतींत सरकारशीं सहकार्य करून, बेबनाव उत्पन्न न होऊं देण्याकडे सर्वांचेंच लक्ष पाहिजे. असें असलें तरी, मतभेदाचे प्रश्न उत्पन्न होतील आणि सहकार्य देखील कांहीं बाबतींत केलें

जाणार नाहीं ही गोष्ट आम्ही जाणून आहों. सोंपीव खात्यांचा कारभार चांगल्या प्रकारें चालेनासा जाहला अगर तो कारभार करण्याचें लोकनियुक्त मंत्र्यानें नाकारलें किंवा तो कारभार आपले हातीं घ्यावयाचा नाहीं किंवा त्या कामाबद्दल मंत्र्याची नेमणूक करण्याचीच नाहीं असा आग्रह कायदेमंडळानें अगर मंडळांतील मताधिक्य असणाऱ्या पक्षानें धरला तर सर्व सोंपीव खातीं आपल्या हातीं घेऊन त्या खात्यांचा कारभार श्रीमंत राजासाहेब यांना चालवावा लागेल. तरी, असा प्रसंग उत्पन्न जाहला तर, राज्यकारभाराची तजवीज काय करणेची, याबद्दलही व्यवस्था सुधारणा कायद्यांत करणेंत आली पाहिजे. असे प्रसंग जाणूनबुजून उत्पन्न केले जातील अगर परिस्थितीनें आपोआपच उत्पन्न होतील. परंतु कोणत्याही प्रसंगीं राज्यकारभाराचा गाडा अडून बसतां कामा नये. यासाठीं योग्य ती तजवीज, प्रथमच सुधारणा कायद्यांत करणेंत येणें अगदीं अगत्याचें आहे. तसेंच साक्षात् अडवणूक नसली तरी कांहीं प्रसंग असेही उत्पन्न होणेचा संभव आहे कीं ज्यावेळीं श्रीमंत राजासाहेब यांना द्विदल राज्यपद्धति तात्पुरती अगर कायमची रहित करून, सर्व कारभार आपल्या हातीं घ्यावा लागेल. असे प्रसंग कोणते आणि याबद्दल नक्की तजवीज काय करणेची या तपशिलांत शिरण्याचें आम्हांस कारण नाहीं. तो प्रश्न, ज्यावेळीं याबद्दलचा कायदा व नियम करणेंत येतील, त्या वेळचा आहे. तूर्त आम्ही इतकेंच म्हणतों कीं सर्व राज्यकारभाराची अंतिम जबाबदारी श्रीमंत राजासाहेब यांचेच शिरावर असल्यानें, अशा कोणत्याही प्रसंगीं, परिस्थितीप्रमाणें जरूर ते कोणतेही हुकूम देणेचा आणि सोंपीव खात्यांच्या कारभाराची देखील कोणत्याही प्रकारची व्यवस्था करणेचा अधिकार श्रीमंत राजासाहेब यांना असलाच पाहिजे.

२९. तसेंच कायद्याबाबतच्या शिफारशी करण्याचा अधिकार कायदेमंडळास असणारच. कायदेमंडळाचे ठराव बंधनकारक नसून केव्हांही शिफारशीच्या स्वरूपाचेच असणार. त्याचप्रमाणें कायदेमंडळांत पास जाहलेलीं कायद्याबद्दलचीं बिलें श्रीमंत राजासाहेब यांचे मंजुरीशिवाय कायद्याचें स्वरूप धारण करूं शकणार नाहींत ही गोष्ट उघडच आहे. कायदेमंडळास याबाबतींत कसेही अधिकार असले तरी, कोणत्याही प्रसंगीं आणि कोणत्याही स्वरूपाचा कायदा, मंडळाचा अभिप्राय न घेतां देखील करण्याचा अगर कोणताही हुकूम करण्याचा अधिकार श्रीमंत राजासाहेब यांना असणें जरूरीचें आहे. द्विदल राज्यपद्धति सुरू जाहली तरी देखील, श्रीमंत राजासाहेब यांचा हा अंगभूत अधिकार नाहींसा होणार नाहीं अशाबद्दलचीही योजना सुधारणा कायद्यांत असणें जरूरीचें आहे, ही गोष्टही आम्ही या ठिकाणीं नमूद करूं इच्छितों.

३०. तसेंच, कांहीं विशिष्ट बाबींबद्दल कायदेमंडळाला ठरावाच्या अगर बिलांच्या अगर प्रश्नांच्या रूपानें चर्चा करतां येणार नाहीं. अशा बाबी कोणत्या तें ठरवावें लागेल आणि या बाबतींत जो कायदा करावयाचा त्यांत त्या सर्व बाबी समाविष्ट कराव्या लागतील. त्या बाबी निश्चित करून त्या सुधारणा कायद्यांत समाविष्ट करणेंत याव्यात.

३१. त्याचप्रमाणें संस्थानच्या उत्पन्नावर कांहीं बाबींच्या खर्चांचा पहिला चार्ज राहील. त्या बाबी कोणत्या असाव्यात याचाही विचार होऊन त्यांचाही समावेश सुधारणा–कायद्यांत होणें जरूरीचें आहे. या बाबतींत होणारा खर्च प्रथम भागवूनच, नंतर बाकीच्या उत्पन्नाची विभागणी करावी लागेल आणि सोंपीव व राखीव खात्यांच्या खर्चाकडे रकमा निर्दिष्ट कराव्या लागतील. याबद्दलची सर्व तजवीज सुधारणा कायद्यांत होणें अगत्याचें दिसतें.

उत्पन्नाची अंदाजी रक्कम, सालोसाल त्या त्या परिस्थितीप्रमाणें धरून, त्याप्रमाणें खर्चाची विभागणी करावी लागेल. त्यांतही पुन्हां राखीव व सोंपीव अशा सर्वच खात्यांबद्दलच्या खर्चाच्या कांहीं रकमा निश्चित स्वरूपाच्या असणारच. त्याबद्दलची तजवीज प्रथम करावी लागेल. ती केल्यानंतर बाकीच्या उत्पन्नाच्या रकमेंत खर्चाची विभागणी करावी लागेल. या सर्व बाबींचा तपशील अर्थातच येथें देणें शक्य नाहीं व इष्टही नाहीं. याबद्दलची सर्व तजवीज सुधारणा कायद्यांत व त्याखालीं करण्यांत येणाऱ्या नियमांत करावी लागेल.

३२. सोंपीव व राखीव खात्यांमध्यें उत्पन्नाची वांटणी होऊन खर्चाचें प्रमाण निश्चित केलें गेल्यानंतर, त्याप्रमाणेंच अंमलबजावणी होणें केव्हांही इष्ट होय. या बाबतींत श्रीमंत राजासाहेब यांना कोणताही हुकूम करतां येईल तथापि अशा हुकमास पात्र राहून निर्दिष्ट केली गेलेली रक्कम त्या त्या खात्याकडेच खर्च केली गेली पाहिजे. सोंपीव खात्याबाबतची जबाबदारी लोकनियुक्त मंत्र्यावर आहेच; परंतु, तो मंत्रि या बाबतींत कायदेमंडळाच्याच धोरणाप्रमाणें वागतो किंवा कसें हें पाहण्याचा अधिकार कायदेमंडळास असला पाहिजे. ही गोष्ट साध्य होण्यासाठीं, कायदेमंडळानें निवडलेल्या सभासदांची एक हिशेबतपासणी-कमिटी ( Audit Committee ) असावी असें आम्ही सुचवितों. लोकनियुक्त मंत्र्यानें आपल्या खात्याकडे जाहलेल्या खर्चाची सर्व बिलें या कमिटीपुढें ठेवावीत. कमिटीनें जरूर ती तपासणी करून, त्याबद्दलचा आपला रिपोर्ट कायदेमंडळापुढें ठेवावा आणि मंडळानें त्याबद्दल विचार करून काय तें ठरवावें व जरूर त्या सूचना मंत्र्याला द्याव्यात अगर दुसरी योग्य वाटेल ती तजवीज करावी. असें जाहल्यास लोकनियुक्त मंत्रि आपला कारभार शक्यतोंवर कायदेमंडळाच्या धोरणास अनुसरूनच करण्याचा प्रयत्न करतील आणि मंडळाचें नियंत्रण मंत्र्यांचे कामावर अधिक प्रभावी रीतीनें राहील. ही तपासणी–कमिटी कशी असावी, तिचे अधिकार काय असावेत, तिनें आपलें काम कोणत्या पद्धतीनें करावें आणि तिच्या अधिकाराची मर्यादा काय असावी, या सर्व गोष्टींचा विचार करून त्याबद्दलची तजवीज सुधारणा–कायद्यांत करणेंत यावी व याबद्दलचे जरूर ते नियम करणेंत यावेत असें आम्ही सुचवितों.

३३. तसेंच या ठिकाणीं आणखी एक महत्त्वाची सूचना करणेची आम्ही परवानगी घेतों. संस्थानचें बजेट दोन विभागांत होणार; एक राखीव खात्याचें बजेट व दुसरें सोंपीव खात्याचें बजेट. राखीव खात्याचें बजेट कांहीं प्रमाणांत मंडळापुढें चर्चेसाठीं आलें तरी मंडळाकडून तें मंजूर जाहलें पाहिजे असें नाहीं. सोंपीव खात्याचें बजेट मात्र मंडळाकडून मंजूर झालेंच

पाहिजे. या बाबतींत मतभेद उत्पन्न होऊन अडचणी उत्पन्न होणेचें भय असतेंच. तें भय होतां होईलतों कमी व्हावें आणि मंडळाचें काम सुरळीत चालावें म्हणून बजेट तयार करण्याचे कामीं सूचना करणेसाठीं म्हणून मंडळानें निवडलेल्या सभासदांची एक लहानशी कमिटी (Budget Committee) असावी. या कमिटीनें सर्व गोष्टींचा विचार करून बजेट तयार करण्याचे कामीं श्रीमंत राजासाहेब यांना आपल्या सूचना सादर कराव्यात. अशा रीतीनें प्रथमच मंडळाचा अभिप्राय घेऊन बजेट तयार जाहलें तर मतभेदाचे प्रश्न तितके कमी उत्पन्न होतील आणि राज्यकारभाराचे बाबतींत घासाघीस होऊन, पेंचप्रसंग निर्माण करण्याचे प्रवृत्तीस आळा बसेल असें आम्हांस वाटतें. याबद्दलची जरूर ती तजवीज कायद्यांत असावी व जरूर ते नियम करणेंत यावेत अशी आमची सूचना आहे.

३४. या भागांतील विषयांतील सूचना येणेंप्रमाणें आहेत. या सूचना करतांना अर्थातच आम्ही विशेष तपशिलांत शिरलों नाहीं. कारण, एक तर तसें करण्याचें हें स्थळ नव्हे; दुसरें असें कीं, या सुधारणा समाविष्ट करणारा कायदा तयार करण्याबद्दल श्रीमंत राजासाहेबांचा हुकूम नाहीं; व तें काम कायदेपंडितांचें आहे. आम्ही स्थूलमानानें घटनेचें व सुधारणांचें स्वरूप दाखविलें आहे व इतकीच गोष्ट आमच्या अधिकारक्षेत्रांत येते असें आम्हांस वाटतें.

# भाग ३

## कायदेमंडळाची रचना

## व

## मताधिकार आणि मतदारसंघ.

३५. जबाबदार राज्यपद्धतीच्या उपक्रमाचे दृष्टीनें प्रातिनिधिक कायदेमंडळाची स्थापना करणें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. आणि आम्हीं प्रारंभींच नमूद केल्याप्रमाणें श्रीमंत राजासाहेब यांनीं आपल्या संस्थानांत हा उपक्रम सुमारें ८ वर्षांपूर्वींच केलेला आहे. जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाच्या स्थापनेचा कायदा सन १९३२ सालींच केला गेला असून ( सन १९३२ चा जमखंडी कायदा नं. १ ) त्या कायद्यान्वयें कायदेमंडळही अस्तित्वांत आलें आहे. हा कायदा व या खालील नियम वाचले असतां, असें स्पष्टपणें दिसून येतें कीं, इतर कित्येक मोठ्या संस्थानांत सुरू नसलेला जबाबदार राज्यपद्धतीचा उपक्रम श्रीमंत राजासाहेब यांनीं आपल्या लहानशा संस्थानांत फार वर्षांपूर्वींच सुरू केला आहे ही गोष्ट श्रीमंत राजासाहेब यांना भूषणभूत असून, त्यांच्या प्रजाहिततत्परतेची द्योतक आहे. या कायदेमंडळाचे अधिकार मर्यादित असून त्यामध्यें आतां कशा रीतीनें वाढ करणें जरूरीचें आहे तें आम्हीं पहिल्या भागांत विवेचिलेंच आहे. आतां त्या अनुरोधानें कायदेमंडळाची घटना कशी असावी, मतदारसंघ किती व कसे असावेत आणि मतदानाचा अधिकार काय असावा या गोष्टींचा विचार या भागांत करावयाचा आहे.

३६. नवीन कायदेमंडळाची घटना कशी असावी हें सांगणेपूर्वी हल्लींच्या कायदेमंडळाचें स्वरूप काय आहे याचें थोडेसें दिग्दर्शन करणें अस्थानीं होणार नाहीं. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या कायदेमंडळाचे एकूण सभासद ३० असून त्यांत १६ लोकनियुक्त व ७ सरकारी अधिकारी व ७ सरकारकडून नेमलेले अशी विभागणी आहे. अगदीं प्रथमावस्थेंत देखील लोकनियुक्त सभासदांचें मताधिक्य होणेची तजवीज या घटनेंत केलेली आहे ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. या कायदेमंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष सरकारनियुक्त असावेत असा निर्बंध घातलेला आहे. निवडणुकी होणेच्या त्या, निरनिराळया मतदार–संघाकडून साक्षात् निवडणुकीच्या पद्धतीनेंच व्हाव्यात असें ठरविणेंत आलें आहे. व्यापारीवर्ग, शिक्षित लोक व तैनातदार यांचे विशेष मतदारसंघ निर्माण करण्यांत आले असून, त्या प्रत्येकास एकेक जागा दिलेली आहे. बाकीच्या १३ जागांसाठीं ९ सामान्य मतदारसंघ निर्माण करणेंत आलेले असून, या सामान्य संघांत, जरूरीप्रमाणें ग्रामिक संघ व नागरसंघ अशी ही विभागणी केली आहे. अशा रीतीनें लोकनियुक्त १६ जागांची विभागणी करणेंत आलेली असूनही योजना पूर्ण यशस्वी जाहली असें आम्हांस समजतें.

३७. आतां कायदेमंडळाच्या अधिकाराची मर्यादा वाढविली जाणार असल्यानें आणि मंडळावर असलेल्या जबाबदारीची दिशाही बदलणार असल्यानें, त्याला अनुरूप असा फरक, मंडळाच्या घटनेंतही होणें क्रमप्राप्तच आहे. जसजसें अधिकारदान जास्ती प्रमाणांत केलें जाईल, तसतशी मताधिकाराची व्याप्तिही वाढविली पाहिजे हें सामान्य तत्त्व आम्हांस मान्य आहे. अधिकार-विभागणी आणि मतदानाचा हक्क या दोन्ही गोष्टी एकमेकींशीं अगदीं जोडलेल्या असून, त्या दोहोंची फारकत करणें केव्हांही श्रेयस्कर नाहीं. जितके अधिकार विस्तृत तितकें मताधिकाराचें क्षेत्रही विस्तृतच असावयास पाहिजे. या दृष्टीनें विचार केला तर, अधिकारदानाचे बाबतींत, संस्थानाधिपतींच्या आधिपत्याखालीं संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति हें जसें अंतिम ध्येय तसेंच मताधिकाराचे बाबतींतही प्रत्येक सज्ञान इसमास मताधिकार ( Adult Franchise) हें तत्त्व, अंतिम ध्येय म्हणून मान्य करण्यास आम्हांस हरकत दिसत नाहीं.

३८. परंतु, या तत्त्वाचा स्वीकार करून, मताधिकाराचें क्षेत्र तितकें विस्तृत आतांच करावें, हें म्हणणें मात्र आम्हांस मान्य करतां येत नाहीं. विस्तृत मताधिकार हें एक प्रबळ शस्त्र आहे, आणि तें योग्य रीतीनें वापरण्याची पात्रता लोकांचे अंगीं आल्याशिवाय, तें शस्त्र अज्ञान मतदारांचे हातीं देणेपासून, फायद्यापेक्षां तोटाच होणेचा संभव अधिक असतो. प्रजा सुबुद्ध जाहली आणि आपल्या मताधिकाराचा उपयोग राज्यकारभाराचे बाबतींत अगदीं बरोबर रीतीनें कसा करावा हें तिला समजूं लागलें म्हणजे सर्व सुधारलेल्या देशांत चालू असलेल्या पद्धतीप्रमाणें, मतदानाचा हक्क पूर्णपणें विस्तृत करण्यास कोणतीच हरकत नाहीं. प्रजेची शैक्षणिक लायखी, राजकीय हक्क उपभोगणेचा प्रजेचा अनुभव व प्रजेची सामाजिक व आर्थिक प्रगति या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊनच, या बाबतींत निर्णय ठरविला पाहिजे. हें तत्त्व ध्यानांत धरून बोलावयाचें तर जमखंडी संस्थानची प्रजा हा

हक्क पूर्णपणें उपभोगण्यास लायख जाहली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. शिक्षणाचे बाबतींत प्रजा अद्यापि मागासलेली आहे. साक्षरतेचें प्रमाण शेंकडा सहा असेल. स्त्री-शिक्षण तर अद्यापि बाल्यावस्थेंतच आहे. देश कृषिप्रधान असून प्रजेंतील बहुसंख्य वर्गाची उपजीविका शेतीवरच चालते. संस्थानांत धनोत्पादन करणारे कारखाने नाहींत अगर व्यापाऱ्यांचे दृष्टीनें देखील जमखंडी संस्थान विशेष पुढें आलेलें आहे असें वाटत नाहीं. संस्थानची प्रजा निरनिराळ्या चारपांच जातींमध्यें विभागलेली असून, मागासलेल्या वर्गांमध्यें तर शिक्षणाचें प्रमाण अगदींच अल्प आहे. मतदानाचा अधिकार विशेष रीतीनें विस्तृत करावा असें म्हणणाऱ्या साक्षीदारांना देखील, जमखंडी संस्थानची प्रजा इतर आजूबाजूच्या संस्थानी अगर ब्रिटिश प्रजेपेक्षां शिक्षणाचे दृष्टीनें पुढें गेलेली नाहीं, ही गोष्ट कबूल करावीच लागली आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां, मतदानाचा अधिकार तूर्त तरी मर्यादितच असला पाहिजे असा अभिप्राय देण्यास आम्हांस संकोच वाटत नाहीं.

३९. आतां हा अधिकार हल्लींपेक्षां वाढविला तर पाहिजेच, याबद्दल वाद असण्याचें कारण नाहीं. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या कायद्याप्रमाणें, मतदानाचा अधिकार असलेल्यांची संख्या सुमारें ४६५० आहे. संस्थानच्या एकंदर लोकसंख्येच्या मानानें हें प्रमाण शेंकडा ४ पडतें. राजकीय हक्काची वाढ व एकंदर सर्व परिस्थिति लक्षांत घेतां, हें प्रमाण दुपटीहून थोडेसें जास्तच वाढवावें, असें आम्हांस वाटतें. म्हणजे एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा १० प्रमाणांत मतदानाचा अधिकार द्यावा अशी आमची सूचना आहे. हें प्रमाण साधण्यासाठीं साक्षात् मतदानाची लायखी, साऱ्याच्या अगर इस्टेटीच्या कोणत्या व किती प्रमाणावर ठरवावी हें निर्दिष्ट करण्यास आमचे जवळ साधन नाहीं. तथापि, आम्ही इतकें मात्र म्हणूं शकतों कीं हल्लीं सामान्य मतदारसंघाचे बाबतींत, मतदानाच्या लायखीसाठीं जी साऱ्याची रक्कम किंवा पगाराची व पेन्शनची रक्कम ठरविणेंत आली आहे व इस्टेटीच्या किंमतीचें किंवा म्युनसिपल करांचें व देण्यांत येणाऱ्या भाड्याचें जें प्रमाण ठरविणेंत आलें आहे, ती रक्कम व तें प्रमाण जरूर त्या अंशानें कमी करावें. शिवाय कोणाही व्हर्न्याक्युलर मराठी अगर कानडी चवथी इयत्ता पास असलेल्या इसमास, सामान्य मतदारसंघांत मतदार होणेचा हक्क असावा. अशा रीतीनें मतदारसंघाचें क्षेत्र विस्तृत केलें म्हणजे काम भागेल असें आम्हांस वाटतें.

४०. आतां साक्षात् मंडळाची घटना कशी असावी या प्रश्नाकडे वळावयाचें. एकूण सभासदांची संख्या हल्लीं तीस ३० आहे ती ३६ करण्यांत येऊन त्यांत सरकारी अधिकारी ६, सरकारनियुक्त ६ व लोकनियुक्त २४ अशी विभागणी करणेंत यावी. द्विदल राज्यपद्धतीचा उपक्रम सुरू करणेंत यावा अशी आम्हीं शिफारस केली आहे. ही राज्यपद्धति यशस्वी व्हावी आणि लोकनियुक्त मंत्र्यास कायदेमंडळास जबाबदार राहून आपलीं खातीं चालवितां यावींत यासाठीं, लोकनियुक्तांचें इतकें मताधिक्य मंडळांत असणें आम्हांस अवश्यक दिसतें. लोकनियुक्त मंत्र्यास लोकमताचा पूर्णपणें आधार असला पाहिजे; त्याशिवाय त्याला आपला कारभार यशस्वीपणें चालवितां येणार नाहीं. म्हणून मंडळांत लोकनियुक्त सभासदांचें विशेष बहुमत केव्हांही असणें जरूरीचें आहे.

४१. हल्लींच्या घटनेप्रमाणें व्यापारी, शैक्षणिक व तैनातदार असे तीन विशेष मतदारसंघ आहेतच. हे संघ कायमच ठेवावेत असें आम्हांस वाटतें. याशिवाय स्त्री-मतदारसंघ, हरिजन मतदारसंघ व विणकरी मतदारसंघ असे तीन नवीन विशेष मतदारसंघ निर्माण करणेंत यावेत. संस्थानांत विणकरी वर्ग फार मोठा आहे आणि त्याचे हितसंबंधाचे रक्षणासाठीं, कायदेमंडळांत खास त्यांनींच निवडून दिलेला प्रतिनिधि असावा, अशी सूचना पुष्कळांनीं केलेली आहे ती आम्हांस ग्राह्य वाटते. तसेंच, संस्थानांतील स्त्रीवर्ग शिक्षणाचे बाबतींत अतिशयच मागासलेला आहे. नवऱ्याचे मताधिकाराबरोबरच, त्याचे स्त्रीलाही आपोआपच मताधिकार यावा हें तत्त्व सांप्रतच्या स्थितींत मान्य करण्यास आमची तयारी नाहीं. स्वतंत्र इस्टेटीच्या मालकीच्या दृष्टीनें आमचा स्त्रीवर्ग मताधिकारास प्राप्त होणेचा संभव अगदींच अल्प आहे. अशा प्रतिकूल परिस्थितींत, स्त्रियांचा मतदारसंघ निर्माण करून, त्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देणें व त्या वर्गांत अधिक पात्रता उत्पन्न करण्याचा मार्ग खुला करणें श्रेयस्कर होईल असें आम्हांस वाटतें. ही विचारसरणी आमच्यापुढें स्त्री–साक्षीदारांनीं मांडली आहे ही गोष्ट ध्यानांत धरणेंजोगी आहे. आतां या स्वतंत्र संघासाठीं मताधिकाराची पात्रता कशी असावी हा प्रश्न अवघड आहे व त्याचा विचार आम्ही यथाक्रम करीत आहों. हरिजन व विणकरी यांचेबद्दल स्वतंत्र मतदारसंघ असावेत ही गोष्ट कोणासही मान्यच होणेजोगी असल्यानें, त्याबद्दल विशेष विवेचन करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. अशा रीतीनें शैक्षणिक, व्यापारी व तैनातदार असे हल्लीं अस्तित्वांत असलेले तीन व हरिजन, विणकरी व स्त्रीजन असे नवीन तीन असे सहा विशेष मतदारसंघ निर्माण करणेंत यावेत असा आमचा अभिप्राय आहे.

४२ मराठा समाज व मुसलमान समाज यांचेसाठींही स्वतंत्र मतदारसंघ असावेत अशी त्यांची मागणी आहे. आम्ही जातिनिष्ठ स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्याच्या तत्त्वाचा स्वीकार करण्यास तयार नाहीं. संस्थानांत मराठा समाज संख्येनें सुमारें १२५२४ आहे व मुसलमान समाजही बराच मोठा आहे ही गोष्ट खरी आहे आणि कायदेमंडळांत त्यांचे हितसंबंधाचें संरक्षण होणें अगत्याचें आहे ही गोष्टही आम्हांस मान्य आहे; परंतु त्यासाठीं स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्याच्या घातुक तत्त्वास मान्यता देणें इष्ट होईल असें आम्हांस वाटत नाहीं. समाजांतील निरनिराळ्या जातींनीं, प्रेमभावानें आणि सलोख्यानें राहून, आपली उन्नति करून घेतली पाहिजे आणि परस्परांमध्यें विश्वास उत्पन्न होऊन सलोखा वाढण्यास, स्वतंत्र मतदारसंघाचें अस्तित्व घातकच होईल असा आमचा स्पष्ट अभिप्राय आहे. जातिनिष्ठ स्वतंत्र मतदारसंघाचा चोहोंकडे धिःकारच केलेला दिसतो. विद्वान् लोकांनीं या तत्त्वास मान्यता दिलेली नाहीं म्हणून या विशिष्ट समाजांतील पुढाऱ्यांनीं जरी विशिष्ट मतदारसंघाची आमचेकडे मागणी केली असली तरी त्या मागणीचा स्वीकार करून या जातीसाठीं विशिष्ट मतदारसंघाची शिफारस करण्यास आमचें मन धजत नाहीं. विशिष्ट मतदारसंघ निर्माण जाहल्यास दुजाभाव वाढतो, आपुलकीची भावना नष्ट होते आणि सामान्य मतदारसंघांतील मतदारांच्या मतांची फिकीर करण्याचें कारण रहात नसल्यानें, लोककल्याणाची जाणीव तितक्या अंशानें कमी कमी होत जाऊन स्वार्थी भाव उत्पन्न होतात; म्हणून मराठा व मुसलमान यांचेसाठीं विशिष्ट मतदारसंघ असावेत अशी शिफारस करणें आम्हांस इष्ट दिसत नाहीं.

४३. आतां या दोन समाजांचे कांहीं विशिष्ट हितसंबंध असूं शकतील आणि त्यांच्या सामाजिक व धार्मिक अडचणी वेळोवेळीं कायदेमंडळापुढें येणें जरूरीचें आहे व त्यांचे हितसंबंध रक्षिले जाणें जरूरीचें आहे ही गोष्ट खरी आहे. हा हेतु साध्य होणे-साठीं, आम्ही त्या प्रत्येक समाजासाठीं एक एक जागा राखीव असावी असें सुच-वितों. विशिष्ट मतदारसंघ असूं नयेत. निवडणूक सामान्य मतदारसंघांतूनच व्हावी पण मराठासमाजासाठीं एक व मुसलमान समाजासाठीं एक अशा दोन जागा राखीव ठेवण्यांत याव्यात, अशी आमची सूचना आहे. या राखीव जागा त्या त्या विशिष्ट समाजांतील उमेद-वारांचेकडूनच भरल्या जाणेच्या आहेत. असें केलें म्हणजे कार्यभाग होईल असें आम्हांस वाटतें.

४४. पण याबद्दलही आणखी एक गोष्ट आम्हांस सुचवावीशी वाटते. केवळ जागा राखीव ठेवल्यानें कार्यभाग होणार नाहीं अशी तक्रार पुढें आलेली आहे आणि ती कांहीं अंशानें बरोबरही आहे. मराठा आणि मुसलमान या समाजाचा प्रतिनिधि मंडळांत असणें जरूरीचें आहे आणि केवळ राखीव जागा ठेवल्यानें, त्या समाजातर्फे सामान्य मतदारसंघाकडून निवडून येणारा इसम, त्या समाजाचा खराखुरा प्रतिनिधि असेलच असें म्हणतां येणार नाहीं. त्या समाजांतील बहुसंख्य लोकांना नको असलेला इसम देखील, सामान्य मतदारसंघातर्फे निवडून येण्याचा संभव आहे. असें जाहलें तर, राखीव जागा ठेवण्याचा हेतु विफल होणार आहे. याला आम्हीं अशी तोड सुचवितों कीं अशा निवडून येणाऱ्या उमेदवारानें निवडणुकींत यशस्वी होणेसाठीं आपल्या विशिष्ट समाजांतील जे मतदार मतदान करणेस आलेले असतील त्यांपैकीं कांहीं विविक्षित प्रमाणांत मतें मिळविलीं असलीं पाहिजेत, असाही निर्बंध घालणेंत यावा. आमचे मतें हें प्रमाण $\frac{1}{3}$ असावें. म्हणजे यशस्वी उमेदवारावर दोन निर्बंध असावेत. तो त्या समाजांतीलच असावा; त्यानें आपल्या समाजांतील मतें दिलेल्यांपैकीं $\frac{1}{3}$ लोकांचीं मतें मिळविलीं पाहिजेत. हे निर्बंध पाळून जो माताधिक्य मिळवील तोच यशस्वी समजला जावा असें झालें म्हणजे त्याला आपल्या जातींतील मतदारांशीं फटकून राहतां येणार नाहीं व सामान्य मतदारसंघांतील मत-दारांशींही बेफिकीर राहून चालणार नाहीं. असा दुहेरी निर्बंध घातला गेल्यानें जातीय भाव-नेचा पुरस्कार करणेस अवसर राहणार नाहीं; आणि विशिष्ट हितसंबंध मात्र राखिले जाण्यास साधन राहील असें आम्हांस वाटतें. या मार्गाचा स्वीकार केल्यास कोणाचीच तक्रार राहूं नये अशी आमची समजूत आहे.

४५. कायदेमंडळांतील सभासदांची एकूण संख्या २६ असून,त्यांपैकीं लोकानियुक्त जागा २४ असाव्यात हें आमचें मत आम्हीं वर नमूद केलेंच आहे. आतां या २४ जागांची वांटणी कशी राहावयाची तें पाहूं. मराठा व मुसलमान या दोन समाजांसाठीं दोन राखीव जागा ठेव-ण्यांत याव्यात. सहा विशिष्ट मतदारसंघ वर नमूद केलेलेच आहेत. त्या प्रत्येक संघास एक जागा देणेंत यावी. अशा रीतीनें आठ जागा दिल्यानंतर बाकी १६ जागा राहिल्या. या जागा पुढीलप्रमाणें वांटण्यांत याव्यात असा आमचा अभिप्राय आहे.

## मतदारसंघ व जागांची विभागणी

वर नमूद केलेलीं तत्त्वें अमलांत आणणेचीं जाहल्यास खालीं लिहिल्याप्रमाणें मतदार-संघ आणि जागांची विभागणी करावी लागते.

| नं. | मतदारसंघाचें नांव | मतदारसंघाचा प्रकार | | मतदार-संघाची व्याप्ति | निवडून यावयाच्या सभासदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | सामान्य | | | |
| १ | जमखंडी तालुका दक्षिणभाग | सामान्य | ग्रामिक | | ४ |
| २ | जमखंडी तालुका उत्तरभाग | " | " | | २ |
| ३ | कुंदगोळ तालुका | " | " | | ३ |
| ४ | ठाणें वाठार व पाटखळ मिळून | " | " | | १ |
| ५ | कुंदगोळ व जमखंडी ता. मिळून सामान्य मतदारसंघ | सामान्य ग्रामिक व नागर मिळून | | | मराठी राखीव जागा १ |
| ६ | " | " | | | मुसल. राखीव जागा १ |
| ७ | जमखंडी | सामान्य नागर | | | २ |
| ८ | कुंदगोळ | " | | | १ |
| ९ | बनहट्टी–हुन्नूर | " | | | १ |
| १० | सावळगी–बिद्री | " | | | १ |
| ११ | सांवशी–कमडोळी | " | | | १ |
| १२ | तैनातदार | विशेष | | | १ |
| १३ | शैक्षणिक | " | | | १ |
| १४ | व्यापारी | " | | | १ |
| १५ | स्त्रिया | " | | | १ |
| १६ | विणकरी | " | | | १ |
| १७ | हरिजन | " | | | १ |
| | | | | | २४ |

**टीपः—१** मराठी समाज व मुसलमान समाज यांचेसाठीं ज्या राखीव जागा ठेविल्या आहेत, त्यांची निवडणूक जमखंडी व कुंदगोळ तालुक्यांतील सामान्य मतदारसंघाकडून होणेची आहे. मात्र, मतदारास या सामान्य मतदारसंघांत एकाहून अधिक रीतीनें मत देणेची पात्रता येत असली तरी त्यास कोणत्याही पात्रतेनुसार एकच मत देणेचा अधिकार राहील.

**टीपः—२** मराठा व मुसलमान समाजांतील राखीव जागेच्या उमेदवारानें निवडणुकींत सर्वांत जास्त मतें मिळविलींच पाहिजेत असा निर्बंध घालतां येत नाहीं. त्यानें आपल्या समाजांतील मतदान झाल्या मतांपैकीं $\frac{1}{3}$ मतें मिळविलीं पाहिजेत हा निर्बंध असावा.

# मतदानाची पात्रता

## सामान्य मतदारसंघ

४६. १ नागर मतदारसंघ:—हल्लींच्या कायद्याप्रमाणें जें प्रमाण ठरविणेंत आलें आहे तें जरूर तितकें उतरविणेंत यावें. शिवाय व्हर्न्याक्युलर चवथी इयत्ता पास असणाऱ्यास मताचा अधिकार असावा.

२ ग्रामिक मतदारसंघ:—हल्लीं असलेलें पात्रतेचें प्रमाण जरूर तितकें उतरविणेंत यावें. शिवाय व्हर्न्याक्युलर चवथी इयत्ता पास असणाऱ्यास मताचा अधिकार असावा.

३ विशेष मतदारसंघ:—

(१) शैक्षणिक:—हल्लींच्या कायद्याप्रमाणें पात्रतेचा जो निर्बंध ठरविणेंत आला आहे तोच कायम ठेवणेंत यावा.

(२) व्यापारी:—हल्लींचीच पात्रता कायम ठेवणेंत यावी.

(३) तैनातदार:—हल्लींचीच पात्रता कायम ठेवणेंत यावी.

(४) हरिजन:—प्रत्येक सज्ञान पुरुषास मतदानाचा हक्क देणेंत यावा. दुसरा कोणताही निर्बंध असूं नये असें आम्हांस वाटतें.

(५) विणकरी लोक:—ही पात्रता, जो विणण्याच्या धंद्यावर आपलें पोट भरतो, अगर जो मागाचा मालक यांत्रिक शक्तीशिवाय दहांहून आधिक नाहींत इतके माग दहाहून आधिक विणकरी न लावतां चालवितो, अशा सर्वांना हा मताधिकार असावा.

(६) स्त्रीवर्ग:—साक्षरतेची अट असावी म्हणजे जिला व्हर्न्याक्युलर भाषा ( मराठी, कानडी अगर उर्दू ) चांगली लिहितां वाचतां येत असेल, अशा प्रत्येक स्त्रीस मताचा अधिकार असावा.

विशिष्ट मतदारसंघांतील मतदारास, सामान्य मतदारसंघांत देखील मत देण्याची पात्रता असल्यास, मताधिकार मिळण्यास कांहीं हरकत नाहीं. मताधिकार मिळण्यास मतदाराचें वय निदान २१ वर्षें तरी पाहिजे.

४७. वर नमूद केलेल्या कसोटीप्रमाणें मताधिकार असलेला इसम तो अधिकार वापरणेच्या बाबतींत कांहीं विवक्षित गोष्टींमुळें नालायखही असूं शकेल. या गोष्टी कोणत्या तें नमूद करण्याचें स्थल हें नव्हे. या गोष्टींची विस्तृत चर्चा व व्यवस्था निवडणुकीच्या कायद्यांत व नियमांत केली जावी.

## उमेदवारीची पात्रता

४८. कोणाही मतदारास इतर निर्बंधांस पात्र राहून कोणत्याही मतदारसंघातर्फे निवडणुकीस उभें राहण्याचा अधिकार असावा. मात्र उमेदवाराचे वयास निदान २५ वर्षें

पुरीं जाहलीं असलीं पाहिजेत अशी अट घालावी. तसेंच, उमेदवार म्हणून उभे राहणाऱ्याची निदान व्हर्न्याक्युलर चवथी इयत्ता पास जाहली असलीच पाहिजे अशी अट असावी, असेंही आम्हांस वाटतें. अशी अट नसेल तर, एखादा निरक्षर उमेदवार निवडून येईल आणि कायदेमंडळांत काय काम चाललें आहे हें समजण्याची देखील पात्रता नसल्यानें, केवळ त्यानें दुसऱ्याचे तोंडाकडे पहात बसून काल कंठावा असा हास्यास्पद प्रकार दृष्टीस पडण्याचा संभव असतो असें होऊं नये म्हणून, उमेदवाराची निदान व्हर्न्याक्युलर चवथी इयत्ता पास जाहली असलीच पाहिजे असा निर्बंध घालणेंत यावा, अशी आमची आग्रहाची सूचना आहे. लिहितां-वाचतां न येणारे इसम निर्बुद्धच असतात असें आम्हांस म्हणावयाचें नाहीं किंवा अशा इसमांचा आम्हांस अधिक्षेपही करावयाचा नाहीं, परंतु कामाचे सोईसाठीं असा निर्बंध ठेवणें आम्हांस अगत्याचें वाटतें, इतकेंच आमचें म्हणणें आहे.

४९. लोकनियुक्त जागा २४ गेल्यानंतर बाकीच्या १२ जागा राहतात त्यांपैकीं ६ सरकारी अधिकारी असावेत आणि बाकीच्या ६ जागा सरकारनियुक्त असाव्यात असें आम्हांस वाटतें. सरकारनियुक्त इसम होतां होईतों सरकारी अधिकारी असूं नयेत अशी आम्ही शिफारस करूं इच्छितों.

५०. कायदेमंडळांत सरकारी अधिकारी किंवा सरकारनियुक्त सभासद असूंच नयेत, सर्वच सभासद निवडून आलेले असावेत असें कित्येकांचें म्हणणें आहे हें आम्हांस माहीत आहे. आम्हांस या मताबद्दल आदर वाटतो आणि अंतिम ध्येय या दृष्टीनें यांत कांहीं दोष आहे असेंही आम्हांस म्हणावयाचें नाहीं. तथापि एकंदर परिस्थिति लक्षांत घेतां आणि आम्हीं द्विदल राज्यपद्धतीचा उपक्रम चालू करणेची शिफारस केली आहे ही गोष्ट लक्षांत घेतां, या अंतिम मताचा स्वीकार आतांच करावा असें आम्हांस वाटत नाहीं. कांहीं महत्त्वाचीं खातीं राखीव अशीं ठेविलीं आहेत. या खात्याबाबतचे प्रश्न निदान चर्चेसाठीं तरी मंडळापुढें येणारच. अशा प्रसंगीं, त्या त्या खात्यांचे जबाबदार अधिकारी मंडळाचे सभासद असणें अत्यंत अगत्याचें आहे. तसेंच सोपीव खात्यांचे कारभाराचे बाबतींत देखील, सरकारी अधिकाऱ्यांचा आजपर्यंचा राज्यकारभाराचा अनुभव लोकनियुक्त मंत्र्याचे उपयोगी पडणार आहे. सर्व कारभार एकमेकांचे सहानुभूतीनें आणि मदतीनें चालावा अशी आमची योजना आहे. अशा स्थितींत, सरकारी अधिकारी लोकनियुक्त मंत्र्याला देखील सल्लामसलत देण्याच्या दृष्टीनें आणि अडचणी दाखविण्याचें दृष्टीनें निःसंशय उपयोगी पडतील असें आम्हांस वाटतें.

५१. त्याचप्रमाणें कांहीं सभासद नियुक्त करण्याचा अधिकार सांप्रतच्या स्थितींत सरकारला असला पाहिजे असें आम्हांस वाटतें. संस्थानची प्रजा भिन्नभिन्न जातींची आहे; शिक्षणाची वाढ अद्यापि पुरेशी झालेली नाहीं; जातीय भावना अगर तंटे वाढीला लावण्याची प्रवृत्ति दिसून येते. अशा स्थितींत अल्पसंख्याक जातीच्या अगर मागासलेल्या वर्गाच्या हिताचें संरक्षण सामान्य निवडणुकीनें होत नाहीं असें दिसून आलें तर, त्याबद्दलची जरूर ती तजवीज करण्याचा अधिकार सरकारचे हातीं पाहिजे. मताधिकार वापरणेची पात्रता ज्या

प्रमाणांत प्रजेच्या अंगीं येत जाईल त्या प्रमाणांत विरुद्ध हितसंबंध निर्माण होण्याचे प्रसंग कमी कमी होत जातील ही गोष्ट खरी आहे; परंतु सर्वच मतदार आपल्या मतदानाचा अधिकार आपल्या स्वतःच्या बुद्धीप्रमाणेंच वापरतील अशी अपेक्षा तूर्त तरी करणें शक्य नाहीं. जातीय भावनेवर निवडणुकी लढविल्या जातात. धनिक लोक निवडणुकी जिंकतात. खाजगी वजन खर्च करून, पैशाचा मोह घालून किंवा दुसरें कांहीं आमिष दाखवून मतें मिळविलीं जातात. कायद्यानें या गोष्टींना प्रतिबंध केला तरी या गोष्टी अगदीं नाहींशा होत नाहींत असा अनुभव आहे. अशा स्थितींत, तूर्त तरी ज्या ज्या वेळीं अल्पसंख्यांचे अगर विशिष्ट जातीचे अगर मागासलेल्या जातीचे हितसंबंध मंडळांत राखिले जाण्याचा संभव, सामान्य निवडणुकीच्या निकालावरून दिसून येत नसेल, त्यावेळीं ही अडचण दूर करण्यासाठीं कांहीं सभासद नियुक्त करण्याचा अधिकार सरकारास पाहिजेच असें आम्हांस वाटतें.

५२. मंडळाचा अध्यक्ष लोकनियुक्त असावा असें कांहीं जणांचें म्हणणें आहे. सांप्रतच्या स्थितींत आम्हांस ही गोष्ट मान्य करवत नाहीं. अगदीं प्रथमावस्थेंतच हा अधिकार मंडळाला देणेपासून, फायद्यापेक्षां तोटा होणेचाच संभव आम्हांस अधिक वाटतो म्हणून आम्ही अशी शिफारस करूं इच्छित नाहीं. मंडळाचा अध्यक्ष श्रीमंत राजासाहेब यांनींच नेमावा असें आम्हांस वाटतें.

५३. मात्र या बाबतींतही आमची एक सूचना आहे. संस्थानचे दिवाण हेच हल्लींच्या कायद्याप्रमाणें मंडळाचे अध्यक्ष आहेत असें असलें तरी प्रत्येक अधिवेशनास दिवाणांना अध्यक्षस्थान न देतां कोणा तरी त्रयस्थ लायख इसमास अध्यक्ष म्हणून नेमण्याची चांगली प्रथा श्रीमंत राजासाहेब यांनीं घेतली आहे, असें आम्हांस समजतें. आमचे मतें ही पद्धत चांगली आहे. अधिवेशनाचा अध्यक्ष जसा लोकनियुक्त नसावा तसा तो सरकारी अधिकारीही नसावा असें आम्हांस वाटतें. तो त्रयस्थच असावा म्हणून असा त्रयस्थ इसम शोधून त्यास मंडळाचा सभासद करून त्यास अधिवेशनाचा अध्यक्ष नेमणें ही पद्धत जी श्रीमंत राजासाहेब यांनीं अमलांत आणली आहे तिचाच अवलंब यानंतरही केला जावा असें आम्ही सुचवितों.

५४. मंडळाचा उपाध्यक्ष लोकनियुक्त असण्यास अमचे मतें कांहींच हरकत नाहीं. असें जाहल्यास क्रमाक्रमानें अध्यक्षाच्या कामाचा अनुभव मिळण्याची संधि त्यास येईल. म्हणून असा उपक्रम करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

# भाग ४

## दप्तरची-भाषा

### कानडी कीं मराठी

५५. संस्थानी दप्तर फार पूर्वीपासून मराठींत असून दरबारची भाषाही मराठीच आहे. संस्थानांतील बहुजनसमाजाची भाषा कानडी असल्यानें मराठी भाषेमुळें कानडी लोकांना

भासणारी अडचण दूर व्हावी आणि सरकारी दप्तर कानडींत सुरू व्हावें अशा तक्रारी श्रीमंत राजासाहेब यांचेकडे येऊं लागल्या. या प्रश्नाचा विचार करून कानडी भाषा बोलणाऱ्यांची सोय कशी करावी व किती कालावधींत करावी, दप्तर कानडी करणेचा उपक्रम कसा व कोठपर्यंत करावा या सर्व गोष्टींचा विचार करून, सूचना करणेचें काम श्रीमंत राजासाहेब यांनीं कमिटीकडे सोंपविलेलें आहे. या बाबतींत मतभेदास जागा राहूं नये आणि गैरसमज उत्पन्न होऊं नये म्हणून प्रारंभीं उद्धृत केलेल्या श्रीमंत राजेसाहेब यांचे हुकुमांतील जरूरी-पुरता उतारा येथें पुन्हां उद्धृत करणें आम्हांस इष्ट दिसतें. या बाबतींत श्रीमंत राजासाहेब यांचा हुकूम असा आहे:—

" संस्थानांतील बहुजनसमाजाची भाषा कानडी असून, शक्य तों सरकारी दप्तरची भाषाही कानडी असावी हें तत्त्व दरबारकडून मान्य करणेंत आलें आहे. या गोष्टीची अंमल-बजावणी करणेची ती, एकंदर सर्व परिस्थिती व अडचणी व कानडी भाषा वाचणारे व लिहिणारे लोकांची प्रस्तुतची वाण, तसेंच संस्थानांतील मराठी भाषा बोलणाऱ्या प्रजेच्या सोई व अडचणी या गोष्टी लक्षांत घेऊन कोणकोणत्या पायरीनें, किती प्रमाणांत व कशा रीतीनें व किती कालावधींत करावा असे विषयींचा एक कार्यक्रम तयार करून सादर करणें. "

कमिटीनें काय करावयाचें आहे ही गोष्ट वरील उताऱ्यावरून अगदीं स्पष्ट होणारी असल्यानें, त्याबद्दल निराळें विवेचन करणेची जरूरी आहे असें वाटत नाहीं. आमचेपुढें जो कानडी-मराठी भाषेचा प्रश्न आहे, तो भाषाप्रेममूलक नाहीं अगर मराठी काय किंवा कानडी काय, त्या त्या भाषेचा उत्कर्ष होण्याचे दृष्टीनें आम्हीं कांहीं योजना सुचविणेच्या नाहींत. मातृभाषा ही कोणालाही प्रिय असलीच पाहिजे आणि तिच्या उत्कर्षासाठीं प्रत्येकानें खटपटही केलीच पाहिजे. जमखंडी संस्थानांत दोन्ही भाषा गुण्यागोविंदानें नांदत असून दोन्ही भाषांचें संवर्धन करण्याकडे श्रीमंत राजासाहेब यांची सारखीच दृष्टि आहे, असें आम्ही निःशंकपणें म्हणूं शकतों. ही गोष्ट श्रीमंत राजासाहेब यांना खरोखरीच अत्यंत भूषणावह आहे. जमखंडी संस्थान हें मुख्यतः कर्नाटकांतच मोडत असलें तरी भौगोलिक दृष्टीनें कांहीं भाग मराठी प्रांतांत पडणारा असून, भाषेच्या दृष्टीनें तरी संस्थानांतील कांहीं भाग मराठी व कानडी या दोहोंच्या सीमाप्रांतावर आहे आणि म्हणून या दोन्ही भाषांच्या अभिमान्यांनीं परस्परांत दुजाभाव उत्पन्न न होऊं देतां, दोन्ही भाषांची जोपासना करावी आणि पूर्ण सलोखा नांदेल असें वातावरण निर्माण करावें यांतच त्यांचें कल्याण आहे. असो. हा विषय आमच्या अधि-कारांतील नाहीं. राज्यकारभाराचे दृष्टीनें, दप्तर मराठी असल्यानें, कानडी लोकांना भासणारी अडचण दूर कशी करावी इतकाच प्रश्न आमचेपुढें विचारासाठीं आहे. अर्थातच आम्ही जो उपाय सुचवावयाचा, त्या योगानें मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांची गैरसोय होणार नाहीं इकडेही पण लक्ष आम्हांस दिलेंच पाहिजे.

५६. आतां भाषाप्रसाराचे दृष्टीनें वस्तुस्थिति काय आहे हें थोडेसें पाहूं. जमखंडी संस्थानापैकीं कुंदगोळ तालुका हा पूर्णपणें कानडी बोलणारा आहे असें म्हणण्यास हरकत

नाहीं. जमखंडी तालुक्यांत मात्र तशी स्थिति नाहीं. जमखंडी शहरांतील लोक तर मराठी व कानडी अशा दोन्ही भाषा बोलतां येणारे आहेत. जमखंडी तालुक्यांतील कांहीं खेडीं तर मराठी आहेत. ठाणें पाटखळ व ठाणें वाठार हीं दोन ठाणीं केवळ महाराष्ट्रांतच असल्यानें संपूर्णपणें मराठीच आहेत. लोकसंख्येच्या मानानें पाहिलें तर, जमखंडी तालुक्यांतील लोकसंख्येपैकीं मराठी भाषा बोलणारे लोक १२०१९ इतके आहेत. कानडी लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांची संख्या तर अगदींच अल्प आहे. संस्थानचें दप्तर मराठींत आहे. परंतु संस्थानांतील व्यापारी लोकांचे व सावकारांचे खासगी हिशोब देखील व पत्रव्यवहार देखील मराठींतच ठेवण्याची पद्धत अगदीं प्रथमपासून आहे ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. असें असलें तरी कानडी लोकांची सोय ही केलीच पाहिजे. त्यांची सोय करूं नये असें कोणीच म्हणणार नाहीं. जमखंडी संस्थानांत प्राथमिक शिक्षण कानडींत देणेची तजवीज फार वर्षांपूर्वींच जाहलेली आहे असेंही आम्हांस समजतें. वर ज्या गोष्टी आम्हीं नमूद केल्या आहेत त्या नमूद करण्याचा हेतु इतकाच कीं मराठी भाषेची अडचण जितकी भासते तितकी ती तीव्र नाहीं आणि ती देखील क्रमाक्रमानें दूर होणारी आहे.

५७. हल्ली संस्थानमजकुरीं जो नोकरवर्ग आहे त्यांतील सर्वांना कानडी समजतेंच. काय तो प्रश्न लिहितां-वाचतां येणेचा. त्या दृष्टीनेंही श्रीमंत राजासाहेब यांनीं उपक्रम चालू केला आहे. गांवोगांवच्या पाटील कुलकर्ण्यांना कांहीं विवक्षित मुदतींत चांगलें कानडी लिहितां वाचतां आलें नाहीं तर काम करण्यास त्यांना नालायख ठरविणेंत येईल असा हुकूम देणेंत आलेलाच आहे. तसेंच संस्थानच्या नोकरांनाही कानडी भाषेची परीक्षा अवश्यक ठेवलेली आहे. अशा रीतीनें कानडी भाषा असणाऱ्या प्रजेची अडचण दूर व्हावी या दृष्टीनें संस्थानमजकुरीं उपक्रम सुरूंच असल्यानें या कमिटीचें काम सुकर जाहलें आहे.

५८. सरकारी दप्तरांत कानडीचा उपक्रम करणेंत यावा याबद्दल आम्हांस संशय वाटत नाहीं. परंतु या उपक्रमाची व्याप्ति किती असावी हा प्रश्न मात्र बराच भानगडीचा आहे. सामान्य लोकांचा संबंध अगदीं खालच्या प्रकारच्या दप्तरांशीं येणार म्हणजे गांवकऱ्यांचीं जीं दप्तरें आहेत त्या दप्तरांशीं त्यांचा संबंध येणार. हीं दप्तरें कानडी व मराठी अशा दोन्ही भाषांत ठेवण्याची जर प्रथा चालू केली तर आमचे मतें कोणतीच अडचण राहणार नाहीं. त्याचप्रमाणें मामलेदार कचेरींतील दप्तरही जरूरीप्रमाणें कानडी व मराठी अशा मिश्र भाषेंत असावें म्हणजे कोणाचीच गैरसोय होण्याचें कारण राहणार नाहीं. कोणी आपला अर्ज कानडींत दिला तर त्याचा स्वीकार करण्यांत यावा. मराठी दिला तर त्याचा स्वीकार करण्यांत यावा. भाषांतर करून देणेची सक्ति कोणावरच करणेंत येऊं नये. दोन्ही भाषा दप्तरी भाषा असें समजणेंत येऊन दोघींनाही सारखेंच महत्त्व देणेंत यावें. अर्जदारास अगर पक्षकारांस जी समज अगर उत्तर देणेचें तें त्यानें ज्या भाषेंत अर्ज दिला असेल त्या भाषेंतच देणेची पद्धत जर चालू केली तर त्यांत औचित्य अधिक आहे. म्हणून तशी पद्धति चालू करावी असें आम्ही सुचवितों.

५९. अर्थातच मामलेदार ऑफिसच्या वरचीं जीं मुलकी ऑफिसें आहेत, त्यांचेशीं सामान्य जनतेचा संबंध विशेषसा येत नसल्यानें, त्या ऑफिसांची भाषा मराठीच असली तरी हरकत नाहीं. मात्र त्या ऑफिसांत देखील अर्ज अगर जबाब कोणी कानडींत देईल तर त्याचा स्वीकार त्याच भाषेंत करणेंत यावा.

सबजज्ज कोर्टाची भाषाः—कानडी व मराठी अशी दोन्ही प्रकारची असावी. पक्षकार ज्या भाषेचा असेल ती भाषा त्यांचे पुरती मान्य करणेंत यावी. जबाब कानडी आणि मराठी जशी जरूरी उत्पन्न होईल त्याप्रमाणें दोन्ही भाषेंत घेणेंत यावेत. सारांश हल्लीं कोर्टाची भाषा मराठी आहे त्या ठिकाणीं मराठी व कानडी या दोन्ही भाषा मान्य करणेंत याव्यात.

६०. सबजज्ज कोर्टाहून जीं वरिष्ठ कोर्टें आहेत त्यांचे बाबतींत निर्बंध घालणेचें कांहीं कारण दिसत नाहीं. हल्लीं या कोर्टाचे बाबतींत जे निर्बंध आहेत त्यांत फेरफार करणेची कांहीं आवश्यकता आहे असें वाटत नाहीं.

६१. दस्तऐवज नोंदणी करणेची व्यवस्थाही दोन्ही भाषांत व्हावी म्हणजे त्या बाजूनेंही अडचण राहणार नाहीं. नोंदणीचीं बुकें निरनिराळीं ठेवण्यांत यावींत व कानडी व मराठी अशा दोन्ही भाषांना मान्यता देणेंत यावी.

६२. आतां शालेय शिक्षण कसें म्हणजे कोणत्या भाषेंत असावें हा प्रश्न मात्र दिसतो तितका सोपा नाहीं. सर्व ठिकाणीं दोन्हीं भाषेंतून शिक्षण मिळण्याची सोय करणें शक्य होणार नाहीं. खेड्यांतील प्राथमिक शाळा कानडीच आहेत. जमखंडी शहरीं व कुंदगोळ शहरीं मराठी व कानडी अशा दोन्ही भाषांतून शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत आणि मराठी बोलणाऱ्यांची संख्या आणि सरकारी दप्तराची भाषा कानडी बरोबर मराठी राहणारच. या गोष्टी ध्यानांत घेतल्या तर जमखंडी व कुंदगोळ येथें चालू असलेली दोन्ही भाषांतून शिक्षण मिळण्याची व्यवस्था चालूच राहिली पाहिजे असें आम्हांस वाटतें. तसेंच ठाणें वाठार व पाटखळ या ठाण्यांत शाळा केवळ मराठीच असल्या पाहिजेत हें लिहावयास नकोच. आम्ही भाषाप्रेमानें कोणतीही सूचना करूं इच्छित नाहीं. राज्यकारभाराच्या दृष्टीनें उभयभाषीय समाजास अडचण राहूं नये, इतकाच हेतु मनांत धरून आम्ही आमच्या सूचना केल्या आहेत.

६३. आमचेपुढें जो पुरावा जाहला आहे त्यांत मराठी भाषेची गळचेपी होऊं नये किंवा मराठी भाषेचें उच्चाटन होऊं नये आणि मराठी बोलणारी जी प्रजा संस्थानांत आहे, त्यांना व्यवहारांचे बाबतींत व शिक्षणाचे बाबतींत अडचण अगर गैरसोय होऊं नये असें मागणें आमचेपुढें मांडणेंत आलें आहे. मराठी भाषेची गळचेपी करावी अगर सरकारी दप्तरांतून या भाषेचें संपूर्णपणें उच्चाटन करावें, असा कोणाचाच आग्रह नसल्यानें ही भीति व्यर्थ आहे असें आम्हांस वाटतें. आतां मराठी बोलणाऱ्यांना अडचण होऊं नये आणि शिक्षणाचे बाबतींत त्यांचे मुलांना गैरसोय सोसावी लागूं नये हें त्यांचें म्हणणें वाजवी

आहे. श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी यांचेकडेही या बाबतींत कांहीं तक्रारी-अर्ज मराठी भाषा बोलणाऱ्यांकडून गेलेले आहेत. ते विचारासाठीं या कमिटीकडे श्रीमंत राजासाहेब यांनीं पाठविले आहेत. त्या अर्जांत देखील, मराठी भाषा बोलणाऱ्यांची कोणत्याही प्रकारें गैरसोय होणार नाहीं अशी व्यवस्था करणेंत यावी, अशी मागणी करणेंत आली आहे. मराठी भाषा बोलणारे लोक अल्पसंख्य असले तरी त्यांना अशा प्रकारचें संरक्षण मिळणें न्यायाचें आहे. जमखंडी येथें नुकतेंच दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे द्वितीय अधिवेशन भरविणेंत आलें होतें. त्या अधिवेशनांतही कानडी व मराठी भाषेबद्दल या कमिटीनें आपल्या शिफारसी श्रीमंत राजेसाहेब सरकार यांना सादर करतेवेळीं, कानडी अगर मराठी कोणत्याही भाषेच्या लोकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय अगर अडचण सोसावी लागूं नये, ही गोष्ट ध्यानांत घ्यावी अशी विनंत करणारा ठराव मंजूर करणेंत आला आहे. आमचे मतें हा ठराव समतोलपणाचा असून, ठरावांतील तत्त्व कोणासही अमान्य असण्याचें कारण दिसत नाहीं.

६४. जमखंडी संस्थानांतील कांहीं भाग महाराष्ट्र व कर्नाटक यांचे सीमेवर असल्यानें, कांहीं ठिकाणीं हा भाषाविषयक प्रश्न अधिक तीव्र झाला आहे, ही गोष्ट आम्हीं वर नमूद केलीच आहे. अल्पसंख्याक जाहले तरी ते लोक देखील संस्थानची प्रजा होत. आणि भाषेच्या दृष्टीनें बहुसंख्य लोकांच्या भाषेचा जुलूम त्यांचेवर होणार नाहीं अशी दक्षता घेतलीच पाहिजे. हा प्रश्न हंगेरी व झेकोस्लोव्हाकिया या युरोपखंडांतील दोन देशांत चांगल्या रीतीनें सोडविलेला आहे. त्या देशांत एकाहून अधिक भाषा चालू असून, तेथें भाषाविषयक तंटे फार वर्षांपासून चालू होते; परंतु आतां कायदे करून आणि सर्वांची चांगली सोय करून त्या देशांत हें भांडण मिटविण्यांत आलें आहे. हंगेरीच्या भाषाविषयक प्रश्नाचे बाबतींत एका प्रख्यात ग्रंथकाराचें मत या ठिकाणीं उद्धृत करावेंसें वाटतें. तें मत असें:—

The official language of the State is Magyar. In the Commune, members of linguistic minorities can address the local officials orally in their mother tongue, and must be answered in the same language; and communal officials in minority districts must speak the local minority language. The Communal Council chooses its own language of business, minutes are kept in Magyar and also in the language of a 20 percent minority. Communications from Minority Communes to their own higher local authorities (County, &c.) or to the central authorities, may be in the minority language, but a translation in Magyar must be attached. In Municipal and County Councils any person may use his own language; minutes may be kept in a minority language also if 20 percent of the members desire.

Free use of minority languages in private intercourse is guaranteed.

As regards Schools the law provided that (a) in any commune containing an overwhelming proportion of the members of one linguistic

minority the school committee and village council might, on the representations of the parents, decide to introduce, or (b) in a mixed commune the parents or guardians of at least forty childern belonging to one minority might ask for minority instruction according to any one of the following three types, between which they were in theory free to choose :

*A type* : Instruction in the mother-tongue, Magyar being taught as a subject ;

*B type* : Instruction in the mother tongue in natural history, physics, chemistry, economics, drawing, and handcrafts ; in the mother tongue and Magyar, in ' talking ' reading, writing, arithemetic and singing ; and in Magyar in geography, history, civics, and physical culture ;

*C type* : Instruction in Magyar, the minority language being taught as a subject reading and writing in both language.

—Hungary &c.

The Treaty of Trianon and its Consequences 1919–1937.
By
C. A. MACARTNY, (pp. 448–449 ).

६५. हा उतारा थोडासा मोठा आहे हें खरें; तथापि वाद्विषयक बाबींवर त्यामुळें चांगला प्रकाश पडत असल्यामुळेंच तो उद्धृत केला आहे. झेकोस्लोव्हाकियाचे बाबतींतही हेंच तत्त्व अमलांत आणलें असल्याचें दिसतें. त्याबद्दलही एका प्रख्यात ग्रंथकाराचें मत पुढें दिल्याप्रमाणें आहे.—

" So far as the satisfaction of scholastic requirements of the minorities in Czechoslovakia is concerned a decisive factor is that almost all the children of minority members are given the opportunity of being educated in schools where their own language is employed for instructional purposes, where the teachers are members of that minority and where textbooks are written in the minority language. Moreover school supervision and school administration is to a prevailing extent in the hands of the minority itself or is entrusted to a corporation in which that minority has its eqitable representation. "

( Czechoslavakia Sources & Documents No. 15 )
By Dr. EDWARD BEVES.
Christmas Message 1936 pp. 118–119

६६. वरील उताऱ्यावरून या बाबतींत आम्हीं केलेल्या सूचना अगदीं न्याय्य स्वरूपाच्या आहेत असें दिसून येईल अशी आम्हांस उमेद वाटते. आतां या ठिकाणीं एक गोष्ट मात्र लक्षांत ठेविली पाहिजे. हंगेरींत काय किंवा झेकोस्लोव्हाकियांत काय, सामान्य प्रजेपैकीं पुष्कळ अल्पसंख्याकांच्या भाषा निराळ्या आणि राज्यकर्त्यांची भाषा निराळी; किंबहुना तेथें असाही

प्रकार असल्याचें दिसतें कीं सरकारदप्तरची भाषा मातृभाषा नसणारा समाजच बहुसंख्य आहे. असें असलें तरी तेथेंही दप्तरची भाषा न बदलतां ती कायमच ठेवून अन्य भाषा असणाऱ्यांची सोय करणेंत आली आहे. आमच्या संस्थानांतील स्थिति तर याहून अधिक चांगली आहे. येथें दोन भाषा आहेत खऱ्या पण त्या बोलण्यापुरत्या. लेखनांत प्रामुख्यानें एकच भाषा आहे आणि तीच दप्तरची भाषा आहे. अर्थातच कोणी कानडींत लेखन केलें तर त्याला प्रतिबंध असावा असा आमचा अभिप्राय नाहीं. आमचें म्हणणें इतकेंच कीं, लेखनाची भाषा या दृष्टीनें आमचे संस्थानांत हें भांडण इतकें तीव्र नाहीं आणि म्हणून आम्हीं वर लिहिल्याप्रमाणें, सरकारी दप्तर दोन्ही भाषांत आणि विवक्षित प्रमाणांत चालूं ठेवण्याची पद्धति स्वीकारण्यांत आली तर हा वाद कायमचा मिटेल असें आम्हांस वाटतें.

६७. शालेय शिक्षणाचे बाबतींत हाच उभयविध उपक्रम चालूं ठेवण्यास हरकत नाहीं. अल्पसंख्य लोक अगदींच कमी असतील आणि मुलांची संख्या स्वतंत्र वर्ग किंवा शाळा चालविण्याजोगी पुरेशी नसेल तर त्या ठिकाणीं अर्थातच दोन्ही भाषांतून शिक्षण देणाऱ्या शाळा असाव्यात असा आग्रह धरणें वाजवीं होणार नाहीं. परंतु ज्या ठिकाणीं स्वतंत्र वर्ग चालविण्याइतकी मुलांची संख्या आहे असें दिसून येईल आणि स्वतंत्र वर्गाची मागणी असेल त्या ठिकाणीं त्या भाषेंतून शिक्षण मिळण्याची सोय असलीच पाहिजे असें आम्हांस वाटतें.

६८. याच ठिकाणीं आणखी एक सूचना करणें अस्थानीं होणार नाहीं असें वाटतें. सरकारचें दप्तर उभयविध होणार. सर्व नोकरांना कानडी व मराठी लिहितां-वाचतां येण्याची जरूरी उत्पन्न होणारच. अशा स्थितींत प्रथम सर्वच विद्यार्थ्यांना तिसऱ्या इयत्तेपासून कानडी व मराठी या दोन्ही भाषा लिहितां वाचतां येतील असें शिक्षण देण्याची सोय सर्वच शाळांतून करण्यांत यावी असें आम्ही सुचवितों. या बाबतींत लिहितां वाचतां येण्यापुरत्या दोन्ही भाषा शिकण्याची सक्तीदेखील मुलांचेवर करणेंत यावी असाही कित्येकांचा अभिप्राय आहे. परंतु असें करणें आम्हांस इष्ट दिसत नाहीं. लहान वयांत विद्यार्थ्यांचेवर अशी सक्ति करून त्यांचे बुद्धीवर व मनावर जास्त ताण घालणें इष्ट होईल असें आम्हांस वाटत नाहीं. सक्ति नसावी परंतु विद्यार्थ्यांची इच्छा असेल तर तिसऱ्या इयत्तेपासून पुढें तशी सोय मात्र असावी हें म्हणणें आम्हांस मान्य आहे. ज्या विद्यार्थ्यांना या व्यवस्थेचा फायदा घेणेंचा असेल त्यांनीं तो घ्यावा आणि लिहितां वाचतां येण्यापुरतें कां होईना दोन्ही भाषांचें ज्ञान अवश्य संपादन करावें. प्रारंभींच अशी तजवीज झाली तर भाषाज्ञानाची अडचण पुढें पडणार नाहीं; इतकेंच काय परंतु भाषाविषयक दुराग्रहही आपोआप नाहींसे होतील.

६९. सारांश सरकारी दप्तराचे आणि शिक्षणाचे बाबतींत जरूर त्या प्रमाणांत दोन्ही भाषांना मान्यता मिळून दोन्ही भाषांचा उपयोग केला जावा असें आम्हांस वाटतें. कोणतीही भाषा बोलणाऱ्यांची गैरसोय होऊं नये ही गोष्ट आणि कानडी लिहितां-वाचतां येणाऱ्या इसमांची सांप्रतची वाण या गोष्टी ध्यानांत ठेवूनच उपाय सुचविणेबद्दल श्रीमंत राजासाहेब यांची आज्ञा आहे. त्या आज्ञेला अनुसरून आणि सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन आम्हीं वरील उपाय सुचविले आहेत. कोणत्याही भाषेबद्दल कोणीही दुजाभाव बाळगणेचें

कारण नाहीं. संस्थानांत दोन्ही भाषा प्रेमानें नांदाव्यात अशी घोषणा श्रीमंत राजासाहेब यांनीं केली आहे. ती नजरेपुढें ठेवून आम्हीं आमच्या शिफारशी केल्या आहेत. त्यामुळें सर्व अडचणी नाहींशा होतील आणि दोन्ही भाषा बोलणाऱ्यांचें समाधान होईल अशी आम्हांस उमेद वाटते. भाषेच्या अडचणी नाहींशा करण्याचे दृष्टीनें कोणतें ध्येय ठेवण्यांत यावें आणि काय व्यवस्था करणेंत यावी याबद्दलचा आमचा अभिप्राय आम्हीं वर नमूद केलाच आहे. या सर्व गोष्टी किती मुदतींत आणि कशा प्रमाणानें साध्य कराव्यात याबद्दलही योजना सुचवावी, असाही हुकूम श्रीमंत राजासाहेब यांनीं आम्हांस केलेला आहे. त्याबद्दल आतां विचार करूं.

७०. सांप्रत दप्तरची भाषा पूर्णपणें मराठी आहे. खेड्यांतील प्राथमिक शाळा कानडी असल्या तरी कानडी लिहितां–वाचतां येणाऱ्या लोकांची संख्या अगदींच अल्प आहे. व्यापाऱ्यांचे व सावकारांचे हिशोब मराठींतच ठेविले जातात. कानडी लिहितां–वाचतां येणाऱ्यांना देखील मराठी लिहितां वाचतां येतेंच. मराठी बोलणें तर पुष्कळांना समजतें. रेकार्ड सर्व मराठींतच आहे. या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या तर आम्हीं वर नमूद केलेल्या सूचना अमलांत आणण्याची कालमर्यादा पांच ५ वर्षांची असावी असें आम्हांस वाटतें. या मुदतींत क्रमानें पुढीलप्रमाणें तजविजी करण्यांत याव्यात.

(अ) सर्व गांवकामगारांना कानडी व मराठी या दोन्ही भाषांचें चांगलें लिहितां–वाचतां येण्यापुरतें ज्ञान अवश्य करावें. हें ज्ञान त्यांनीं विवक्षित मुदतींत संपादन करावें अशी सक्ति त्यांचेवर असावी.

(ब) संस्थानांतील सर्व नोकरांना मराठी व कानडी दोन्ही भाषांचें ज्ञान आवश्यक असावें. ही योजना पांच वर्षांत पूर्ण व्हावी.

(क) गांवकामगारांचीं दप्तरें दोन्ही भाषेंत चालूं करणेंत यावींत. ही व्यवस्था अगदीं प्रथम होणेस हरकत नाहीं.

(ड) अर्जदारांचे अर्ज कानडींतून अगर मराठींतून कोणत्याही भाषेंतून आले तरी त्यांचा स्वीकार करणेंत यावा. अर्जास उत्तर त्या त्या भाषेंत देण्याची व्यवस्था असावी.

(ई) साक्षीदारांचे अगर पक्षकारांचे जबाब कोणत्याही भाषेंत घेण्याची व्यवस्था असावी. ही व्यवस्था क्रमानें पांच वर्षांत अमलांत आणावी.

(फ) नोंदणीसाठीं हजर करणेंत येणारे कागद कोणत्याही भाषेंत नोंदविण्याची व्यवस्था असावी. ही व्यवस्था क्रमानें पांच वर्षांत अमलांत आणावी.

(जी) स्टेट–गॅझेटमधील सार्वजनिक लोकांचे माहितीसाठीं प्रसिद्ध होणारा मजकूर-नोटीसा, जाहीरनामे वगैरे मराठी व कानडी अशा दोन्ही भाषांमधून प्रसिद्ध होणेची तजवीज व्हावी. ही तजवीज क्रमानें पांच वर्षांत व्हावी.

७१. वर लिहिल्याप्रमाणें सर्व योजना पांच वर्षांत पुरी होणेस अडचण पडूं नये असें आम्हांस वाटतें. ही व्यवस्था अमलांत आणणेची मर्यादा पांच वर्षांची असावी याचा अर्थ असा नव्हे, कीं हा उपक्रम पांच वर्षांनंतर करण्यांत यावा. उपक्रम सोईप्रमाणें जरूर करणेंत यावा. सर्व योजना पांच वर्षांचे मुदतींत पुरी करण्यांत यावी असा आमचा अभिप्राय आहे. हल्लीं देखील संस्थानांतील बहुतेक नोकरांना कानडी समजतेंच. अडचण काय ती लिहितां—वाचतां येण्याची. ही अडचण अगदीं ताबडतोब दूर व्हावी म्हणून भाषा मात्र कानडी परंतु लिपी देवनागरी असा उपक्रम तूर्त करणेंत यावा, अशी एक सूचना आमचेपुढें करणेंत आली आहे. ही सूचना अमलांत आणली गेल्यास भाषा आज देखील सर्वांना समजतच असल्यानें लिहिण्यावाचण्याची अडचण नाहींशी होईल ही गोष्ट खरी आहे. तथापि, कानडी भाषेच्या सोईच्या दृष्टीनें अर्धवट स्वरूपाची ही सूचना पुष्कळांना मान्य होणेजोगी नाहीं आणि ती तशी मान्य नसल्याचें पुष्कळ साक्षीदारांनीं आमचे पुढें सांगितलेलेंही आहे. देवनागरी लिपी योजण्यांत या साक्षीदारांपैकीं कांहींनीं अशी ही अडचण दाखविली आहे, कीं कानडी भाषेच्या शुद्ध व विशिष्ट वर्ण लेखनास देवनागरी लिपी अपुरी पडते आणि म्हणून या लिपींत कानडी भाषा लिहिण्याची पद्धति सुरू जाहल्यास भाषेचें शुद्ध स्वरूप नाहींसें होईल. ही अडचण खरी आहे. कीं खोटी आहे, याविषयीं आम्ही येथें चर्चा करीत नाहीं. इतकी गोष्ट मात्र खरी, कीं देवनागरीचा उपयोग करण्याचे बाबतींत बहुसंख्य लोक प्रतिकूल आहेत. आणि कानडी लिपींतूनच लिहितां वाचतां येणें ही गोष्ट देखील फारशी अवघड आहे अशांतला प्रकार नसल्यानें आणि पांच वर्षांच्या थोडक्या अवधींत देखील आम्हीं वर सुचविलेली योजना अमलांत येणेजोगी असल्यानें, भाषा कानडी आणि लिपी मात्र देवनागरी असा प्रकार संस्थानांत रूढ करण्याची शिफारस आम्ही करूं इच्छित नाहीं.

# भाग ५

## समारोप

७२. श्रीमंत राजासाहेब यांचे आज्ञेप्रमाणें आम्हीं सर्व गोष्टींचा विचार करून, सर्व परिस्थिति ध्यानीं घेऊन आणि सर्व मतप्रणालीकडे पूर्ण लक्ष पुरवून, आमचा अभिप्राय सादर केला आहे. असें करतांना आम्ही म्हैसूर, त्रावणकोर, कोचीन, ग्वाल्हेर, बडोदा, इंदूर, सांगली वगैरे संस्थानांत झालेले राजकीय हक्कदानाचे उपक्रम नजरेसमोर ठेवलेले आहेत. आणि आम्ही अभिमानानें म्हणूं शकतों कीं, वर नमूद केलेल्या कोणत्याही संस्थानांतील सुधारणांशीं आम्हीं शिफारस केलेल्या सुधारणांची तुलना केल्यास भरीवपणांत किंवा अधिकारसंक्रमणाचे बाबतींत आम्हीं सुचविलेल्या सुधारणा कमी महत्त्वाच्या ठरणार नाहींत.

७३. काळ झपाट्यानें बदलत आहे. आजची स्थिति आणखी दहा वर्षांनीं राहीलच अशी खात्री कोणासच देतां येणार नाहीं म्हणून आम्हीं सुचविलेल्या सुधारणांचा हप्ता श्रीमंत राजासाहेब यांनीं कृपाळूपणानें प्रजेस दिला तरी या सर्व गोष्टींचा फेरविचारही त्यांना योग्य

काळीं करावा लागणारच. प्रजेला अद्यापि कारभाराचा अनुभव यावयाचा आहे. सुरू होणारें नवीन राज्ययंत्र अपरिचित असून, आजूबाजूच्या संस्थानांत देखील हा उपक्रम अद्यापि चालू नाहीं. यासाठीं या सुधारणांच्या अनुभवाची कालमर्यादा दहा १० वर्षांची असावी असें आम्ही सुचवितों. या अवधींत प्रजेला दिलेले अधिकार प्रजेकडून कोणत्या रीतीनें वापरले जातात, अधिकारदानाच्या पात्रतेच्या दृष्टीनें प्रजेच्या लायखींत कशी व कितपत भर पडते आणि लोकसत्ताक राज्यपद्धतीचा उपक्रम या लहानशा संस्थानांत यशस्वी होतो किंवा कसें या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव येईल. त्या अनुभवाचे धोरणानें आम्हीं सुचविलेल्या राज्यव्यवस्थेंत जरूर व योग्य ते फरक श्रीमंत राजेसाहेब यांनीं दहा वर्षांनंतर करण्याची कृपेनें तजवीज करावी अशी आमची शिफारस आहे.

या सुधारणांचे बाबतींत फेरविचार करण्याची मुदत आम्हीं दहा वर्षांची असावी असें म्हणतों; पण याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, जरूरीच्या मानानें या गोष्टींचा विचार श्रीमंत राजेसाहेब यांनींही मुदत भरण्याचे आधीं करूंच नये अगर तसें करण्याचा यांना अधिकार नाहीं. श्रीमंत राजासाहेब यांचे अधिकाराबद्दल वादच नाहीं. सर्व सत्ता त्यांचे ठिकाणीं केंद्रीभूत झाली असून, संस्थानांत कोणतीही राज्यपद्धति सुरूं जाहली अगर केली गेली तरी संस्थानिकाच्या आधिपत्याखालींच असणार याबद्दलही वाद नाहीं. परिस्थितीच्या मानानें अगर अन्य कांहीं कारणानें या सुधारणांत फेरफार करण्याची, वाढ करण्याची अगर या सुधारणा रद्द करण्याची जरूरी उत्पन्न झाल्यास, तसें करण्याचा अधिकार श्रीमंत राजासाहेब यांना केव्हांही आहेच. आणि तो अधिकार बजावण्यास कोणतीच हरकत नाहीं. स्वाभाविक क्रमांत या सुधारणांचा फेरविचार करण्याची मुदत दहा वर्षांची असावी इतकेंच आमचें म्हणणें आहे.

७४. या समितीचें काम पुरें करण्याचे कामीं वेळोवेळीं माहिती पुरवून व अन्य प्रकारें, संस्थानचे कर्तबगार व लोकप्रिय दिवाण रावबहादुर रामचंद्र केशव भागवत यांनीं व संस्थानच्या इतर अधिकाऱ्यांनीं आम्हांस सहाय्य केलें आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. तसेंच जमखंडी संस्थानच्या प्रजा-पुढाऱ्यांनीं व जाणत्या लोकांनीं आमचे प्रश्नावलीस लेखी उत्तरें पाठवून व तोंडी खुलासा करून, आम्हांस आमचे कामांत मदत केली याबद्दल आम्ही त्यांचेही आभारी आहों.

७५. या समितीच्या सभासदांमध्यें देखील कांहीं वेळां महत्त्वाचे मतभेद उत्पन्न होण्याचे प्रसंग उत्पन्न जाहले; तथापि, सर्व सभासदांनीं परस्परांचे हेतु प्रामाणिकपणानें समजावून घेऊन गैरसमज वाढूं नयेत आणि समितीचें काम अडूं नये इकडे दृष्टि ठेवून, काम तडीला नेलें ही गोष्टही नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटतो.

जमखंडी
तारीख ९ जुलै १९४०

Sd/- भास्कर बहिरव महाबळ,
चेअरमन

Sd/- अमृतराव व्यंकटराव धारेश्वर.

Sd/- गोपीनाथ विठ्ठल टिकेकर

या रिपोर्टपैकीं ज्या गोष्टी आम्हांस मान्य नाहींत त्याबद्दल आमचें म्हणणें आम्हीं स्वतंत्रपणें दिलेंच आहे. बाकीचा भाग आम्हांसही मान्य आहे.

ता. ९।७।४०　　　　　　　Sd/- बी. एच. खर्डेकर

हा रिपोर्ट आम्हीं समग्र वाचून पाहिला. यांतील ज्या महत्त्वाच्या मुद्यांबद्दल आम्ही सहमत होऊं शकलों नाहीं, त्यासंबंधीं आम्हीं आमच्या सूचना स्वतंत्रपणें केल्या आहेत.

ता. ९।७।४०　　　　　　　Sd/- गोविंद दत्तात्रय आपटे
Sd/- अनंत वासुदेव सावडे
Sd/- पंचापा बसलिंगापा कोरी

सदरहू रिपोर्ट मीं वाचून पाहिला. सर्व महत्त्वाचे बाबींविषयीं मीं माझे विचार स्वतंत्र रिपोर्टनिं कळविले आहेत. त्या बाबींखेरीज रिपोर्टांतील बाकीच्या गोष्टी मान्य आहेत.

ता. ९।७।४०　　　　　　　Sd/- केंचणगौडा रंगणगौडा नाडगीर,
जमेदार, कुंदगोळ.

# परिशिष्ट १ लें

## घटनासमितीनें तयार केलेली प्रश्नपत्रिका

### १ प्रचलित राज्यघटनेबाबत.

१ जबाबदार राज्यपद्धतीचा उपक्रम करण्याचे दृष्टीनें पहिला हप्ता म्हणून प्रचलित राज्यव्यवस्थेंत कोणते फेरफार करणें इष्ट होईल ? याबद्दलची एखादी संपूर्ण योजना तुम्ही सुचवितां काय ?

२ हल्लींच्या कायदेमंडळाच्या कायद्यांत व कामकाजाचे नियमांत बजेटाबाबत जे अधिकार देणेंत आले आहेत त्यांत कांहीं फेरफार करणें अवश्यक आहे काय ? असल्यास कोणते ?

३ प्रश्न विचारणेच्या बाबतींतील हल्लींच्या नियमांत कांहीं बदल करणें इष्ट व जरूरीचें आहे काय ? असल्यास हा बदल काय असावा ?

### २ मताचा अधिकार व मतदारसंघ.

जमखंडी कायदेमंडळाच्या मतदारसंघाची व मतदारांची व्यवस्था हल्लीं खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

मतदारसंघाची यादी.

| अनु नंबर | मतदारसंघाचें नांव | मतदारसंघाचा वर्ग | | मतदारसंघाची व्याप्ति | निवडून यावयाच्या सभासदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जमखंडी तालुका दक्षिणभाग | सामान्य | ग्रामिक | जुन्या जमखंडी सर्कलमधील सर्व शहरें व खेडीं | २ |
| अ | जमखंडी तालुका उत्तरभाग | ,, | ,, | सावळगी सर्कल म्हणजे जुन्या बिद्री तालुक्यांतील सर्व खेडीं | १ |
| २ | कुंदगोळ तालुका | ,, | ,, | कुंदगोळ तालुक्यांतील सर्व शहरें व खेडीं | २ |
| ३ | वाठार ठाणें | ,, | ,, | वाठार ठाण्यांतील दोन खेडीं मिळून | १ |
| ४ | पाटखळ ठाणें | ,, | ,, | पाटखळ ठाण्यांतील दोन खेडीं मिळून | १ |
| ५ | जमखंडी | ,, | नागर | जमखंडी शहर म्यु. हद्दींतील क्षेत्र | २ |
| ६ | हुन्नूर व रामतीर्थ | ,, | ,, | हुन्नूर म्यु.हद्द व रामतीर्थ मजरेच्या सर्व्हेच्या नकाशाप्रमाणें हद्द | १ |
| ७ | बन्हट्टी | ,, | ,, | बन्हट्टी म्यु. हद्दींतील क्षेत्र | १ |
| ८ | कुंदगोळ | ,, | ,, | कुंदगोळ म्यु. हद्दींतील क्षेत्र | १ |
| ९ | सांवशी व कमडोळी | ,, | ,, | सांवशी व कमडोळी म्यु. हद्दींत येणारें क्षेत्र | १ |
| १० | शैक्षणिक | विशेष | | जमखंडी संस्थानचें सर्व क्षेत्र | १ |
| ११ | व्यापार | ,, | | जमखंडी संस्थानांतील सर्व क्षेत्र | १ |
| १२ | तैनातदार | ,, | | जमखंडी संस्थानांतील सर्व क्षेत्र | १ |
| | | | | | १६ |

वि. सूचनाः—खेडें म्हणजे गांवठाण व सर्व्हेच्या नकाशांतील सर्व क्षेत्र. मंजूर तारीख ८ माहे मार्च सन १९३३ इसवी.

१ कायदेमंडळाच्या सभासदांची संख्या हल्लीं आहे तीच कायम ठेवावी कीं जास्ती करावी कीं कमी करावी ?

२ जास्ती करणेची झाल्यास किती असावी व कमी करणेची झाल्यास किती असावी?

३ एकंदर संख्येपैकीं लोकनियुक्त किती असावेत, सरकारी अधिकारी किती असावेत व सरकारनियुक्त किती असावेत ?

४ कायदेमंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे सरकारनियुक्त असणें योग्य होईल कीं लोकनियुक्त असणें योग्य होईल ?

५ मत देण्याच्या अधिकाराबद्दल शैक्षणिक अगर इतर लायखी काय असावी व वयोमर्यादा काय असावी ?

६ मत देण्याचा अधिकार स्त्रियांना व पुरुषांना सारख्याच लायखीवर अवलंबून ठेवावा कीं स्त्रियांचे बाबतींत मताधिकाराबद्दल निराळे निर्बंध घालावेत. घालणें जरूर असल्यास कोणते ?

७ सभासदांची शैक्षणिक लायखी काय असावी ? सभासदांचें बाबतींत पात्रतेच्या दृष्टीनें कांहीं वयोमर्यादा घालणें इष्ट आहे काय ?

८ हल्लीं अस्तित्वांत असलेल्या मतदारसंघांत कांहीं फेरफार करणें इष्ट आहे कीं कसें ? असल्यास मतदारसंघ कसे व किती बनविणेंत यावेत.

९ मतदारसंघांत सभासदांची वांटणी कशी करावी ?

१० शिक्षित, स्त्रिया, अल्पसंख्याक, हरिजन व व्यापारी वगैरेसाठीं स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करणेंत यावेत अगर कसें ? असे स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करणें इष्ट नसल्यास सामान्य मतदारसंघांत वर नमूद केलेल्या वर्गाच्या हिताचे दृष्टीनें कांहीं जागा राखून ठेवणें इष्ट होईल कीं कसें ? इष्ट नसेल तर या वर्गाच्या हितसंबंधाचें संरक्षण होणेचे दृष्टीनें काय तजवीज करणें इष्ट होईल ?

११ योग्य इसमांना मतदानाचा अधिकार मिळावा व योग्य उमेदवार निवडून यावेत यासाठीं आणखी कोणते उपाय तुम्ही सुचवितां ?

## कानडी दप्तर.

१ सरकारी दप्तरची भाषा शक्यतों कानडी असावी हें तत्त्व मान्य करण्यांत आलें आहे. त्या तत्त्वाची अम्मलबजावणी करण्याच्या दृष्टीनें 'कानडी दप्तर' या शब्दाची व्याख्या व व्याप्ति काय असणें इष्ट होईल ?

२ हें तत्त्व मर्यादित स्वरूपांत मान्य करण्यांत यावें अशी विनंति मराठी बोलणाऱ्या लोकांनीं केली आहे; तरी त्या दृष्टीनें काय तजवीज करणें इष्ट होईल ?

३ सरकारी दप्तर कानडी करण्याच्या दृष्टीनें कानडी भाषेचा उपक्रम करणेचा तो कोणत्या क्रमानें व किती अवधीनें करणें इष्ट होईल याबद्दल एखादी योजना तुम्ही सुचवूं शकाल काय ?

४ प्रारंभ म्हणून आज कोणत्या गोष्टी कानडीचा उपक्रम करण्याच्या दृष्टीनें करणें आवश्यक व शक्य आहे ?

५ संस्थानचें दप्तर आजपर्यंत मराठींत आहे. कानडी लिहितां-वाचतां येणाऱ्या लोकांचें प्रमाण अगदीं अल्प आहे. अशा स्थितींत एकदम पूर्णपणें कानडी दप्तर करण्याचें ठरविल्यास तें सोईचें व शक्य होईल काय ?

६ मराठी ही अल्पसंख्याकांची भाषा असली तरी दप्तर कानडी होण्याचे दृष्टीनें मराठीचें संरक्षण व संवर्धन करणें जरूरीचें नाहीं काय ? असल्यास त्याबद्दल काय तजवीज करणें इष्ट व सोईचें होईल ?

७ संस्थानांतील सर्वच विद्यार्थ्यांना कानडी व मराठी अशा दोन्ही भाषांचें शालेय शिक्षण सक्तीचें करणें इष्ट व सोईचें होईल काय ?

८ मराठी भाषा असणाऱ्या लोकांना भाषेच्या दृष्टीनें अडचण व गैरसोय न व्हावी यासाठीं तुम्ही सर्वसाधारणपणें कोणते उपाय सुचवितां ?

९ कानडीचें मराठीवर व मराठीचें कानडीवर आक्रमण न होईल याबद्दल जरूर ती दक्षता घेणें न्याय्य व इष्ट आहे कीं नाहीं ? असल्यास त्या दृष्टीनें काय तजवीज करणें इष्ट होईल ?

१० सरकारदप्तरची भाषा मराठी असली तरी त्यामुळें कानडी बोलणाऱ्या लोकांच्या व्यवहारास अडचण येते असें तुम्हांस वाटतें काय ?

११ दप्तर कानडी भाषेंत ठेवणेचें ठरलें तरी लिपी देवनागरी असावी कीं कानडी असणें जरूरीचें आहे ?

Sd/- भा. व. महाबळ,
चेअरमन

Sd/- वा. ह. खर्डेकर
Sd/- अ. त्र्यं. धारेश्वर
Sd/- गो. वि. टिकेकर
Sd/- गो. द. आपटे
Sd/- अ. वा. साबडे
Sd/- पं. व. कोरी
Sd/- कें. रं. नाडगीर

---

सूचनाः--या प्रश्नपत्रिकेची प्रत कोणाची मागणी आल्यास त्यास दिली जाईल. याबद्दलचा पत्रव्यवहार सेक्रेटरी, घटनासमिति जमखंडी, यांचेशीं करावा.

# परिशिष्ट २ रें

## द्विदल राज्यपद्धतीप्रमाणें सोंपीव खात्यांची यादी

| नंबर | खातीं | नंबर | खातीं |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण. | ६ | जनावरांचा दवाखाना व जनावरांसाठीं वैद्यकीय मदत. |
| २ | वैद्यक व वैद्यकीय मदत. | ७ | जंगल. |
| ३ | पब्लिक वर्क्स ( कांहीं अंशानें ) | ८ | सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, जनन-मरण नोंदी वगैरेसह. |
| ४ | नोंदणी व स्टँप | ९ | स्थानिक-स्वराज्य. |
| ५ | शेतकी खातें. | १० | वजन व मापें. |

Sd/-भा. ब. महाबळ,
चेअरमन्

Sd/-वा. ह. खर्डेकर
Sd/-अ. त्र्यं. धारेश्वर
Sd/-गो. वि. टिकेकर
Sd/-गो. द. आपटे
Sd/- पं. ब. कोरी
Sd/-के. रं. नाडगीर
Sd/-अ. वा. साबडे

# परिशिष्ट ३ रें

## हल्लीं अस्तित्वांत असलेलें कायदेमंडळ

### त्याची घटना व मतदारसंघ

जमखंडी कायदेमंडळाच्या मतदारसंघाची व मतदारांची व्यवस्था हल्लीं खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. मतदारसंघाची यादी.

| अनुक्रम नंबर | मतदारसंघाचें नांव | मतदारसंघाचा वर्ग | | मतदारसंघाची व्याप्ति | निवडून यावयाच्या सभासदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जमखंडी तालुका दक्षिणभाग | सामान्य | ग्रामिक | जुन्या जमखंडी सर्कलमधील सर्व शहरें व खेडीं | २ |
| अ | जमखंडी तालुका उत्तरभाग | " | " | सावळगी सर्कल म्हणजे जुन्या बिद्री तालुक्यांतील सर्व खेडीं | १ |
| २ | कुंदगोळ तालुका | " | " | कुंदगोळ तालुक्यांतील सर्व शहरें व खेडीं | २ |
| ३ | वाठार ठाणें | " | " | वाठार ठाण्यांतील दोन खेडीं मिळून | १ |
| ४ | पाटखळ ठाणें | " | " | पाटखळ ठाण्यांतील दोन खेडीं मिळून | १ |
| ५ | जमखंडी | " | नागर | जमखंडी शहर म्यु. हद्दींतील क्षेत्र | २ |
| ६ | हुन्नूर व रामतीर्थ | " | " | हुन्नूर म्यु. हद्द व रामतीर्थ मजरेच्या सर्व्हेच्या नकाशाप्रमाणें हद्द | १ |
| ७ | बनहट्टी | " | " | बनहट्टी म्यु. हद्दींतील क्षेत्र | १ |
| ८ | कुंदगोळ | " | " | कुंदगोळ म्यु. हद्दींतील क्षेत्र | १ |
| ९ | सांवशी व कमडोळी | " | " | सांवशी व कमडोळी म्यु. हद्दींत येणारें क्षेत्र | १ |
| १० | शैक्षणिक | विशेष | | जमखंडी संस्थानचें सर्व क्षेत्र | १ |
| ११ | व्यापार | " | | जमखंडी संस्थानांतील सर्व क्षेत्र | १ |
| १२ | तैनातदार | " | | जमखंडी संस्थानांतील सर्व क्षेत्र | १ |
| | | | | | १६ |

वि. सूचना:—खेडें म्हणजे गांवठाण व सर्व्हेच्या नकाशांतील सर्व क्षेत्र. मंजूर तारीख ८ माहे मार्च सन १९३३ इसवी.

Sd/—भा. ब. महाबळ,
चेअरमन

Sd/—वा. ह. खर्डेकर

Sd/—अ. व्यं. धारेश्वर

Sd/—गो. वि. टिकेकर

Sd/—गो. द. आपटे

Sd/—अ. वा. साबडे

Sd/—कें. रं. नाडगीर

Sd/—पं. ब. कोरी

# परिशिष्ट ४ थें

## नवीन होणारें कायदे–मंडळ

### त्याची घटना व मतदारसंघ

वर नमूद केलेलीं तत्त्वें अमलांत आणणेची जाहल्यास खालीं लिहिल्याप्रमाणें मतदारसंघ आणि जागांची विभागणी करावी लागते.

| नं. | मतदारसंघाचें नांव | मतदारसंघाचा प्रकार | मतदारसंघाची व्याप्ति. | निवडून यावयाच्या सभासदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | सामान्य | | |
| १ | जमखंडी ता. दक्षिण भाग. | सामान्य ग्रामि. | | ४ |
| २ | ,, ,, उत्तर भाग. | ,, | | २ |
| ३ | कुंदगोळ तालुका | ,, | | ३ |
| ४ | ठाणें वाठार व पाटखळ मिळून सामान्य मतदारसंघ. | ,, | | १ |
| ५ | कुंदगोळ व जमखंडी ता. मिळून सा. मतदार संघ. | सामान्य | | मराठा राखीव जागा १ |
| ६ | ,, | (ग्रामिक व नागर मिळून) | | मुसलमान राखीव जागा १ |
| ७ | जमखंडी | सामान्य-नागर | | २ |
| ८ | कुंदगोळ | ,, | | १ |
| ९ | बन्हट्टी–हुन्नूर | ,, | | १ |
| १० | सावळगी–चिंद्री | ,, | | १ |
| ११ | सांवशी–कमडोळी | ,, | | १ |
| १२ | तैनातदार | विशेष | | १ |
| १३ | शैक्षणिक | ,, | | १ |
| १४ | व्यापारी | ,, | | १ |
| १५ | स्त्रिया | ,, | | १ |
| १६ | विणकरी | ,, | | १ |
| १७ | हरिजन | ,, | | १ |

**टीपः**—मराठा समाज व मुसलमान समाज यांचेसाठीं ज्या राखीव जागा ठेविल्या आहेत त्यांची निवडणूक जमखंडी व कुंदगोळ तालुक्यांतील सामान्य मतदारसंघाकडून होणेची आहे. मात्र मतदारास या सामान्य मतदारसंघांत एकाहून अधिक रीतीनें मत देणेची पात्रता येत असली तरी त्यास कोणत्याही पात्रतेनुरूप एकच मत देणेचा अधिकार राहील.

Sd/– **भा. व. महाबळ,**
चेअरमन

Sd/– **बा. ह. खडकर**
Sd/– **गो. वि. टिकेकर** Sd/– **गो. द. आपटे**
Sd/– **अ. बा. साबडे** Sd/– **कें. रं. नाडगीर**
Sd/– **अ. त्र्यं. धारेश्वर** Sd/– **पं. ब. कोरी**

# परिशिष्ट ५ वें

## ज्यांनीं समितीचे प्रश्नावलीस उत्तरें पाठविलीं त्यांची यादी

टीपः—ज्यांच्या नांवामागें * अशी खूण केली आहे त्यांच्या तोंडी साक्षी घेण्यांत आल्या आहेत.

| शेज नंबर | इसमाचें नांव | राहण्याचें ठिकाण |
|---|---|---|
| *१ | रा. भालचंद्र सदाशिव पेंडसे | जमखंडी |
| *२ | ,, खंडेराव गोविंदराव घोरपडे | ,, |
| ३ | ,, आण्णाजी व्यंकाजी कुलकर्णी | ,, |
| *४ | ,, व्यंकटेश राजाराम देवधर | ,, |
| *५ | ,, सखाराम विष्णू म्हसकर | ,, |
| *६ | ,, दामोदर रामचंद्र हुल्याळ | ,, |
| *७ | ,, बिंदूराव रामराव नरगुंदकर | ,, |
| ८ | ,, माधव त्रिमल देशपांडे | ,, |
| *९ | ,, आपाराव परशुराम शिंदे वगैरे जमखंडी मराठा प्रजाजन. | ,, |
| *१० | ,, हाजी नबीसाहेब फकरोद्दीन सा. चौधरी वगैरे जमखंडी मुसलमान लोकांतर्फे | ,, |
| *११ | ,, अबदुल रहमान गावसखान | गोकाक |
| *१२ | ,, रुकनोद्दीन शिराजोद्दीन काजी | ,, |
| *१३ | ,, गोविंद हणमंत कुलकर्णी | ,, |
| *१४ | ,, चिदंबर विनायक आपटे | ,, |
| *१५ | ,, धोंडो सखाराम गोखले | ,, |
| *१६ | ,, कृष्णाजी गोविंद रानडे | ,, |
| *१७ | सौ. वेणूताई भालचंद्र पटवर्धन | ,, |
| *१८ | रा. हणमंत सदाशिव पटवर्धन व प्रभू महादू माळी वगैरे स्टेटचे कारकून लोकांतर्फे | ,, |
| *१९ | ,, अमृतराव रामराव सावंत | ,, |
| २० | ,, अनंत वासुदेव साबडे जमखंडी प्रजापरिषदेचे कार्यदर्शक | ,, |
| २१ | ,, राजाराम आणपा रजपूत | ,, |
| २२ | ,, श्रीनिवास दासो आनीखिंडी | ,, |
| २३ | ,, इमामोद्दीन शिराजसा. काजी. | ,, |
| २४ | ,, नारायण श्रीनिवास गलगली | ,, |
| २५ | ,, के. आर. मुगळखोड | ,, |
| २६ | ,, व्यंकटेश शामराव नाडगौडा | ,, |
| २७ | ,, यशवंत गणेश वाटवे | ,, |
| २८ | सौ. कमलाबाई शेषगीर हुल्याळ | गोकाक |
| २९ | रा. नारायण सांचदिक्षीत होनवाड | ,, |
| ३० | ,, श्रीपाद गोविंद देसाई | ,, |
| ३१ | ,, व्यंकटेश श्रीपाद फडके | ,, |
| ३२ | ,, सिद्रामपा रामपा जंबगी | ,, |
| ३३ | ,, भीमराव शेषपा पोतदार | ,, |
| ३४ | ,, गिरेपा मल्लेशपा तुळशीगेरी | ,, |
| ३५ | ,, कृष्णाजी हणमंत सवदी | ,, |
| ३६ | ,, रामचंद्र पांडुरंग कुलकर्णी | ,, |
| ३७ | ,, मारुती गणू जाधव | ,, |
| ३८ | ,, शिवापा गुरलिंगपा सावळगी | ,, |
| ३९ | ,, तिलोकचंद केसरचंद लाहोटी | ,, |
| ४० | ,, आडवय्या दुंडय्या मुधोळ | ,, |
| ४१ | ,, रामचंद्र त्रिंबक जोशी | ,, |
| ४२ | ,, शिवपुत्रपा शिवलिंगपा इंगळगी | ,, |
| ४३ | सौ. कमलाबाई विष्णू हुल्याळ | ,, |
| ४४ | रा. शिवलिंगपा मल्लपा चिक्कोण | ,, |
| ४५ | ,, अलाबक्ष लालसाहेब गोठे | ,, |
| ४६ | ,, ए. आर. दोडमनी | ,, |
| ४७ | रा. महमद सा. हुसेन सा. आवटी | ,, |
| ४८ | ,, रामचंद्र गोविंद कुलकर्णी | ,, |
| ४९ | ,, शेषगीर धोंडो हुल्याळ | ,, |
| ५० | ,, ईश्वर कृष्ण कुंठे | ,, |
| ५१ | ,, पंचाक्षरय्या संगनबसय्या मुत्तिमकंती | ,, |
| ५२ | ,, बसय्या गुरलिंगय्या गणाचारी | ,, |
| ५३ | ,, गुरुमूर्ति विरकया गेणूरमठ | ,, |
| ५४ | ,, वामन गोविंद आळबाळ | ,, |
| ५५ | ,, सिदगीरपा गुरपादपा अथणी | ,, |
| ५६ | ,, एस. एन. कुलकर्णी, बी. ए. | ,, |
| ५७ | ,, विष्णू दामोदर हुल्याळ, सेक्रेटरी हरिजन सेवक संघ, जमखंडी | ,, |
| ५८ | सौ. उमाबाई यशवंत लेले | कुंदगोळ |
| *५९ | रा. यशवंत गणेश लेले | ,, |

| शेज नंबर | इसमाचें नांव | राहण्याचें ठिकाण |
|---|---|---|
| *६० | रा. दत्तात्रय सदाशिव काळे | कुंदगोळ |
| *६१ | ,, व्ही. बी. कुलकर्णी | ,, |
| ६२ | ,, जी. एस. केळकर | ,, |
| *६३ | ,, पांडुरंग विष्णु कोल्हटकर | ,, |
| *६४ | ,, एस्. आर. करंदीकर | ,, |
| *६५ | ,, श्रीनिवास हणमंत पाटील | ,, |
| *६६ | ,, बी. जी. होर्ती | ,, |
| *६७ | ,, शिवाजी गंगाधर कुलकर्णी | ,, |
| ६८ | ,, त्रिमल शेषो पाटील | ,, |
| *६९ | ,, रामचंद्र नागेश देसाई | ,, |
| ७० | ,, हणमंत तिमाजी कुलकर्णी | ,, |
| ७१ | ,, एस्. एन्. पाटील | ,, |
| *७२ | ,, एन्. जी. बाळणवर | ,, |
| ७३ | ,, आर. जी. हुद्दार | ,, |
| ७४ | श्रीमती काशीबाई साळुंके | ,, |
| ७५ | रा. पांडुरंग दत्तात्रय आपटे | ,, |
| ७६ | ,, गणेश विष्णू साठे | ,, |
| ७७ | ,, गुरुनाथ शिवाजी हावनूर | ,, |
| ७८ | ,, बसनगौडा लिंगनगौडा पाटील वगैरे कमडोळी प्रजेतर्फे | कमडोळी |
| *७९ | ,, व्यंकणगौडा फकीरगौडा पाटील वगैरे सांवशी प्रजेतर्फे | सांवशी |
| *८० | ,, करीगौडा गुरनगौडा पाटील वगैरे शिरूर प्रजेतर्फे | शिरूर |
| ८१ | ,, पंचापा बसलिंगपा कोरी | सांवशी |
| ८२ | ,, संगपा बसपा पल्लेद वगैरे कमडोळी प्रजेतर्फे | कमडोळी |
| ८३ | ,, चनवीरगौडा कैंचनगौडा पाटील सांवशी जाहीर सभेतर्फे | सांवशी |
| ८४ | ,, बसनगौडा संगनगौडा पाटील | कमडोळी |
| ८५ | ,, यल्लपा चनबसपा दोटी वगैरे होसळी प्रजेतर्फे | होसळी |
| ८६ | ,, गुरुनाथ रामचंद्र जोशी | यलिवाळ |
| ८७ | ,, ईरभद्रपा रुद्रपा | ,, |
| *८८ | ,, राजीउद्दीन हाटेलसा० गुडवाला कुंदगोळ मुसलमान समाजातर्फे | हुबळी |
| *८९ | रा. गोविंद गणेश केळकर | कुंदगोळ |
| *९० | श्री. अंदानेश दोडमेट्टी | ,, |
| *९१ | रा. पी. आर. चिक्कोडी | बन्हट्टी |
| ९२ | ,, चिन्नपा काडपा धबाडी | ,, |
| *९३ | ,, व्ही. ए. मंडी | ,, |
| ९४ | ,, चनमल्लपा चनवीरपा अबकार | ,, |
| *९५ | ,, रुद्रपा सिद्दपा पावटे | ,, |
| ९६ | ,, अबदुल करीम घुडूसा. जैनापूर | ,, |
| ९७ | ,, रामचंद्र लक्ष्मण डागा | ,, |
| ९८ | ,, चनबसय्या काडय्या मंटूर | ,, |
| ९९ | ,, तुकाराम रत्नपा कोरपडे | ,, |
| १०० | ,, प. सी. कांबळे | बन्हट्टी |
| १०१ | ,, देवेंद्रपा गिरमल्लपा बद्रणवर | ,, |
| १०२ | ,, शंकरपा सिद्रामपा भूती | ,, |
| १०३ | ,, सिद्रामपा गिरमल्लपा चरकी | ,, |
| १०४ | ,, काडपा सिद्दपा पावटे | ,, |
| १०५ | ,, मलकपा चनमल्लपा आभटी | ,, |
| १०६ | ,, दुंडया शिवलिंगया सालीमठ | ,, |
| १०७ | ,, रुद्रपा काडपा न्यामगौडा | ,, |
| १०८ | ,, परपा शिवरुद्रपा चिमड | ,, |
| १०९ | ,, विरपाक्षपा शिवपा मालापूर | ,, |
| ११० | ,, परापा काडापा मालापूर | ,, |
| १११ | ,, वीरपा शिवपा पट्टण | ,, |
| ११२ | ,, शांतवीरय्या हिरेमठ | ,, |
| ११३ | ,, काडपा सिद्रामपा भूती | ,, |
| ११४ | ,, महालिंगपा काडपा हनगंडी | ,, |
| ११५ | ,, शिवलिंगपा बसलिंगपा गिडदापगोळ | ,, |
| ११६ | ,, मेलपा शंकरपा गुणकी | ,, |
| ११७ | ,, मलकपा परामा जवळगी | ,, |
| ११८ | ,, सिद्दपा चनबसपा हनगंडी | ,, |
| ११९ | ,, बसपा बसलिंगपा धबाडी | ,, |
| १२० | ,, भीमपा तिमपा भद्रणवर | ,, |
| १२१ | ,, आल्लपा विरुपाक्षपा मंडी | ,, |
| १२२ | ,, काडपा चनवीरपा भद्रणवर | ,, |
| १२३ | ,, परपा रुद्रपा मंडी | ,, |
| १२४ | ,, झुंबरलाल लाधूराम भट्टड | ,, |
| १२५ | ,, गंगपा तुकाराम कोपरडे | ,, |

| शेज नंबर | इसमाचें नांव | राहण्याचें ठिकाण |
|---|---|---|
| १२६ | रा. सिद्दो व्यंकाजी देशपांडे | बनहट्टी |
| *१२७ | ,, बी. डी. जत्ती | सावळगी |
| १२८ | ,, बी. आर. जोशी | ,, |
| १२९ | ,, बी. टी. माळी | ,, |
| १३० | ,, निवृत्ती मारुती बागडे | वाठार |
| १३१ | ,, एस्. एन्. पाटील | तेरदाळ |
| १३२ | ,, डी. डी. चिक्कोडीकर | मुधोळ |
| १३३ | ,, पांडपा रामपा गिरड्डी वगैरे तुंगळ प्रजेतर्फे | तुंगळ |
| १३४ | ,, गिरमल्लपा चनपा यल्लटी | ,, |
| १३५ | ,, बसपा आणपा खेचाणी | शिरगुपी |
| १३६ | ,, कृष्णाजी नरसिंह मोकाशी वगैरे हुन्नूर प्रजेतर्फे | हुन्नूर |
| १३७ | ,, करीधुळापा पावडय्पा यल्लटी | ,, |
| १३८ | ,, मलकाजपा ईश्वरापा ककमरी | ,, |
| १३९ | ,, शिवपा गुरपादपा कातेवाडी | ,, |
| १४० | रा. नारायण त्रिमल देशपांडे, | हुन्नूर |
| १४१ | ,, संगपा तातपा केंगलगुत्ती, | लिंगनूर |
| १४२ | ,, बसपा रामपा नंदगांवी, | कल्हळी |
| १४३ | ,, आणपा वेंकपा मुगळखोड | ,, |
| १४४ | ,, पारिसनाथ देवेंद्र उपाध्ये | आलगूर |
| १४५ | ,, रामपा बसपा आळीभट्टी | सिद्धापूर |
| १४६ | ,, व्हत्यांपा वीरपा हुणचीकट्टी | हुन्नूर |
| १४७ | ,, बसपा चन्नपा जवळगी | ,, |
| १४८ | ,, दुंडपा ईरपा कत्ती | आळगूर |
| १४९ | ,, रामगौडा बसगौडा पाटील | मैगूर |
| १५० | ,, महिपत आणाजी जालवादी | आलगूर |
| १५१ | ,, राचपा रामपा हिरेसोमणवर, | हुणचीकट्टी |
| १५२ | ,, भीमाजी व्यंकटेश कुलकर्णी, | कल्हळी |
| १५३ | ,, बसपा परपा जकाती, | कंकणवाडी |
| १५४ | रा. प्रल्हाद गोविंद लोकापूर, | कंकणवाडी |
| १५५ | ,, विरुपाक्षपा शिवापा बुरडी, | होसूर |
| १५६ | ,, चित्रपा मल्लपा बुजरूक, | ,, |
| १५७ | ,, आडव्यापा संगपा काळीविनवर | हुणचीकट्टी |
| १५८ | ,, गुरपादपा सिद्धापा कोणूर, | हुल्याळ |
| १५९ | ,, महारुद्रपा गुरपा छुंझापनवर | ,, |
| १६० | ,, भीमाजी नरसिंह कुलकर्णी | जमगी |
| १६१ | ,, गोविंदापा सराफ | कुंचनूर |
| १६२ | ,, रायपा पांडपा न्यामगौडा | ,, |
| १६३ | ,, पावाडय्या गुरपादय्या यबंकी | कडपट्टी |
| १६४ | ,, चनगौडा गदिगेपा पाटील | टकळगी |
| १६५ | ,, रामचंद्र सखाराम देशपांडे | मैगूर |
| १६६ | ,, हणमंतपा भीमपा सावकार | बिद्री |
| १६७ | ,, दुंडपा मलपा कत्ती | ,, |
| १६८ | ,, रामलिंगपा सत्यपा गुरव वगैरे मदरखंडी प्रजेतर्फे | मदरखंडी |
| १६९ | ,, मल्लपा रामपा चि. पाटील वगैरे कुचनूर प्रजेतर्फे | कुंचनूर |
| १७० | ,, दुंडपा सिद्रामपा नागनूर | सिद्धापूर |
| १७१ | ,, मल्लापा दुंडपा भूमार | ,, |
| १७२ | ,, बसपा गुरपा मलकपनवर | ,, |
| १७३ | ,, बसपा भीमपा धारणी | कडपट्टी |
| १७४ | ,, विठलचंद नरसिंगचंद गुजर | मदरखंडी |
| १७५ | ,, श्रीपाद रामचंद्र लिमये | टक्कळगी |
| १७६ | ,, बसपा भुजंगपा संती | हंचिनाळ |
| १७७ | ,, शिवलिंगपा सिद्रामया सावळगी | हुन्नूर |
| १७८ | ,, तवनापा शांतपा डोर्ले | ,, |
| १७९ | ,, जयगौडा बसगौडा न्यामगौडा | कटकोळ |
| १८० | ,, भुजंग अंबाजी नाईक वगैरे अलगूर प्रजेतर्फे | आलगूर |
| १८१ | ,, तुकाराम गोविंद हवालदार | जमगी |

Sd/- भा. ब. महाबळ,
चेअरमन

Sd/- बा. ह. खर्डेकर
Sd/- गो. वि. टिकेकर
Sd/- अ. बा. साबडे

Sd/- अ. व्यं. धारेश्वर
Sd/- गो. द. आपटे
Sd/- कें. रं. नाडगीर

Sd/- पं. ब. कोरी

# रावसा. खर्डेकर यांची भिन्नमतपत्रिका

## समितीच्या सभासदांपैकीं रावसाहेब बाळासाहेब खर्डेकर यांची भिन्नमतपत्रिका

समितीच्या सभासदांपैकीं चेअरमन रावसाहेब मडाबळ, रावसाहेब धारेश्वर व रावसाहेब टिकेकर यांनीं ज्या शिफारशी केल्या आहेत त्यांपैकीं खालीं नमूद केलेल्या बाबींबद्दलचें माझें म्हणणें येणेंप्रमाणें आहे:—

(१) कायदेमंडळांतील सभासदांची संख्या ३६ असून त्यांपैकीं लोकनियुक्त २४ असावेत व सरकारी अधिकारी व सरकारनियुक्त मिळून १२ असावेत असें मत रिपोर्टांत नमूद केलें आहे. हा अभिप्राय मला मान्य नाहीं. माझे मतें ३६ सभासदांपैकीं २६ सभासद लोकनियुक्त असून सरकारी अधिकारी व सरकारनियुक्त मिळून १० सभासद असावेत. मंडळाची संख्या हल्लीं ३० आहे तीच कायम ठेवणेंत आली तर लोकनियुक्त सभासदांची संख्या २२ ठेवावी व सरकारी अधिकारी व सरकारनियुक्त मिळून ८ सभासद असावेत. द्विदल राज्यपद्धतीचा उपक्रम यशस्वी होणेचे दृष्टीनें ही सूचना मीं केली आहे. लोकनियुक्त मंत्र्याला मंडळाचा पाठिंबा अगदीं निश्चितपणें आणि भरपूर प्रमाणांत मिळण्याची तजवीज झाली पाहिजे. त्याशिवाय त्याला आपल्या कामाबद्दल विश्वास उत्पन्न होणार नाहीं, म्हणून वर लिहिलेलें प्रमाण मीं सुचविलें आहे.

(२) सोंपिव खात्यांच्या यादींत पब्लिक वर्क्स खात्याचा समावेश केलेला आहे. परंतु तें खातें पूर्णांशानें सोंपीव केलें जावें अशी शिफारस केलेली नाहीं. माझे मतें हें खातें पूर्णपणें सोंपीव केलें पाहिजे. त्यांत पुन्हा राखीव भाग ठेवल्यास पैशाची वांटणी करण्याचे वेळीं अडचण येणार आणि खात्याचा कारभार चांगल्या प्रकारें होण्यास प्रतिकूलता उत्पन्न होणार. ही अडचण नाहींशी व्हावी म्हणून, हें खातें पूर्णपणें लोकांच्या मंत्र्याचे अधिकाराखालीं दिलें जावें असा माझा अभिप्राय आहे.

या दोन बाबींबद्दल माझा अभिप्राय येणेंप्रमाणें आहे. बाकीचा रिपोर्ट मला मान्य आहे.

Sd/- बाळासाहेब हणमंतराव खर्डेकर

४९

# रा. नाडगीर यांची भिन्न मतपत्रिका.

रावसाहेब चेअरमन, जमखंडी संस्थान घटना सुधारणा कमिटी, संस्थान जमखंडी यांसी.

केंचनगौडा रंगनगौडा नाडगीर, सभासद ज. सं. घटना-सुधारणा-कमिटी, याजकडून.

श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी, यांचे चरणीं सादर करणेकरितां मीं माझा स्वतंत्र रिपोर्ट यासोबत पाठविला आहे. तो आपण आपल्या रिपोर्टासोबत श्रीमंत राजासाहेब सरकार हुजुरांचे चरणीं सादर करणेविषयीं विनंति आहे.

मे. कळावें. ता. १० माहे जुलै सन १९४० इ.

Sd/- केंचनगौडा रंगनगौडा नाडगीर.

श्रीमंत राजेसाहेब सरकार जमखंडी हुजुरांचे चरणसेवेशीं.

केंचनगौडा-रंगनगौडा-नाडगीर, सभासद जमखंडी संस्थान–घटना–सुधारणा–कमिटी, राहणार कुंदगोळ, यांजकडून रिपोर्ट ऐसाजेः—

श्रीमंत राजासाहेब सरकार यांनीं हुजूर द. हु नं. [illegible] ता. २४-२-३९ इ. अन्वयें हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत व कायदेमंडळाच्या घटनेंत काय सुधारणा होणें जरूर आहे, याविषयीं विचारविनिमय करून रिपोर्ट करणेबद्दल नेमलेल्या घटना–सुधारणा–समितींत सभासद म्हणून माझी नेमणूक करणेंत आली आहे.

त्याप्रमाणें सदर समितीपुढें आलेल्या साक्षीपुराव्याविषयीं सर्व सभासदांनीं मिळून विचारविनिमय केला. समितींतील सर्व सभासदांची एकवाक्यता झाली नाहीं. आमच्यांत एकमत झालें असतें तर बरें झालें असतें. इतर सभासदांचे मतांविषयीं मला पूर्ण आदर आहे, परंतु कांहीं बाबतींत माझा त्यांच्याशीं मतभेद झाल्यानें मीं माझे विचार स्वतंत्रपणें हुजूरचरणीं सादर केले आहेत.

संस्थानचे राज्यकारभारांत अंशभागी होणेच्या दृष्टीनें श्रीमंत राजासाहेब सरकार यांनीं आपल्या आधिपत्याखालीं प्रजेला संपूर्ण स्वायत्तता देणेचें आश्वासन यापूर्वींच दिलें आहे व त्या बाबतींत पहिला हप्ता म्हणून प्रचलित राज्यव्यवस्थेंत काय सुधारणा कराव्यात याविषयीं विचारविनिमय करून रिपोर्ट करणेबद्दल समिति नेमिली आहे. या दृष्टीनें विचार करतां प्रजेनें क्रमाक्रमानें श्रीमंत राजासाहेब सरकार यांचेकडून अधिकार मिळवून व ते यशस्वी रीतीनें चालवून पुन्हा पुढील हप्ता मिळविणेची खटपट करणें योग्य होईल. एकदम सर्व अधिकार राबविणें थोडें धाडसाचें काम होईल व तशी पूर्ण जबाबदारी एकदम प्रजेवर टाकणेस श्रीमंत राजासाहेब सरकार यांना संकोच वाटणें स्वाभाविक व न्याय्य आहे.

अधिकार राबविणेसारखी महत्त्वाची जबाबदारी प्रजेनें पूर्णांशानें अंगावर न घेतां आधीं थोडें व नंतर थोडें अशा क्रमानें घेतल्यास, श्रीमंत राजासाहेबांनाही आपली प्रजा राज्य-

स...७

कारभाराचे कामीं कोणत्या प्रकारें मदत करते हें पाहून पुढील अधिकार देणेस व प्रजेलाही तो मागणेस आत्मविश्वास वाटेल. आज ६–७ वर्षांपासून संस्थानांत कायदेमंडळ अस्तित्वांत असलें तरी मंडळास राज्यकारभाराचे बाबतींत केवळ शिफारस करणेचेच अधिकार होते.

आतां प्रजेस कोणत्या प्रमाणांत व किती अधिकार द्यावेत हा प्रश्न आहे. अशा वेळीं संस्थानची प्रजा जरी सुशिक्षित व पात्र असली तरी संस्थानचा राज्यकारभार चालविणेसारखी महत्त्वाची जबाबदारी एकदम पूर्णांशानें अंगावर घेणेपेक्षां आधीं त्यांनीं कांहीं खातीं आपल्या हातीं घेऊन तींत प्रगति करून दाखविल्यास संपूर्ण जबाबदारी हातीं घेणेस व राबविणेस त्यांना आत्मविश्वास वाटेल व श्रीमंत राजासाहेब सरकार यांनाही आपल्या प्रजेच्या पात्रतेविषयीं खात्री वाटून, मग प्रजेवर संपूर्ण जबाबदारी टाकणेस श्रीमंत राजासाहेब सरकार आनंदानें तयार होतील, यांत शंका घेणेचें कांहीं कारण नाहीं. कारण श्रीमंत राजासाहेब सरकार आजपर्यंत वेळोवेळीं प्रजेच्या आकांक्षांकडे लक्ष देतच आले आहेत व कायदेमंडळाचे शिफारसीस वेळोवेळीं जास्त प्रमाणांत मान्यता देत आले आहेत, हें सर्वांना विदित आहेच. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां प्रजेला अधिकारदान करणेच्या बाबतींत श्रीमंत राजासाहेब सरकार यांच्या सद्धेतूबद्दल शंका घेणें मुळींच योग्य होणार नाहीं.

आतां या दृष्टीनें तूर्त पहिला हप्ता म्हणून, राज्यकारभारांत कांहीं सोंपीव व कांहीं राखीव असे दोन भाग करावे लागतील. म्हणजे द्विदल राज्यपद्धति अंमलांत आणावी लागेल. ब्रिटिश इंडियांत द्विदल राज्यपद्धति अयशस्वी झाली असल्यानें, तशा प्रकारची योजना संस्थानांत अमलांत आणणें इष्ट होणार नाहीं असें आमच्यापैकीं कांहीं सभासदबंधूंचें मत आहे. परंतु ब्रिटिश हिंदुस्थानांत ही राज्यपद्धति अयशस्वी झाली म्हणून संस्थानांतील परिस्थिति लक्षांत घेतां ती येथेंही अयशस्वी होईल असें वाटत नाहीं. द्विदल राज्यपद्धति तेथें अयशस्वी होणेस त्यांत कोणते दोष होते याविषयीं सूक्ष्म विचार करून ते दूर करण्याची व त्यांत इष्ट त्या सुधारणा करणेची खटपट करून व ती कांहीं दिवस राबवून प्रत्यक्ष अनुभव घेऊन नंतर पूर्ण जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करणें योग्य होईल.

आतां द्विदल राज्यपद्धति ब्रिटिश हिंदुस्थानांत अयशस्वी होणेस मुख्य दोन दोष आमच्यापैकीं कांहीं सभासदांनीं दाखविले आहेत. ते म्हणजे ( i ) सोंपीव खात्याचा राज्यकारभार प्रगतिपर चालविणेस पुरेसा पैसा मंत्र्यास मिळत नाहीं. ( ii ) सोंपीव खात्याचा मंत्री व राखीव खात्याचे अधिकारी यांचेमध्यें राज्यकारभाराचे बाबतींत सहकार्य होत नाहीं, हे होत. जरी ब्रिटिश हिंदुस्थानांत ही राज्यपद्धति वरील कारणांस्तव अयशस्वी ठरली असली तरी संस्थानांतील सर्व खात्यांची अंतिम सत्ता संस्थानाधिपतींच्याकडे संपूर्ण असल्यानें, त्यांना हे दोष सहज दूर करतां येणें शक्य आहे. वरील दोष दूर करणेच्या बाबतींत श्रीमंत राजासाहेब सरकार व त्यांचे अधिकारी व प्रजाजन यांनीं सहकार्यानें खटपट केल्यास, द्विदल राज्यपद्धति आपले संस्थानांत खात्रीनें यशस्वी होईल असें मला वाटतें.

या दृष्टीनें विचार करतां संस्थानमजकुरीं द्विदल राज्यपद्धतीचा उपक्रम सुरू करणेचे बाबतींत प्रचलित राज्यव्यवस्थेंत व कायदेमंडळाच्या घटनेंत ज्या कांहीं सुधारणा माझ्या

मतें योग्य वाटल्या त्या मीं सुचविल्या आहेत. त्यांचा हुजूर पसंतीप्रमाणें विचार होणेविषयीं चरणीं विनंति आहे.

ता. १० जुलै १९४० इ.

जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळाचे घटनेंत व कामकाजाचे नियमांत खालील-प्रमाणें सुधारणा करणेंत यावी.

संस्थानमजकुरीं एकच कायदेमंडळ असावें व त्यांतील सभासदांची संख्या बत्तीस ३२ असावी. त्यांपैकीं लोकनियुक्त सभासदांची संख्या चोवीस २४ व सरकारनियुक्त सभासदांची संख्या आठ ८ असावी.

लोकनियुक्त सभासदांच्या मतदारसंघांची वांटणी खालीलप्रमाणें असावी.

| अ. नं. | मतदारसंघांचें नांव | म. सं. वर्ग | सभासदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | जमखंडी | नागर | ३ |
| २ | कुंदगोळ | ” | २ |
| ३ | सांवशी | ” | १ |
| ४ | कमढोळी | ” | १ |
| ५ | हुन्नूर—रामतीर्थ | ” | १ |
| ६ | बनहट्टी | ” | १ |
| ७ | जमखंडी सर्कल | ग्रामिक | ४ |
| ८ | कुंदगोळ तालुका | ” | ३ |
| ९ | सावळगी सर्कल | ” | १ |
| १० | वाठार व पाटखळ | ” | १ |
| ११ | शैक्षणिक | विशेष | २ |
| १२ | तैनातदार व वतनदार | ” | १ |
| १३ | व्यापारी | ” | १ |
| १४ | विणकर | ” | १ |
| १५ | मुसलमान | राखीव जागा | १ |
| | | | एकूण २४ |

संस्थानचे राज्यकारभारांत प्रजेला अधिक अंशभागी करणेच्या दृष्टीनें पहिला हप्ता म्हणून प्रचलित राज्यव्यवस्थेंत खालीलप्रमाणें सुधारणा करणेंत यावी.

जमखंडी संस्थान प्रातिनिधिक कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासदांपैकीं एका सभासदास मंत्री म्हणून, श्रीमंत राजासाहेब सरकार यांनीं नेमावें. व त्याजकडे (१) शिक्षण,

( २ ) आरोग्य, ( ३ ) पब्लिक वर्क्स, ( ४ ) स्थानिक स्वराज्य, ( ५ ) इन्कमटॅक्स, ( ६ ) स्टँप व रजिस्ट्रेशन हीं खातीं सोंपविणेंत यावींत. त्या खात्यासंबंधीं सर्व कारभार सदर मंत्र्यामार्फत चालविणेंत यावा.

मंत्री कायदेमंडळास व तत्त्वतः श्रीमंत राजासाहेब यांस जबाबदार असावा. कायदेमंडळाच्या विश्वासास जोंपर्यंत तो पात्र आहे तोंपर्यंत तो अधिकारारूढ असावा. त्याचे विरुद्ध अविश्वासाचा ठराव तीनचतुर्थांश मतानें मंजूर झाल्यास त्यानें आपल्या जागेचा ताबडतोब राजीनामा द्यावा.

सोंपीव खात्यांत सुधारणा करणेस जादा रक्कम लागल्यास, सदर खात्यासंबंधीं एखादा न्याय्य कर बसविणें इष्ट व जरूर वाटल्यास, त्यानें त्यासंबंधींचें बिल कायदेमंडळापुढें मांडून तो मंजूर करून घ्यावा. कायदेमंडळाचे संमतीशिवाय कर बसविणेचा त्यास अधिकार नसावा.

सदर मंत्र्यानें, जरूर वाटल्यास, कायदेमंडळाच्या लोकनियुक्त सभासदांमधून एकास आपला सेक्रेटरी पसंत करावा व त्याची नेमणूक श्रीमंत राजासाहेब सरकार यांनीं करावी.

मंत्र्याचा पगार दरमहा कमाल दीडशें रुपये पर्यंत असावा व त्याच्या सेक्रेटरीचा पगार दरमहा कमाल साठ रुपयें पर्यंत असावा.

मंत्र्याकडे सोंपविलेल्या खात्यांसंबंधीं देखरेख व अनिवार्य प्रसंगीं नियमन करणेची अंतिम सत्ता श्रीमंत राजासाहेब सरकार यांचेकडेच असावी.

संस्थानांतील राज्यकारभार अधिक प्रगतीपर होणेस मदत करणेच्या दृष्टीनें व विशेषतः सोंपीव खात्याचा कारभार यशस्वी रीतीनें चालणेस, जास्त पैशाची जरूरी असल्यानें, श्रीमंत राजासाहेब सरकार, यांनीं आपल्या खासगी खर्चांत शक्य तितकी काटकसर करून जास्तींत जास्त रक्कम सोंपीव खात्याच्या कारभाराकडे द्यावी.

संस्थान मजकुरीं न्यायखातें व अंमलबजावणी खातें यांची शक्य तों फारकत करणेचें धोरण ठेवणेंत यावें.

संस्थानमजकुरीं शेतकऱ्यांना आर्थिक मदत होणेकरितां व व्यापारउद्योगधंद्याची वाढ होणेकरितां लँड मॉर्टगेज बँक, मध्यवर्ती बँक व सहकारी पतपेढ्या यांसारख्या संस्थांची स्थापना करणेंत यावी.

श्रीमंत राजासाहेब सरकार यांना शांतता, सुव्यवस्था अल्पसंख्यांक वगैरेंचें संरक्षण या बाबतींत विशेष अधिकार असावेत.

येणेंप्रमाणें प्रचलित राज्यव्यवस्थेंत सुधारणा करणेविषयींचे माझे विचार हुजूर चरणीं सादर केले आहेत.

# मतदार व उमेद्वार

कायदेमंडळाचे मतदार व उमेद्वार यांच्या लायखीविषयीं हल्लीं असलेल्या नियमांत खालीलप्रमाणें सुधारणा करणेंत याव्यात.

सर्व साक्षर पुरुषांना व स्त्रियांना मताधिकार असावा, मात्र मतदार आपल्या वयाचीं अठरा १८ वर्षें पूर्ण झालेला असावा.

नागर:—नागर मतदारसंघाचे स्थलसीमेंत मालक नात्यानें दरसाल दोन २ रुपयेहून कमी नाहीं इतके म्युनिसिपल टॅक्स देणारा अगर वार्षिक ६ रुपये भाडें देणारा भाडेकरी अशांना मताधिकार असावा.

ग्रामिक:—जमखंडी तालुका व ठाणें वाठार व पाटखळ दरसाल पंधरा १५ रुपयांहून कमी नाहीं इतका तरम आकार असलेला व कुंद्गोळ तालुक्यांत पंचेवीस २५ रुपयेहून कमी नाहीं इतका तरम आकार असलेल्या जमिनीचा खातेदार अगर निवडणुकीच्या तारखेपूर्वी सतत दोन वर्षें दरसाल कमींत कमी दोन हजार २००० रुपये लागण खंड देणारा जमिनीचा लागणदार यांना मताधिकार असावा.

तैनातदार वतनदार:—सदर संघाचा मतदार संस्थानांतील तैनातदार अगर संस्थान-मजकुरीं कमींत कमी पंचवीस २५ रुपये जुडी देणारा वतनदार असावा.

शैक्षणिक:—शैक्षणिक मतदाराची लायखी पूर्वीचे नियमाप्रमाणेंच असावी. सदर संघाच्या दोन जागेपैकीं जमखंडी तालुक्यातर्फें एक व कुंदगोळ तालुक्यातर्फें एक असावी.

व्यापारी:—व्यापारापासून दरसाल दोनशें रुपये अगर त्याहून जास्त उत्पन्न येणारा प्रत्येक व्यापारी, कंत्राटदार व कारखानदार यांना मताधिकार असावा.

विणकर:—मुख्यत्वेंकरून विणणेच्या धंद्यावर उपजीविका चालणाऱ्या इसमास मताधिकार असावा.

मुसलमान:—मुसलमानांचेकरितां स्वतंत्र मतदारसंघाची जरूरी नाहीं. सदर संघाचा उमेद्वार संयुक्त मतदारसंघांतूनच निवडून यावा. त्यांचेकरितां एक राखीव जागा असावी. त्या जागेकरितां जो उमेद्वार निवडून येणेचा तो एकदां जमखंडी तालुक्यातर्फें व एकदां कुंद्गोळ तालुक्यातर्फें अशा क्रमानें ( Alternate ) निवडून यावा.

उमेद्वाराचें नांव मतदारांचे यादींत असावें व त्यानें आपल्या वयाचीं पंचेवीस २५ वर्षें पूर्ण केलेलीं असावींत.

त्याचें शिक्षण मराठी अगर कानडी चार इयत्तेपर्यंत झालेलें असावें अगर संस्थान-मजकुरीं मंजूर असलेली तत्सम दुसरी कोणतीही परीक्षा तो पास झालेला असावा.

कायदेमंडळाचा अध्यक्ष व उपाध्यक्ष हे मंडळांतील लोकनियुक्त सभासदांमधून निवडलेले असावेत व ते कायदेमंडळाच्या विश्वासास पात्र असेपर्यंत त्यांनीं अधिकारपदावर रहावें.

जर मंडळानें त्याविरुद्ध बहुमतानें अविश्वासाचा ठराव पास केल्यास त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा द्यावा.

कायदेमंडळाचें अधिवेशन कमींत कमी पांच दिवस चालावें. मात्र कामाच्या सोई-प्रमाणें ते दिवस कमी अगर जास्त करणेचा अधिकार अध्यक्षास असावा.

कायदेमंडळापुढें मांडावयाचें बजेट एकच असावें. परंतु ज्या त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनीं आपल्या खात्याविषयीं सविस्तर माहिती कायदेमंडळापुढें मांडावी.

मंडळापुढें माहितीकरितां मागील सालचे जमाखर्चाचे नक्की आंकडे ठेवण्यांत यावेत.

मंडळास राखीव खात्यासंबंधीं सूचना व चर्चा करणेचा व सोंपीव खात्यासंबंधीं चर्चा करणेस व मतें देणेस अधिकार असावा.

मात्रः—

खालील बाबी अगर त्यासंबंधीं असलेल्या व त्यावर परिणाम होईल अशा तऱ्हेची चर्चा करणेचा व मतांस टाकणेचा कायदेमंडळास अधिकार नसावा.

(१) श्रीमंत राजासाहेब सरकार यांचा खासगी तनखा, त्यांचे खासगी नोकर, राजघराण्यांतील इसमांचे हक्क अगर विशेष हक्क, राजकुटुंबांतील समारंभ व कारणपरत्वें होणारे राजकीय समारंभ, सरकारी देवस्थान वगैरे यांचा अंतर्भाव होत असलेली 'राजवाडा' ही संस्था.

(२) सार्वभौम सरकारास देत असलेली खंडणी.

(३) सार्वभौम सरकार, ब्रिटिश इंडियन सरकार अगर इतर संस्थानें व संस्थानिक यांचेशीं असलेले श्रीमंत राजासाहेब सरकार यांचे संबंध.

(४) सरकारी नोकरांचे पगार व पेन्शनें.

(५) पूर्वीचें कर्ज, त्यावरील व्याज व कर्ज उभारणेचे वेळीं हमी दिली असल्यास असे हमी दिलेले बुडते फंड व त्याबद्दलचे बोजे.

(६) सार्वभौम सरकार ब्रिटिश इंडियन सरकार व दुसरीं संस्थानें व संस्थानिक यांचेशीं केलेले व हल्लीं अमलांत असलेले श्रीमंत राजासाहेब सरकार यांचे तहनामे व करारमदार यांस नियमन होणाऱ्या बाबी.

(७) वतनें, इनामें, तैनाती व सरंजाम आणि यासंबंधीं हक्क व मिळकती.

कायदेमंडळांत सभासदांना प्रश्न व उपप्रश्न विचारणेविषयीं हल्लीं अस्तित्वांत असलेला संख्येचा निर्बंध दूर करणेंत यावा.

कायदेमंडळाच्या निवडणुकी दर तीन वर्षांनीं व्हाव्यात.

संस्थानचा राज्यकारभार सुव्यवस्थित चालणेच्या दृष्टीनें, जरूर ते कायदे करण्याचा अधिकार कायदेमंडळास असावा. परंतु श्रीमंत राजासाहेब सरकार यांना Veto चे सर्व-

अधिकार असून कायदेमंडळानें मंजूर केलेला कोणताहि कायदा अगर ठराव त्यांचे मंजुरी-नंतर अमलांत यावयाचा. सामान्यतः मंडळाच्या कामावर देखरेख, मार्गदर्शन व नियमन करणेची अंतिम सत्ता श्रीमंत राजासाहेब सरकार यांचेकडेच असावी.

श्रीमंत राजासाहेब सरकार यांचे आधिपत्याखालीं संपूर्ण जबाबदार राज्यपद्धतीचा अंमल संस्थानमजकुरीं सुरू करणेच्या बाबतींत पहिला हप्ता म्हणून मीं वर सुचविलेली राज्यपद्धति अमलांत आलेनंतर, प्रजेची पात्रता व अनुभव यांविषयीं विचार करून जास्तींत जास्त सहा वर्षांनीं पुढें संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति देणेच्या बाबतींत, श्रीमंत राजासाहेब सरकारांनीं विचार करावा.

## कानडी दप्तर.

संस्थानमजकुरीं बहुसंख्य लोकांची भाषा कानडी असल्यानें सरकारी दप्तरची भाषा कानडी असावी हें तत्त्व दरबारकडून मान्य करणेंत आलेंच आहे त्याअनुरोधानें खालीलप्रमाणें सुधारणा अमलांत आणणेची तजवीज करावी.

संस्थानमजकुरीं नोकरींत असलेल्या सर्व अंमलदारांना व त्यांचे हाताखालील नोकरांना कानडी उत्तम लिहितां-वाचतां आलें पाहिजे. या बाबतींत दरबारकडून प्रयत्न चालू आहेतच. तरी सर्व नोकरांना सत्वर कानडी शिकणेबद्दल सक्तीचे हुकूम देणेंत यावेत.

कोणत्याही खात्याकडे कानडी अर्ज आल्यास ते स्वीकारण्यांत यावेत व त्याचा निकालही कानडींत देणेंत यावा. तसेंच दस्त वगैरे नोंदणीचीं कामें कानडी दस्त आल्यास ते स्वीकारणेंत यावेत. कोणत्याही बाबतींत कानडीचें मराठी भाषांतर त्यांचेकडून मागणेंत येऊं नये.

कोर्ट-कचेरींत पक्षकार-साक्षीदारांचे जाबजबाब कानडींत झाल्यास त्यांचे भाषेंत ते लिहून घेणेंत यावेत. तसेंच दावे, दरखास्त कानडींत आल्यास दाखल करून घेण्यांत यावेत.

गांवकामगारांचें सर्व दप्तर संपूर्ण कानडींत ठेवणेंत यावें. मात्र ठाणें वाठार व पाट-खळ येथें पूर्वीप्रमाणेंच सर्व दप्तर मराठी असावें.

संस्थान मजकुरीं निघणारे वटहुकूम, जाहीरनामे वगैरे कानडी व मराठी दोन्ही भाषें-तून प्रसिद्ध करणेंत यावींत.

संस्थान मजकुरीं कानडी व मराठी दोन्ही भाषेचें सारख्या प्रमाणांत संरक्षण व संव-र्धन होणें इष्ट आहे. त्या अनुरोधानें कानडी अगर मराठी जाणणाऱ्या लोकांचा दरबारशीं संबंध आले वेळीं त्यांची कोणत्याही प्रकारें गैरसोय न होईल अशी व्यवस्था दरबारकडून शक्य तितक्या लवकर करणेंत यावी.

वर सुचविलेली कानडी दप्तरची योजना जास्तींत जास्त पांच वर्षांत अमलांत यावी.

याप्रमाणें राज्यकारभारांतील सुधारणा व कानडी दप्तर याविषयीं माझ्या सूचना हुजूरचरणीं सादर केल्या आहेत. तरी माझ्या वरील सूचनांचा व समितींतील इतर सन्मान्य सभासदांच्या सूचनांचाही श्रीमंत राजासाहेब सरकारनीं सहानुभूतीनें विचार करून व हल्लींचा बदलता काळ लक्षांत घेऊन श्रीमंत राजासाहेब सरकारनीं आपल्या प्रजेची आकांक्षा बहुतांशीं तृप्त करावी अशी माझी श्रीमंत राजासाहेब सरकार यांचे चरणीं नम्र विनंति आहे.

सेवेशीं श्रुत होय.

ता. १० माहे जुलै सन १९४० इसवी. (Sd). केंचनगौडा रंगनगौडा नाडगीर.

## रा. साबडे, रा. आपटे व रा. कोरी यांची भिन्नमतपत्रिका.

जमखंडी संस्थान घटनासमितीवरील सभासद श्री. अनंत वासुदेव साबडे, श्री. गोविंद दत्तात्रय आपटे व श्री. पंचप्पा बसलिंगप्पा कोरी यांची भिन्नमतपत्रिका खालीलप्रमाणें:—

### भिन्नमतपत्रिका

जमखंडी संस्थानांतील प्रजाजनांस राज्यकारभाराचे बाबतींत अधिक अंशभागी करण्यासाठीं कोणते उपाय योजावेत व विद्यमान कायदेमंडळाचे अधिकारांत व रचनेंत या दृष्टीनें काय फेरफार करावेत अशाबद्दल रिपोर्ट करण्याकरितां ही कमिटी नेमण्यांत आलेली आहे. याबद्दलची सर्व माहिती आमच्या इतर सभासदांनीं लिहिलेल्या रिपोर्टांत सविस्तरपणें दिलेली आहे, त्याची पुनरुक्ति करणेची जरूरी नाहीं. त्याचप्रमाणें राज्यकारभारांत कोणत्या सुधारणा होणें जरूर आहे याबद्दल व या दृष्टीनें विद्यमान कायद्यांत व नियमांत कोणते फेरफार करणेचे याजबद्दलही आमच्यापैकीं कांहीं सभासदांनीं आपला रिपोर्ट लिहिलेला आहे. सद्रहू कामीं आमच्या सर्वांच्या सूचनांमध्यें एकवाक्यता जाहली असती तर आम्हांस आनंद जाहला असता व कांहीं किरकोळ बाबतींत मतभेद असता तर एकवाक्यता होणेच्या दृष्टीनें, आम्हीं आमच्या मतास थोडीशी मुरड घातली असती. परंतु महत्त्वाच्या प्रश्नाबाबत मूलग्राही व तीव्र स्वरूपाचे मतभेद होत असल्याचें दिसून आल्यानें, आमच्या त्या प्रश्नाबाबतच्या सूचना स्वतंत्रपणें करणें भाग पडत आहे व तसें करतांना केवळ आमचीं मतें तशीं आहेत व तीं पूर्ण विचारांतीं प्रामाणिकपणें बनलीं असल्यानें आम्ही व्यक्त करीत आहोंत. या कामीं आमच्यापैकीं इतर सभासदांच्या भिन्न मताबद्दल आम्हांस कांहींही म्हणावयाचें नाहीं. तीं आम्हांस पटत नाहींत असें स्पष्टपणें म्हणणें भाग आहे.

आमच्यापैकीं इतर कांहीं सभासदांच्या रिपोर्टांतील सूचनांशीं आम्हांस ज्या ठिकाणीं भिन्न मत प्रदर्शित करणेचें आहे त्या ठिकाणीं महत्त्वाचा मुद्दा तेवढाच घेऊन त्याचा आम्हीं विचार केला आहे. नहून एखादें वाक्य अगर शब्दप्रयोग आम्हांस मान्य आहे अगर नाहीं याबद्दल विचार केलेला नाहीं. तसें करणें अप्रस्तुत व अनावश्यक आहे.

गेलीं सात वर्षें कायदेमंडळ अस्तित्वांत असून लोकनियुक्त सभासदांनीं एकंदरींत काम समाधानकारकपणें केलें आहे व त्यामुळें जास्त सुधारणा मिळविणेस ते पात्र झाले आहेत याबद्दल मतभेद नाहीं. ही समाधानाची गोष्ट आहे.

आतां सुधारणांची यापुढची पायरी कोणती असावयाची हा महत्त्वाचा प्रश्न विचाराकरितां आमचेसमोर आहे व सुधारणांचें अधिकारदान करितांना प्रजेच्या आकांक्षा लक्षांत घेणें आवश्यक आहे याबद्दलही मतभेद असण्याचें कारण नाहीं. एकंदरीनें प्रजेची पात्रता, जनतेची सामान्य तयारी, त्यांचा राज्यकारभाराचा अनुभव, प्रजेचें शिक्षण व साक्षरताप्रसार या गोष्टी लक्षांत घेऊन, आमच्यापैकीं कांहीं सभासदांनीं या पुढच्या सुधार-

णेचा हप्ता द्विदल राज्यपद्धतीच्या स्वरूपाचा असावा व पूर्ण जबाबदार राज्यपद्धति अमलांत आणणेस या संस्थानच्या प्रजेची पात्रता नाहीं असें सुचविलें आहे. या बाबतींत आम्ही त्यांचेशीं बिलकूल सहमत होऊं शकत नाहीं व ही त्यांची विचारसरणी आम्हांस मान्य होणेजोगी नाहीं.

राज्यकारभाराचे सर्व अधिकार या संस्थानांत हल्लीं श्रीमंत राजासाहेब यांचेकडे आहेत व पुढील सुधारणा दिल्यावरही अंतिम अधिकार त्यांचेकडेच राहणार या बाबतींत दुमत असण्याचें कारण नाहीं. परंतु ते अधिकार आमच्या साम्राज्य सरकारांतील इंग्लंडच्या राजाच्या अधिकाराप्रमाणें सनदशीर पद्धतीचे ( Constitutional ) असावयाचे आहेत. हें आद्य तत्त्व मान्य केल्यानंतर राज्यकारभार द्विदल पद्धतीचा असावा असें या कमिटीच्या कांहीं सभासदांचें म्हणणें आहे. परंतु द्विदल राज्यपद्धति अत्यंत सदोष आहे व तिच्या विरुद्ध सर्व लोकमत आहे. खालसा मुलखांत मॉंटफर्ड सुधारणा सन १९१९ सालीं अमलांत आल्यावर त्याविरुद्ध भयंकर ओरड झाली हें सर्व त्यांना मान्य आहेच.परंतु त्याच पद्धतीचा उपक्रम करण्यास ब्रिटिश हिंदुस्थानपेक्षां संस्थानचें क्षेत्र अधिक चांगलें असें त्यांना वाटतें. त्यांचा दृष्टिकोन समजून घेण्याचा आम्हीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तो आम्हांस कोणत्याही तऱ्हेनें पटत नाहीं याबद्दल आमचा नाइलाज आहे. खालसा मुलखांत ही पद्धत अमलांत आल्यानंतर, प्रागतिक पक्षाचे धुरीणांनीं या पद्धतीप्रमाणें राज्यकारभार करून प्रगति करणेच्या उद्देशानें व प्रामाणिकपणें प्रयत्न केला परंतु स्वाभिमानानें व यशस्वीपणें ती घटना राबविणें त्यांना शक्य झालें नाहीं. मि. सी. वाय. चिंतामणी सारख्या विद्वानांना लगेच मंत्रीपद सोडावें लागलें. व डॉ. परांजपे यांच्या सारख्यांनीं शेवटपर्यंत काम केलें तरी त्यांना शेवटीं निराशाच व्यक्त करावी लागली. ती योजना मूलतः सदोष आहे. तेव्हां ती एका ठिकाणीं अयशस्वी झाली तरी दुसऱ्या ठिकाणीं यशस्वी होईल अशी आशा करण्यास आमच्या मतें जागाच नाहीं. कांहा प्रांतांचे गव्हर्नरांनीं सुद्धां द्विदलराज्यपद्धतीबद्दल अनुभव घेऊन असे उद्गार काढिले आहेतः—

"The Dyarchy destroyed the unity of Government so essential to orderly, smooth and beneficient conduct of affairs and hence utterly unworkable."—

जे दोष खालसा मुलखांत या पद्धतींत दिसून आले ते मूलग्राही स्वरूपाचे असल्यानें, या संस्थानांतच काय पण कोठेंही टाळतां येणें शक्यच नाहीं. इतकेंच नव्हे तर या पद्धतींत लोकनियुक्त मंत्र्यास सुव्यवस्थितपणें काम करण्यास, या संस्थानांत जास्तच अडचणी येण्याची विशेष भीति आहे. याबद्दल जास्त विवेचन आम्ही पुढें करूं. तत्पूर्वीं मॉंटफर्ड सुधारणांना कायद्याचें स्वरूप प्राप्त होण्यापूर्वीं, त्या बिलाचा विचार करणेकरितां नेमलेल्या जॉईंट पार्लमेंटरी कमिटीच्या त्या बाबतीचा अभिप्राय आमच्यापैकीं कांहीं सभासदांनीं आपल्या रिपोर्टांत उद्धृत केला आहे. व या कामीं श्रीमंत राजासाहेब यांनीं केलेली घोषणाही त्या अभिप्रायास अन्वर्थक असल्यानें द्विदल राज्यपद्धति या संस्थानांत तितकी अयशस्वी होऊं नये असा अभिप्राय व्यक्त केला आहे. सदरहू उद्धृत केलेल्या उताऱ्यांतील मजकूर

सूक्ष्मपणें वाचल्यानंतर याबद्दल आम्हांस जे विचार आले ते मांडणें जरूर आहे. संदरचा अभिप्राय श्रीमंत राजासाहेबांच्या हल्लींच्या घोषणेस मुळींच अन्वर्थक नसून तो फार तर १९३२ च्या घटना कायद्याच्या वेळच्या घोषणेस अन्वर्थक म्हणतां येईल. कारण सन १९३२ च्या घटना कायद्याच्या प्रास्ताविकांत तसे शब्द आहेत. हल्लींच्या घोषणेंत नाहींत. उलट, पूर्वींच्या घटनेंत काय सुधारणा करावी हें निश्चित करणेसाठीं हल्लींची घोषणा आहे. शिवाय सदर पार्लमेंटरी कमिटीचा हा अभिप्राय द्विदल पद्धत अमलांत येणेपूर्वींचा असल्यानें त्यांत या पद्धतीच्या राबणुकीनंतरच्या अनुभवाचें दिग्दर्शन असणें शक्य नाहीं आणि म्हणून त्यास महत्त्व येऊं शकत नाहीं. या अभिप्रायाऐवजीं आम्हीं वर उद्धृत केलेल्या गव्हर्नरांच्या द्विदल राज्यपद्धतीच्या अनुभवानंतरच्या मताचा अभिप्राय मार्गदर्शक ठरतो. अनुभवांतीं सर्वानुमतें ही पद्धत त्याज्य ठरली आहे. तसेंच त्यावेळीं जबाबदार राज्यपद्धति ब्रिटिश पार्लमेंटच्या मनांतून हिंदुस्थानला देण्याची नव्हती व या धोरणास अनुसरून बादशहांची त्यावेळची घोषणा झाली असल्यानें त्या घोषणेस अनुसरून त्या कमिटीनें या पद्धतीचा पुरस्कार केला. अधिकारदान करणेस व सत्ता सोडणेस नाखुष असलेल्या परकीय सत्तेच्या बाबतींत हें धोरण ठीक आहे. परंतु आपल्या संस्थानची प्रगति करणेचा खरा व प्रामाणिक हेतु मनांत बाळगून, प्रजेला विश्वासांत घेऊन, लोकशाही तत्त्वानुसार सुधारणा देण्यास प्रवृत्त झालेल्या आमच्या राजेसाहेबांचे पुढें बाहेर अनेक दृष्टींनीं सर्वतोपरी कुचकामी ठरलेली जुनी योजना पुढील अधिकारदानाचे कामीं मांडणें आम्हांस योग्य वाटत नाहीं. सन १९१७ सालची बादशहांची घोषणा, तो काळ पूर्णपणें पालटून १९४० साल उजाडल्यानंतर, आज दृष्टीसमोर ठेवून सुधारणांचा विचार करणें, आणि त्यावेळीं एक अभिनव प्रयोग म्हणून तेथें अमलांत आलेली द्विदल राज्यपद्धति पुढें अनुभवानें तिच्यांतील मूलग्राही दोष स्पष्टपणें दिसून आल्यानंतरही येथें अमलांत आणणें योग्य आणि काळानुसार होणार नाहीं असें आमचें ठाम मत आहे.

द्विदलराज्यपद्धतीचा अर्थ आमच्या इतर सभासदांनीं थोडक्यांत देऊन त्याचे ठळक दोष त्यांनीं खालीलप्रमाणें मांडले आहेत.

१ राखीव खात्याकडे लागणारा पैसा प्रथम काढून घेतल्यानें सोंपीव खात्याकडील कारभारास पुरेसा पैसा लोकनियुक्त मंत्र्यास मिळत नाहीं.

२ संस्थानच्या दोन विभागांतील मुख्य अधिकाऱ्यांच्या मध्यें राज्यकारभार यशस्वी होण्यास लागणारा सहकारतत्वाचा अभाव या दोषांची बाधा या संस्थानांत द्विदल पद्धतीचा उपक्रम केल्यानें होणार नाहीं असें आमच्यापैकीं कांहीं सभासदांना वाटतें व त्याला कारण म्हणून त्यांनीं असें मांडलें आहे कीं, "संस्थानच्या राज्यकारभाराच्या यशस्वितेची अंतिम जबाबदारी श्रीमंत राजासाहेब यांचेवरच असल्यानें उत्पन्नाची वांटणी ते यथाप्रमाणच सर्व खात्यांकडे करतील. राखीव खात्याकडे प्रमाणापेक्षां कमी रक्कम अशी विभागणी केली जाईल असें मानण्यास यत्किंचितही जागा नाहीं. शिवाय मंडळाच्या परवानगीनें नवीन कराच्या

रूपानें पैसा उभारणेचा अधिकार लोकनियुक्त मंत्र्यास दिला तर तक्रारीस जागा राहणार नाहीं." या त्यांच्या मताबद्दल आमचें म्हणणें थोडक्यांत असें आहे. द्विदल पद्धतींत गव्हर्नरांना देखील सोंपीव खात्याकडे पैसा न देतां घटना अयशस्वी व्हावी असें थोडेंच वाटत होतें? तरीपण अनुभव मात्र ही पद्धत कुचकामी असाच आला. यामुळें व्यक्ति भिन्न झाली तरी या पद्धतींतच मूलग्राही दोष असल्यानें ती आमच्या मतें त्याज्य आहे. आमच्यापैकीं कांहीं सभासदांचें वरील म्हणणें ( दोष टाळतां येईल या बाबतचें ) दिसावयास ठीक आहे. परंतु ते म्हणतात त्याप्रमाणें क्वचितच घडून येतें. श्रीमंत राजासाहेब यांचेवर राज्यकारभाराची अंतिम जबाबदारी आतांहि आहेच व आपल्या विचाराप्रमाणें श्रीमंत राजासाहेब राज्यकारभार करीतच आहेत. परंतु त्यामुळें प्रजेचीं सर्व गाऱ्हाणीं दूर झालीं नाहींत. इतकेंच नव्हे, खासगी खात्यांत बेसुमार खर्च केला जातो. राष्ट्रसंवर्धक व लोकोपयोगी खात्याकडे पैसा मिळावा तसा मिळत नाहीं. पब्लिक वर्क्स खात्यांत लोकहिताच्या दृष्टीनें आवश्यक कामें होत नाहींत वगैरे तक्रारी आहेत. व त्या तक्रारींत आमच्या मतें पुष्कळ तथ्यांशही आहे. एकादा राजा स्वार्थत्यागी व उदार असल्यास शक्य ती काटकसर करून प्रजाप्रेम व प्रजाहित साधतो. परंतु व्यवहारांत असे दाखले क्वचितच मिळतात. असें म्हणण्यांत श्रीमंत राजासाहेबांचे विरुद्ध कांहीं दोषारोप करणेचा आमचा हेतु आहे, असा गैरसमज मात्र कोणीही करून घेऊं नये अशी आमची विनंति आहे. राजानें आपल्या मतानें लोकहित साधण्यापेक्षां, खरें लोकमत अजमावून, त्या मताप्रमाणें प्रजाहित साधणें, हें आजकाल राज्यकारभारांत श्रेष्ठ तत्त्व म्हणून गणलें गेलें आहे. व त्याच तत्त्वाप्रमाणें वागण्याबद्दल बहुतेक लहानमोठ्या संस्थानांचे प्रयत्न चालले आहेत. यालाच लोकशाही व जबाबदार राज्यपद्धति असें समजण्यास हरकत नाहीं. या लोकशाहीच्या संरक्षणार्थ आमचें साम्राज्य सरकार आपल्या राष्ट्राकडून आत्यंतिक त्यागाची अपेक्षा करून प्रबल राष्ट्राविरुद्ध लढत आहे. या तत्त्वाप्रमाणें वागून श्रीमंत राजासाहेब यांनीं योग्य रीतीनें राज्यकारभार केल्यास ठीकच आहे. परंतु हल्लीं व्यवहारांत तसें घडून येत नाहीं हेंही तितकेंच स्पष्ट आहे. राजाच्या दृष्टीनें प्रजाहित व प्रजेच्या दृष्टीनें प्रजाहित यांत पुष्कळ वेळां व्यवहारांत अंतर पडलेलें दिसून येतें. अशाप्रसंगीं राजाकडून प्रजेच्या मताप्रमाणें न जाहल्यास पुढें काय हा प्रश्न राहतो. व ह्या करितां असा प्रसंग उद्भवूं नये व उद्भवल्यास प्रजाहित साधण्याचे कामीं उपसर्ग होऊं नये म्हणून कांहींतरी योजना घटनेंत असणें जरूर आहे. फक्त राजेसाहेब यांचे सदिच्छेवर अवलंबून राहण्यानें भागणार नाहीं. सध्यां सुचविण्यांत आलेल्या द्विदल राज्यपद्धतींत, श्रीमंत राजासाहेब यांचेकडेच सर्व अधिकार देण्यांत आले आहेत. सोंपीव खात्याकडील अधिकार फार कमी व त्यांतच मंत्र्यावर पुष्कळच निर्बंध घालण्यांत आले आहेत. मंडळास अधिकार मर्यादित किंवा कांहींच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. अशी सर्व परिस्थिति असल्यामुळें प्रजाहिताच्या दृष्टीनें कार्य होण्यास ती पद्धति पंगू व कुचकामी ठरते.

आतां सोंपीव खात्यास रक्कम लागल्यास नवीन कर बसवून पैसा उभारणेस अधिकार देणेंत आला असल्यानें पैशाची अडचण दूर जाहली आहे अस म्हणणें आहे. तशी व्यवस्था खालसा

मुलखांत मॉंटफर्ड रिपोर्टनंतर सुधारणा अमलांत आल्यावेळीं नव्हती, सबब तेथेंच अडचण भासते असें आमच्यापैकीं कांहीं सभासदांचें म्हणणें आहे. तेथें Excise खात्याचें उत्पन्न त्या खात्याकडे तोडून देण्यांत आलें होतें. येथें तीही पण व्यवस्था नाहीं. शिवाय असा कर बसविणेचा अधिकार देऊन न देऊन सारखेंच आहे. सध्याच असलेले कर डोईजड जाहले असल्यानें ते कमी करण्यांत यावे अशी लोकांची एकसारखी मागणी आहे. व ती मागणी न्याय्य असल्यानें हल्लींचें सरकारही कांहीं कांहीं प्रमाणांत त्यांची मागणी मान्य करीत आहे. अशा परिस्थितींत कोणता नवीन कर बसवून उत्पन्न वाढवितां येईल हेंच आम्हांस समजत नाहीं. आणि कोणत्याही मंत्र्याला त्या दृष्टीनें प्रयत्न करणें तूर्त कांहीं काळ तरी अशक्यच आहे. द्विदल राज्यपद्धतीमधील दुसऱ्या बाबतींतील दोषहि तसाच कायम राहणार आहे. श्रीमंत राजेसाहेब यांना न्यूनाधिक्य भाव नसला तरी राखीव खात्यांची जबाबदारी त्यांचेवर असल्यानें व तीं खातीं मोठीं असल्यानें व कायद्यानेंही त्या खात्यांकडे लागणारी रक्कम अप्रत्यक्ष रीतीनें काढून घेण्याची तजवीज ठेविली असल्यानें, त्या खात्यांकडे श्रीमंत राजासाहेब यांचें प्रथम लक्ष जाईल. मनुष्यस्वभाव कोठेंही सारखाच असल्यानें असें होणारच. राज्यकारभाराचा एक भाग लोकांस जबाबदार व दुसरा भाग लोकांस बिलकूल जबाबदार नसून, श्रीमंत राजासाहेब यांचे मर्जीवर अवलंबून असल्यानें, त्या दोन्ही भागांत नेहमीं ओढाताण व घासाघीस होऊन राज्ययंत्र चालणें अशक्य होईल. लोकनियुक्त मंत्र्यास स्वाभिमानानें लोकमताप्रमाणें वागून लोकहित साधणें अवघड होईल व खटके उडतील व स्वाभिमान सोडून लोकमताविरुद्ध वागणें ते मंडळास जबाबदार असल्यानें अशक्य होईल. हा महत्त्वाचा दोष कोणत्याही साधनानें दूर होणें शक्य नाहीं. आणि आमच्या मतें विशेषतः या दोषामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीमुळें, द्विदलराज्यपद्धति खालसा मुलखांत अयशस्वी ठरली. हे दोष कोठेंही टाळतां येणें शक्य नाहीं. थोडक्यांत सांगणेचें झाल्यास मूलतः सदोष असलेलें द्विदल राज्यपद्धतीचें बाभळीचें कांटेरी झाड येथें संस्थानांत आणून लावून त्यास कितीही खत, पाणी घातलें तरी तें कांटेरी झाडच राहणार. त्याला आंब्याचीं मधुर फळें येण्याची आशा करणें फोल आहे. सबब पुढील सुधारणा दानाचे कामीं या पद्धतीचा उपक्रम करणें मुळींच श्रेयस्कर नाहीं असें आमचें निश्चित मत आहे. द्विदल राज्यपद्धति अमलांत आल्यास प्रत्यक्ष दैनंदिन व्यवहारांत याहून अधिक अडचणी खास येणार. परंतु त्या स्थलाभावीं सर्व येथें विवरतां येत नाहींत. या पद्धतीच्या तपशिलाची येथवर थोडीशी चर्चा केली त्यावरून तपशिलांत आमचा मतभेद आहे व तपशिलांत फरक केल्यास ही पद्धत स्वीकार्य आहे असा कोणीही अर्थ करूं नये अशी विनंति आहे. आमचा आक्षेप या पद्धतीबद्दलच आहे हें एथवरच्या विवेचनावरून स्पष्ट झालेंच आहे.

याप्रमाणें द्विदल पद्धतीचें तत्त्व पूर्णपणें त्याज्य ठरल्यावर, लोकांना विश्वासांत घेऊन संस्थानांत पूर्ण जबाबदार राज्यपद्धति अविलंबें करून स्थापण्याखेरीज आमच्या मतें दुसरा मार्ग नाहीं. व अशी मागणी कांहीं साक्षीदारांनीं, सद्गृहस्थांनीं व प्रजापरिषदेसारख्या संस्थेनेंही आमच्या कमिटीपुढें मांडलेली आहे. ती मागणी एकांतिक असून तशी पात्रता जनतेची

नाहीं असें आमच्यापैकीं कांहीं सभासदांना वाटतें. व त्याकरितां त्याची कसोटी म्हणून त्यांनीं खालील कारणें नमूद केलीं आहेत. ( १ ) संस्थानांत शिक्षणप्रसार कमी आहे. ( २ ) जबाबदार राज्यपद्धतीचा अनुभव प्रजेस नाहीं. ( ३ ) इतर कोणत्याही संस्थानांत ही पद्धति अस्तित्वांत आलेली नाहीं. याबद्दल आमचें म्हणणें असें आहे. आमच्या संस्थानांत साक्षरतेचें प्रमाण खालसा मुलखांतल्यापेक्षां अगर शेजारच्या एकदोन संस्थानांपेक्षां किंचित् कमी असलें तरी तें आजूबाजूच्या इतर संस्थानांपेक्षां जास्तच आहे. शिवाय उच्च शिक्षण घेतलेल्या व सुशिक्षित वर्गाचें प्रमाण आमचे संस्थानांत खास कमी नाहीं. यामुळें साक्षरतेचें किंचित् कमी प्रमाण, संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापण्याचें कामीं, महत्त्वाची अडचण होऊं शकत नाहीं. संस्थानचें उत्पन्न तें किती, त्यांत भानगडीचे प्रश्न ते किती येणार, तेव्हां जबाबदारी पतकरण्यास व ती योग्य रीतीनें पार पाडण्यास दोन चार सुशिक्षित लोक देखील आमचे संस्थानांत नाहींत असें आमच्यापैकीं कांहीं सभासदांना कां वाटतें हें आम्हांस समजत नाहीं. शिवाय अलिकडे दाहा बारा वर्षांत संस्थानांत व संस्थानाबाहेर जें आंदोलन चाललें आहे तिकडे प्रजेचें कुतूहलानें व अभ्यासपूर्वक लक्ष आहे. संस्थानांत म्युनिसिपालिटीच्या निवडणुकींत व तसेंच कायदेमंडळाचे निवडणुकींत मतदान होत आहे. त्याचें प्रमाणही खालसा मुलखापेक्षां कोणत्याही तऱ्हेनें कमी नाहीं असें आम्ही विश्वासपूर्वक सांगूं शकतों. म्युनिसिपालिट्यांना अधिकार दिले असून त्यांचा कारभार समाधानकारक नाहीं असें आमच्यापैकीं कांहीं सभासदांना वाटतें. कोणतीही राज्यपद्धत अमलांत आली तरी ती पूर्ण निर्दोषच आहे असें कोणीच म्हणूं शकणार नाहीं. चुका या व्हावयाच्याच. अधिकार राबवितांनाच त्यापासून अनुभव घेऊन पुढें मनुष्यानें शहाणें होणें हा क्रम आहे. या म्युनिसिपालिट्यांना खरोखर पूर्ण अधिकार देऊन १-१॥ वर्षें जाहलें. त्या अवधींतील कारभार समाधानकारक रीतीनें चाललेला आहे असें आम्हांस वाटतें. यामुळें त्यांचें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं. खालसा मुलखांत आतां प्रांतिक स्वायत्तता स्थापन झाली आहे. काँग्रेस सरकार असेपर्यंत सर्व प्रांतांचा कारभार पूर्ण यशस्वी झाल्याबद्दल येथील व इंग्लंडमधील मुत्सद्यांनीं प्रशंसा केली आहे. तेव्हां तेथील कांहीं म्युनिसिपालिट्यांचा कारभार-ही समाधानकारक नसला तरी मध्यवर्ती राज्यकारभार उत्तम चालणेस कोणताच प्रत्यवाय नाहीं. संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति अमलांत आल्यानें शिक्षणप्रसार होणेस व स्थानिक स्वराज्य वगैरे संस्थांचें काम उत्तम तऱ्हेनें चालण्यास जास्त मदत होऊं शकेल. इकडील म्युनिसिपालिटींचा हल्लींचा कारभार पूर्णपणें निर्दोष नसला तरी खालसा मुलखांतल्या पुष्कळ म्युनिसिपालिट्यांपेक्षां बरा व जास्त चांगला आहे. बहुत दिवसांचे दोष एकदम नाहींसे होणें शक्य नाहीं, हीही गोष्ट सर्वांनीं लक्षांत घेतली पाहिजे. हे दोष आजपर्यंत लोकांवर जबाबदारी न सोंपविल्यामुळें उत्पन्न झालेले असून, ते नाहींसे होण्यास त्यांना जबाबदारीचे अधिकार देणें हाच एक उपाय आहे असें आमचें स्पष्ट मत आहे. तेव्हां या गोष्टी अधिकारदानाच्या खास आड येणार नाहींत. आतां जबाबदार राज्यकारभाराचा अनुभव लोकांना नाहीं अशी एक अडचण पुढें मांडणेंत आली आहे. या आक्षेपासही वरीलप्रमाणें उत्तर आहे. वास्तविक संधि मिळाल्यावांचून अनुभव तरी कसा येणार? त्याकरितांच तरी ही पद्धति स्थापणेंत यावी असें वाटतें. जबाबदारी टाकल्यानें आपत्ति येईल असें वाटत

असेल तरी ती अगदीं अस्थानीं आहे. कारण जे मंत्री ती जबाबदारी घेणार. ते कायदेमंडळास जबाबदार असल्यानें त्यांना जागरूकतेनें व सावधगिरीनें काम करणें भाग पडेल. शिवाय खालील अधिकाऱ्यांचें सहाय्य, अंतिम जबाबदारी श्रीमंत राजासाहेब यांचेवरच असल्यानें महत्त्वाचे प्रसंगीं त्यांचा सल्ला, खालसा मुलखांतला अनुभव व प्रथम जबाबदारी व लोकमत या सर्वांचा परिणाम मंत्र्यावर व प्रतिनिधींवर खास होईल व त्याचें काम व्यवस्थितपणें होऊं लागेल. ह्या उपर कांहीं चुका झाल्या तरी त्याला विशेष महत्त्व न देतां, त्या पुढील अनुभवानें टाळणेस संधि देणेंच श्रेयस्कर. खालसा मुलखांतही कॉंग्रेस मंत्र्यांनीं जबाबदारी पत्करणेपूर्वी अशीच साशंकता दिसत नव्हती काय? त्यावेळेपर्यंत प्रजेच्या लायखीची खात्री ब्रिटिश पार्लमेंटला व मुत्सद्यांना कोठें होती? परंतु प्रत्यक्ष कामास सुरवात झाल्यानंतर ते जास्त उत्तम तऱ्हेनें काम करूं शकतात हें सिद्ध झालें आहे. मतदानाची शक्ति मोठी आहे व त्याप्रमाणें तिचा योग्य उपयोग करून शक्य तों चांगले लोक निवडून आणणेची खटपट जनता करीलच.

आतां इतर संस्थानांत जबाबदार राज्यपद्धतीची स्थापना झाली नाहीं याबद्दल विचार करूं. औंधमध्यें तशी स्थापना झाली आहे व इतर संस्थानांतही तसे प्रयत्न चालूं आहेत. नुकतेंच अखिल भारतीय प्रजापरिषदेच्या कार्यकारी कमिटीनें सर्व संस्थानांत पूर्ण जबाबदार राज्यपद्धतीची स्थापना झाली पाहिजे व संस्थानिक कमी अधिकार देतील तर लोकांनीं ते स्वीकारूं नयेत, संघटना करून आपलें ध्येय गांठावें असा ठराव पास केला आहे. त्याप्रमाणें बऱ्याच संस्थानांत लढा चाललेला आहे. कांहीं ठिकाणीं दिलेले अधिकार अपुरे असल्यानें कांहींनीं बहिष्काराच्या मार्गाचा अवलंब केला आहे, तर कांहींनीं कायदेमंडळांत शिरून सुधारणांचा फोलपणा सिद्ध करण्याचा मार्ग पत्करला आहे; तसा प्रकार येथें व्हावा असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. आतांपर्यंत येथें जसें गोडीगुलाबीनें व सहकार्यानें काम चाललें आहे, तसेंच पुढें चालावें व त्यांतच राजा व प्रजा यांचें हित आहे, असें आम्हांस वाटतें. शिवाय चांगल्या गोष्टी करण्याकरितां बाहेर पाहाण्याची जरूरी नाहीं. येथें संस्थानांत ५० वर्षांपूर्वी दुय्यम शिक्षण मोफत केलें आहे व आजही सात आठ वर्षांपूर्वी कॉलेजच्या उच्च शिक्षणास ५० विद्यार्थ्यांची मोफत सोय केली आहे. अशी व्यवस्था इतर संस्थानांत कोठें झाली होती? जमखंडी म्युनिसिपालिटींत लोकनियुक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष व चेअरमन निवडण्याचा अधिकार १९१८ मध्यें देणेंत आला. त्यावेळच्या जवळपासच्या कोणत्या संस्थानांत अशी व्यवस्था होती काय? अलीकडे १९३८ सालीं शेतसाऱ्यांत शेंकडा २५% सूट देण्यांत आली, ती इतर संस्थानांपेक्षां येथें प्रथमच देण्यांत आली व जबाबदार राज्यपद्धतीचें ध्येयही आमच्या माहितीप्रमाणें आमच्याच संस्थानांत प्रथम जाहीर करण्यांत आलें नाहीं काय? अशींच पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील. तेव्हां अशा कामीं बाहेरच्या दाखल्याकरितां अडून बसण्याचें कारण नाहीं. परस्पर आदर, प्रेम व विश्वास यांच्या आधारावर, श्रीमंत राजेसाहेबांनीं प्रजेच्या मागणीप्रमाणें संपूर्ण जबाबदार राज्यपद्धतीची स्थापना करून दुसऱ्या संस्थानांना उदाहरण घालून देणेचें श्रेय

संपादन करावें. त्यांत त्यांचा मोठेपणा व प्रजेचें हित आहे व तें आतांपर्यंतचे श्रीमंत राजासाहेबांचे उदार व प्रागतिक धोरणास अनुलक्षून होणार आहे.

वास्तविक ह्या मुद्याचें विवेचन येथें पुरें करण्यास हरकत नाहीं. परंतु आमच्या इतर सन्मान्य सभासदांनीं केलेल्या व याशीं संबंध असलेल्या एका विधानाबद्दल दोन शब्द लिहिणें जरूर आहे. आमचें व त्यांचें या बाबतींत सहमत झालें नाहीं. याचें कारण त्यांचे मतें प्रजा परिषदेच्या वर्किंग कमिटीचा आम्हांस आदेश आहे असें त्यांचें म्हणणें आहे. आदेश असो वा नसो; तो महत्त्वाचा प्रश्न नसून प्रजापरिषदेतर्फे म्हणून जी योजना पुढें आलेली आहे ती योजना आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. म्हणूनच ती आम्हीं सुचविली आहे. किरकोळ बाबतींत थोडासा मतभेद असला तरी त्याला महत्व नाहीं. आदेश म्हणून हा अभिप्राय व्यक्त केलेला नाहीं. आमच्या इतर सभासदांच्या मतें द्विदल राज्यपद्धतीपुढें पाऊल टाकणें शक्य नाहीं. व आमच्या मतें पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापणेस हरकत नाहीं. अशा विरुद्ध मतामध्यें मुरड घालावी कशी व एकमत होणेच्या दृष्टीनें प्रयत्न करणेस जागा कशी पाहावी ?

आतां याप्रमाणें या मुद्याचें विवेचन व विचार करून त्या बाबतींत सूचना व अभिप्राय व्यक्त केल्यानंतर येथें भागण्यासारखें आहे. द्विदल पद्धति स्थापणें हा अभिप्राय आमच्या इतर सभासदांनीं व्यक्त केल्यानंतर कांहीं तपशिलाचे बाबतींत विवेचन केलें आहे. त्याबद्दलही आमचें थोडेसें म्हणणें मांडणें जरूर आहे. संस्थानी खजिन्यावर ज्या ज्या रकमांचे बोजे आहेत त्यांची स्थूल मानानें यादी दिली आहे. त्यांत नंबर ८ बाबतींत पूर्वीं घातलेल्या जबाबदाऱ्या कोणत्या हें एकदां निश्चित नमूद करण्यांत यावें म्हणजे त्याबद्दल पुढें वाद उत्पन्न होणार नाहीं. नंबर ९।१० या बाबतींत आमच्या इतर सभासदांनीं जी भावना व्यक्त केली आहे ती आम्हांस मान्य आहे. संस्थानचें उत्पन्न फारच मर्यादित व वाढविणेस साधन कमी; श्रीमंत राजासाहेब यांचें प्रजाहित व कल्याण साधणेची सदिच्छा या गोष्टींत मेळ घालणेचें झाल्यास त्यांनीं उदारपणें स्वार्थत्याग करण्यास आपण होऊन तयार झालें पाहिजे व तयार होतील असा आमचा विश्वास आहे. तशी जरूरी मात्र पटविणेची लोकांची तयारी पाहिजे. उत्पन्नाचा $\frac{१}{१०}$ दंडक Ex Viceroy Lord Irwin व तसेंच हिंदुस्थानचे सन्मान्य पुढारी महात्मा गांधी यांनीं जो दंडक घातलेला आहे तिकडे श्रीमंत राजेसाहेब यांचें आम्ही लक्ष वेधूं इच्छितों.

लोकनियुक्त मंत्री हा जसा कायदेमंडळास जबाबदार तसा श्रीमंत राजेसाहेबांसही तो तत्त्वानें जबाबदार राहील. परंतु व्यवहारांत जोंपर्यंत मंत्री नियमास धरून काम करीत असतो, तोंपर्यंत त्याच्या कामांत कोणत्याही रीतीनें ढवळाढवळ श्रीमंत राजेसाहेब यांनीं करूं नये अशीच कायद्यांत तरतूद व्हावी; कारण मंडळास जबाबदार असल्यानें मंडळाच्या विश्वासानें तो काम करीत असतांना श्रीमंत राजेसाहेब यांचेकडून दैनंदिन कारभारांत अडथळा होईल तर dead lock होईल व मंत्र्यास तेथें राहणें अशक्य होईल याबद्दल विवेचन करण्याचें कारण नाहीं.

श्रीमंत राजासाहेब यांना मंडळास न विचारतां एकादे प्रसंगीं कायदा करणेस अधिकार असावा. तो असा कीं, त्या परिस्थितींत त्यांचा अंमल ६ महिन्यांपेक्षां जास्त नसावा. त्यांना पाहिजे तेव्हां व त्यांना वाटेल तो कायदा करण्याचा स्वतंत्र अधिकार श्रीमंत राजासाहेब यांना असणें श्रेयस्कर नाहीं. त्यांचे मनांत आल्यास लोकमताविरुद्ध कायदे करितां येतील सबब तसें करूं नये.

परराष्ट्र, खाजगी व खंडणी खेरीज कोणत्याही बाबींची चर्चा करणेचा व मत देणेचा अधिकार व बजेटच्या सर्व रकमा पास करणेचा अधिकार मंडळास असावा.

बजेटांत ठरल्याप्रमाणें सर्व कारभार चालला आहे अगर नाहीं हें पाहणेकरितां Audit Committee कायदेमंडळांतील निवडलेल्या सभासदांची नेमणेची. तिजकडे सर्व खात्यांचा तपासणीचा अधिकार असावा. कारण सदरहू मंडळांत ठरल्याप्रमाणें बजेटप्रमाणें दोन्ही खात्यांनीं वागणें जरूर आहे.

वरील सर्व योजना लक्षांत घेऊन त्याबरहुकूम हल्लींचा घटना कायदा व कामकाजाचे नियम यांत आमूलाग्र सुधारणा करावी लागेल. बिलें, ठराव व प्रश्न विचारणें यासंबंधीं सामान्यपणें स्वायत्त ब्रिटिश प्रांतांच्या घटनेंत ज्या तरतुदी आहेत तशा तरतुदी येथें करणेंत याव्या. वरिष्ठ नोकरवर्गाचा प्रश्न सोडून दिला तरी मंत्रिमंडळाचें काम यशस्वीपणें आणि कार्यक्षम रीतीनें चालावयाचें झाल्यास विशिष्ट दर्जाचा खालचा सर्व नोकरवर्ग मंत्रिमंडळाच्या पूर्ण अधिकारांत यावयास पाहिजे. मंत्रिमंडळाची जबाबदारी संयुक्त स्वरूपाची असावी, व त्यांची नेमणूक कायदेमंडळाच्या विश्वासपात्र असलेल्या लोकनियुक्त सभासदांमधून राजेसाहेब यांच्याकडून करणेंत यावी. कायदेमंडळाच्या निर्णयास पात्र ( Votable ) व त्या निर्णयास अपात्र ( Non-votable ) अशा बाबींची यादी ठरविणेंत यावी व कायदेमंडळ अस्तित्वांत येतांच त्यांच्या व श्रीमंत राजेसाहेब यांच्या सहविचारानें अशी जरूर ती यादी कायम करणेंत यावी. मंडळाच्या निर्णयास अपात्र अशा यादीची चर्चा करणेचा फक्त अधिकार मंडळास राहील, मतास पात्र अशा सर्व बाबी कायदेमंडळाच्या मतास किंवा निर्णयास पात्र राहतील. मंत्रिमंडळ पूर्णपणें कायदेमंडळास जबाबदार राहील. खात्यांची विभागणी करण्याचें काम मुख्य मंत्र्याकडे राहील व या कामीं त्यानें श्रीमंत राजासाहेब यांचा सल्ला व उपमंत्र्यांचा सल्ला घेणेचा आहे. उपमंत्र्यांची निवड व खात्यांची विभागणी करण्याची जबाबदारी व अधिकार मुख्य मंत्र्यांचाच राहील. कारण अंमलबजावणी करण्याची सर्व जबाबदारी त्यांचेवरच आहे. अखेर नेमणूक श्रीमंत राजासाहेब यांचेकडूनच होणेची असली तरी राज्यकारभाराची प्रत्यक्ष जबाबदारी मंत्रिमंडळावर असल्यानें मुख्य मंत्र्याच्या सल्ल्यास व मतास विशेष प्राधान्य देणें जरूर आहे.

कायदेमंडळानें पास केलेलें कोणतेंही बिल अगर ठराव श्रीमंत राजासाहेब यांच्या मंजुरीनंतरच व त्यांच्या नांवानें अंमलांत येईल. आर्थिक स्वरूपाचें व नवीन कराचें कायद्याचें बिल श्रीमंत राजासाहेब यांची अगाऊ मंजुरी घेतल्याखेरीज मंडळांत मांडतां येणार नाहीं.

कायदेमंडळाचा बैठक बोलावणेचा, तहकूब करणेचा व मंडळ बरखास्त करणेचा अधिकार श्रीमंत राजासाहेब यांना राहील. मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्याचा व तींत हजर राहण्याचाही अधिकार त्यांना राहील. एकंदरींत सर्व राज्यकारभार, देखरेख, मार्गदर्शन आणि नियमन (Superintendence, Direction and Control) करण्याचा अधिकार श्रीमंत राजासाहेब यांना राहील. विशिष्ट परिस्थितींत वट्टहुकूम काढून कायद्याचें स्वरूप त्यास देण्याचा अधिकार त्यांना राहील. मात्र असा कायदा विशिष्ट मुदतीपुरताच कायद्यानें अमलांत राहील. त्यानंतर तो अमलांत राहावयाचा झाल्यास, त्यास कायदेमंडळाची मंजुरी लागेल. खासगी खर्च (एकदां सर्वानुमतें निश्चित झाल्यानंतर), खंडणी, एखादा जातीचा धर्म, अल्पसंख्याकांचें संरक्षण, परराष्ट्र संबंध, तह व करारनामे हे विषय कायदेमंडळाच्या कक्षेंत येणार नाहींत. मंत्रिमंडळाच्या अधिकारांतील कोणत्याही नोकरास आपणावर अन्याय झाला असें वाटलें तर त्यानें श्रीमंत राजासाहेब यांचेकडे अपील करून दाद मागणेचा अधिकार त्यास राहील. वेळोवेळीं पालटणाऱ्या मंत्रिमंडळाच्या आवडीनिवडीचा परिणाम नोकरवर्गावर होऊन नोकरीची शाश्वती (Permanency of Service) या तत्त्वास बाध येऊं नये म्हणून विशिष्ट दर्जावरचा वरिष्ठ नोकरवर्ग मंत्रिमंडळाच्या हुकमतीखालीं न राहतां, श्रीमंत राजासाहेब यांच्या अधिकारांत राहावा. श्रीमंत राजासाहेब यांना जादा अधिकार (King's Veto or Prerogative) केव्हांहि असावयास पाहिजेच व तो राहीलच. मंत्रिमंडळानें आपले अधिकार कसे चालवावे व जबाबदाऱ्या कशा पद्धतीनें पार पाडाव्या यासंबंधीं सूचनापत्रकांच्या (Instrument of Instructions) द्वारें त्यांना श्रीमंत राजासाहेब सूचनात्मक खलिते पाठवून आपली आज्ञा व इच्छा व्यक्त करतील. या खलित्यांची चर्चा करण्याचा अधिकार कायदेमंडळास अगर कोणासही नाहीं.

याप्रमाणें आमच्या योजनेची सामान्य रूपरेषा आहे.

# भाग ३

## कायदेमंडळाची रचना, मताधिकार
## व
## मतदार संघ

संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापणेंत यावी अशी आम्हीं सूचना केली आहे. या बाबतींत मताधिकाराचें प्रमाणही अधिक व्यापक व्हावें याबद्दल वाद नाहीं. आमच्या कांहीं सभासदांचे मतें तें लोकसंख्येच्या शेंकडा १० पर्यंत वाढविणेंत यावें असें आहे व त्या दृष्टीनें हल्लीं असलेल्या मतदारांच्या पात्रतेची मर्यादा त्या मानानें कमी करावी असें सुचविलें आहे. आमच्या मतें हें प्रमाण शेंकडा १५।१६ पर्यंत वाढविण्यास हरकत नाहीं असें वाटतें. त्यामुळें आपोआप एक प्रकारचें राजकीय शिक्षण लोकांना मिळतें. १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टाप्रमाणें खालसा मुलखांत लोकसंख्येचा शेंकडा १४ लोकांना मतदानाचा

हक्क मिळाला आहे. मागें नमूद केल्याप्रमाणें असेंब्लीच्या व म्युनिसिपालिटीच्या निवडणुकींत मताधिकार वापरलेल्यांचें प्रमाण खरोखरींच उत्साहवर्धक व समाधानकारक आहे. त्यावरून त्याचा दुरुपयोग होईल अशी भीति बाळगणेस जागा नाहीं. शिक्षणाचा प्रसार जनतेमध्यें झाल्यास जास्त फायदा होईल; परंतु शिक्षणाच्या अभावीं त्यांना मतदानाच्या हक्काचा बरोबर उपयोग करितां येणार नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. निरक्षर लोकही व्यवहारांत बरेच वाकबगार असल्याचें दिसून येतें. लोकशाहीचें तत्त्व एकदां मान्य केल्यावर कायदेमंडळाचे प्रतिनिधि शक्य तों जास्त मतदारांनीं निवडलेले असणें बरें; कारण तें जास्त लोकमत–निदर्शक आहे. आमच्या इतर सभासदांनीं सुचविल्याप्रमाणें वयस्क मतदारास मतदानाचा हक्क असावा हें ध्येय ठेवून तूर्त वर सुचविल्याप्रमाणें लोकांनाही हक्क मिळाल्यास पुरेसें व योग्य होणार आहे. व प्रजापरिषदेच्या वर्किंग कमिटीनें सुचविल्या योजनेप्रमाणें तें प्रमाण जमेल असा आमचा अंदाज आहे व खालसा मुलखांतही तेंच प्रमाण आहे.

## मंडळाची घटना

मंडळाच्या सभासदांची संख्या उगीच मोठी असूं नये. आमच्या इतर सभासदांनीं सुचविलेली ३६ ही संख्या आमच्या मतें जास्तच आहे. संस्थानचें क्षेत्र अगर लोकसंख्या पाहतां २४ ते २८ ही कमाल मर्यादा ठेवावी. सर्व सभासद लोकनियुक्तच असावेत व त्यांची विभागणी प्रजापरिषदेच्या कार्यकारी कमिटीनें सुचविल्याप्रमाणें व्हावी. हल्लींच्या परिस्थितींत या संस्थानांत स्त्रियांकरितां स्वतंत्र हक्काची व्यवस्था करणेची जरूरी नाहीं. कारण स्त्रियांचें आतांपर्यंत राजकारणांत लक्ष नाहीं. पुढें जसजसें त्यांचें लक्ष इकडे लागेल तसतसे अधिकार देण्याची तजवीज करणें बरें. हा वर्ग अद्याप सुसंघटित झाला नसून, त्या वर्गाचे असे विशिष्ट प्रश्नही हल्लींच्या सामाजिक रचनेंत उत्पन्न झालेले दिसत नाहींत. तरी पण त्या दृष्टीनें प्रयत्न मात्र अवश्य करणेंत यावा. हरिजनांना स्वतंत्र मतदारसंघ कां द्यावा हें समजत नाहीं. मुसलमानांना व हरिजनांना सामान्य मतदार-संघांत एक एक जागा राखीव ठेविल्यास त्यांच्यापैकीं एक एक मनुष्य निवडून येईल व त्यांचा हेतु साध्य होईल. स्वतंत्र मतदारसंघ दिल्यानें दृष्टि संकुचित व कोती होते. व जनते-मधील ऐक्यभाव नष्ट होतो. हिंदी राष्ट्रानें स्वतंत्र मतदारसंघास आतांपर्यंत सतत कसून विरोधच केला आहे. आम्हीही असे संघ निर्माण करण्याच्या अगदीं विरुद्ध आहों. तसेंच जात, धर्म अगर संस्कृति या कारणावरून 'विशेष मतदारसंघ' निर्माण करणेंही घातुक आहे म्हणून 'हरिजन' आणि 'स्त्रीवर्ग' यांना विशेष मतदारसंघ न देतां सामान्य मतदारसंघांत त्यांना जागा राखून ठेवाव्या. मराठा समाज सध्यां चांगला पुढारलेला आहे. त्यांचे सांस्कृतिक, शैक्षणिक अगर सामाजिक दृष्ट्या या संस्थानांत इतर सुसंस्कृत समाजा-पेक्षां हितसंबंध भिन्न नाहींत व कांहीं भागांतून तरी मराठे लोकच केवळ असल्यानें त्या समाजाच्या प्रतिनिधींना कायदेमंडळांत एक तरी जागा मिळेलच. या कारणाकरितां मराठा समाजास राखीव जागा मुळींच देण्यांत येऊं नयेत. तैनातदार यांची संख्या फारच लहान असल्यानें वतनदारांचा त्यांत समावेश करावा. संस्थानांत विणकरीवर्ग बराच मोठा आहे

व शेतीचा धंदा सोडल्यास धंद्याच्या दृष्टीनें हाच एक आहे. त्या वर्गास एक स्वतंत्र जागा देण्याची आमच्यांपैकीं कांहीं सभासदांनीं सुचविलेंच आहे. ती सूचना आम्हांसही मान्य आहे.

याप्रमाणें, आमचा अभिप्राय या बाबतींत कळविल्यावर सामान्यपणें आमच्यांपैकीं इतर सन्मान्य सभासदांनीं सुचविलेल्या सूचनांतील दोष दाखविणें जरूर असल्यानें थोडक्यांत तसें करीत आहोंत. नेमणुकीचें तत्त्व आम्हांस मान्य नाहींच तरी भिन्नमतवाल्या सभासदांनीं सुचविलेल्या योजनेंत, नेमलेल्या सभासदांचें प्रमाण मोठें ठेवणेंत आलेलें आहे. तसेंच निरनिराळे स्वतंत्र मतदारसंघ व राखीव जागा देऊन, खरोखर लोकनियुक्तांच्या जागा अडविल्या गेल्या आहेत. अशा सभासदांचा कल आतांपर्यंत अनुभव पाहतां, खरोखर लोकपक्षाकडे नसतो. यामुळें लोकनियुक्तांचें बळ कमी होऊन बरोबर कार्य होणार नाहीं.

अध्यक्ष लोकनियुक्तच असावा. मंडळाच्या सभासदांखेरीज एक स्वतंत्र इसम आणल्यानें निष्कारण सरकारी सभासदांची संख्या वाढते व तो नेमलेला असल्यामुळें सर्वसाधारणपणें श्रीमंत राजासाहेबांचा तो नोकरच होतो व त्याला पूर्ण स्वातंत्र्यानें वागणें कठीण पडेल. एकंदरीनें अध्यक्षाची निवड करणेचा अधिकार मंडळास असावा व या कामीं मंत्र्यास व मंडळास अधिकार देतांना, संशयी भावना दूर करून विश्वासानें जबाबदारी टाकणेंत यावी व जबाबदारी दक्षतेनें पार पाडली जाते कीं नाहीं हें मात्र कसोशीनें पहावें.

# भाग ४

## दप्तरची भाषा

आमच्यांपैकीं कांहीं सभासदांनीं या बाबतींतली श्रीमंत राजासाहेबांची घोषणा व या कमिटीपुढील कामाबद्दल किंचित् गैरसमज करून घेतलेला दिसतो. श्रीमंत राजेसाहेबांच्या घोषणेचें पहिलेंच वाक्य पुढीलप्रमाणें आहे. "संस्थानांतील बहुजनसमाजाची भाषा ही कानडी असल्यानें दप्तरची भाषा शक्य तों कानडी असावी हें तत्त्व दरबारकडून मान्य करणेंत आलें आहे." ही घोषणा स्पष्ट असतां, आमच्यांपैकीं कांहीं सन्मान्य सभासदांनीं "राज्यकारभाराचे दृष्टीनें दप्तर मराठी असल्यानें कानडी लोकांना भासणारी अडचण दूर कशी करावी इतकाच प्रश्न आहे." असें म्हणून विपर्यास केला. दप्तरची भाषा कानडी झाली तरी मराठी भाषावाल्यांची कोणतीहि गैरसोय होऊं नये अशी व्यवस्था जरूर करण्यांत यावी. आतांपर्यंत जमखंडी तालुक्यांतील कांहीं व्यापारी वगैरेंनीं आपले हिशोब मराठींतच ठेविले आहेत. परंतु आतांपर्यंत कानडी भाषेस दप्तरांत स्थानच नसल्यानें तसें होणें अपरिहार्य होतें. तसेंच येथील आजूबाजूंच्या मराठी संस्थानांतील व्यापाऱ्यांशीं ज्यांचा संबंध येतो असे व्यापारी सोईकारितां यापुढें मराठींत हिशेब ठेवतील परंतु बहुजनवाल्यांची भाषा दप्तराची भाषा असावी हें योग्य असल्यानें, श्रीमंत राजासाहेबांनीं तें तत्त्व मान्य केलें आहे. एवढा मुद्दा सोडल्यास बाकीच्या बऱ्याच मुद्यांवर या बाबतींत आमच्या सर्वांचें एकमत आहे.

मराठी व कानडी या दोन्ही दप्तराच्या भाषा झाल्यानें प्रथमपासून मुलांना या दोन्ही भाषा शिकविण्याची सोय असावी अशी सूचना केली. वास्तविक हा प्रश्न या ठिकाणीं अप्रस्तुत आहे. परंतु आमच्या सभासदांनीं तो विचारांत घेतला असल्यानें त्या बाबतींत आम्हीहि आमचा अभिप्राय व्यक्त करीत आहोंत. प्राथमिक शिक्षणापासून नोकरीचें ध्येय डोळ्यांपुढें असणें योग्य नव्हे. लहानशा संस्थानांत नोकरींत वाव तरी कितींना असणार ? त्याकरितां मुलांचे कोमल मेंदूवर निष्कारण बोजा टाकणें योग्य नाहीं व शिक्षकांचा व मुलांचा वेळेचा अपव्यय बराच होणार आहे व प्रत्येक शाळेंत तशी व्यवस्था करीत गेल्यास निष्कारण अडचण होऊन घोटाळा मात्र होणार व फलश्रुति तर बिलकुल होणार नाहीं. तेव्हां मातृभाषेंतून शिक्षणाची सोय आहेच त्याचा फायदा विद्यार्थ्यांना द्यावा व पुढें प्रौढपणीं फार तर अशा option ची व्यवस्था कोणत्याहि तऱ्हेनें गैरसोय अगर जास्त जादा खर्च होणार नसल्यास करण्यांत यावी.

या दप्तराच्या गोष्टी किती अवधींत घडून याव्यात याबद्दल आमच्या इतर सभासदांनीं व्यक्त केलेल्या अभिप्रायांत फारच मोघमपणा राहिलेला आहे. पांच वर्षांत व्यवस्था व्हावी असें नमूद केल्यानें कोणकोणत्या गोष्टींपासून सुरवात करावी हें समजत नाहीं. प्रजापरिषदेच्या कार्यकारी कमिटीनें सुचविलेली कालमर्यादा सारखीच असल्यानें, प्रजापरिषदेच्या कार्यकारी मंडळानें या बाबतींत सुचविलेल्या योजनेप्रमाणें क्रमाक्रमानें सोय करण्यास हरकत नाहीं. सबब तशी व्यवस्था व्हावी.

याप्रमाणें भिन्नमतपत्रिका आम्ही सादर करण्याची परवानगी घेतों.
तारीख ९ माहे जुलई सन १९४० इसवी.

Sd./- गोविंद दत्तात्रय आपटे
Sd./- अनंत वासुदेव खाबडे
Sd./- पंचप्पा बसलिंगप्पा कोरी